Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.

महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक २०१ * * नागपूर * सोमवार, दिनांक २८ ऑक्टोबर २०२४ ८ पाने • किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

दहा रुपयाच्या तिकिटावर ४५ हजाराची लागली लॉटरी

■ महासागर प्रतिनिधी मलकापूर , २७ :
मलकापूर २७/१०/२४ येथील एका व्यक्तीला दहा रुपयाच्या तिकिटावर ४५ हजार रुपयाची लॉटरी लागली आहे. मलकापूर येथील तहसील चौकातील प्रो.प्रा. पांडुरंग गोरले जय गजानन एजन्सी पेपर दुकान यांच्या दुकानावरुन मलकापूर येथील एका व्यक्तीने राजश्री लॉटरी दहा रुपयाचे तिकीट खरेदी केले होते त्या तिकिटाचा निकाल दी. २४ ऑक्टोंबर रोजी लागला असून त्याला दहा रुपयाच्या तिकिटा वरती ४५ हजार रुपयांचे बक्षीस लागल्याने आता त्याची दिवाळी साजरी होणार आहे.

अग्रलेख खरीखरी...

देशमुख की दशमुख ?

आपल्या देशात रामाला मानणारा मोठा वर्ग आहे. परंतु काही लोक रावण वृत्तीचे असतात. या दशमुखी रावण वृत्तीच्या माणसांचे प्रतिनिधित्व करणारे, ज्यांच्या नावात संत आहे. पण ते ज्या पद्धतीने बोलले. त्या वसंत देशमुख यांच्या भाषणाबद्दल त्यांच्याच पक्षातील अनेकांच्या मनात खंत आहे. कोणत्याही महिलेबद्दल वक्तव्य करताना काही मर्यादा पाळणे अत्यंत आवश्यक असते. कोणे एकेकाळी एकाच पक्षात असलेले विखे आणि थोरात यांचे तेव्हाही सख्य नव्हतेच. पण गेल्या लोकसभा निवडणुकीत थोरात यांच्या पक्षाने विखेंच्या पक्षाला सत्तेपासून पारखे केल्यामुळे, विखे यांचा पक्ष ज्या भूमिका घेत आहे. त्याचे समर्थन त्यांचा पक्षही करू शकत नाही. अशी सध्याची परिस्थिती आहे. विखे पाटील अहमदनगर जिल्ह्यातील प्रख्यात घराणे आहे. सध्याच्या विखे पाटलांचे पंजोबा असलेल्या विठ्ठलराव विखे पाटलांनी महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्याची मुहूर्तमेढ रोवली होती. त्यासाठी पंडित जवाहरलाल नेहरू स्वतः अहमदनगर जिल्ह्यात आले होते. अशा या मातब्बर घराण्यातील माजी खासदार यांच्या समर्थनासाठी पाजी पणा करणाऱ्या वसंत देशमुख यांना आता प्रचंड संतापाचा आणि रोषाचा सामना करावा लागत आहे. बाळासाहेब थोरात यांची कन्या डॉ. जयश्री थोरात यांच्याबाबत धांदरफळ येथील सभेत जी मुक्ताफळे या देशमुखांच्या कडून उधळण्यात आली. त्याचे पडसाद दोन दिवसांपासून संगमनेर मध्ये उमटत आहेत. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी पोलीस ठाण्याबाहेर आंदोलन केले. निषेध सभा घेतली आणि त्या वसंत देशमुखांवर कारवाई करावी अशी मागणी केली. आपल्या नातीच्या वयाच्या मुलीबद्दल म्हातारचळ लागलेला माणूसच अशी विधाने करू शकतो. जी वसंत देशमुख यांनी अश्लाघ्य विधाने केली. ती पातळी सोडूनच आहेत. या गलिच्छ पातळीवरील वक्तव्यासाठी देशमुख यांना पक्षातूनही (आणि ज्यांच्यासाठी भाषण केले त्यांच्याकडूनही) तोंडदेखले का होईना, समर्थन मिळत नाही. यावरून देशमुख यांचे वर्तन कोणत्याही परिस्थितीत समर्थन करण्यासारखे नाही. हेच दिसून येते. आपल्या वक्तव्यामुळे आपण आपल्या नेत्याच्या पक्षाचेच नुकसान करीत आहोत. हे वसंत देशमुख यांना समजत नाही काय? महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी सुद्धा पोलीस अधीक्षकांना पत्र लिहिलेले आहे. हे घाणेरडे वाचाळ प्रकरण विखे पाटलांच्या विरोधात जाणार, हे नक्कीच आहे. विरोध करण्यासाठी आपली पातळी सोडून जे वक्तव्य करण्यात आले. याबद्दल देशमुख यांच्यावर गुन्हा दाखल झालेला आहे. ते फरार झाले होते. आता पोलिसांनी त्यांचा शोध घेतला आहे. पण या वक्तव्याचे कवित्व संपूर्ण निवडणुकीत विखेंच्या पक्षाला अतिशय त्रासदायक ठरणार आहे, असे आम्हाला वाटते. निवडणुकीत जय-पराजय हा होतच असतो. एका गटाचे दुसऱ्या गटाशी पटत नाही. अनेकदा एका पक्षात राहूनही गटागटांच्या गटबाज्या सुरूच असतात. महाराष्ट्रात एक काळ असा होता. जेव्हा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे एकछत्री नेते होते. तेव्हा काँग्रेस पक्षातच जिल्ह्या-जिल्ह्यादोन-दोन, तीन-तीन गट होते. पण प्रत्येक गटाचे नेते यशवंतरावच होते. त्यावेळी सर्वोच्च नेत्याचा दरारा इतका होता की, त्यांनी डोळे वटारताच दुसरा गट दातखिळी बसल्यासारखा गप्प बसत असे. आता प्रत्येक पक्षातच किती गट आहेत. याची प्रचिती उमेदवारांच्या घोषणे बरोबर दिसून येत आहे. इकडून तिकीट नाकारले की, कधी आपल्या मित्र पक्षांबरोबर, तर कधी अगदी विरोधी पक्षाबरोबर जायला कोणालाही लाज लज्जा वाटत नाही. निवडणुकीतील प्रचार करताना जी सभ्यता पाळली जात होती. ती आता लोप पावलेली आहे. काल बोलताना ज्यांचा विरोध केला. त्याचाच प्रचार करण्याची पाळी आता त्या विरोधकांच्या वर आलेली आहे. हे सर्व आपण बघत आहोत. त्यामुळे विरोध करताना एवढा विरोध करा की, कधी समर्थन करण्याची वेळ आली. तर अजिबात लज्जा वाटू नये किंवा आपले हसे होऊ नये. पण आम्ही वर म्हटल्याप्रमाणे, 'सत्ता तुरणांम् , न भयम् न लज्जा' अशी परिस्थिती आलेली आहे. हे सत्तातूर आता असुरांसारखे वागत आहेत. म्हणूनच त्यांचा सुर मधुर लागण्याऐवजी एवढा भसाडा लागतो आहे की, त्यामुळे तो सुर कशा पद्धतीने बेसूर होतो. हे कोणालाच कळत नाही. वसंत रावांनी जो गलिच्छपणा केला आहे. त्याचा सर्व पक्षीय निषेध झालाच पाहिजे. या लेखाच्या निमित्ताने एवढेच सांगावेसे वाटते.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

शरद पवार राष्ट्रवादीची तिसरी यादी जाहीर

परळीत धनंजय मुंडेविरुद्ध राजेसाहेब देशमुख तर स्वरा भास्करच्या पतीला अनुशक्तीनगरमधून उमेदवारी

ज्यांच्यावर आरोप केले त्यांनाच सोबत घेण्याची भाजपची तयारी
महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेसने नवाब मलिक यांना तिकिट दिलं नाही. याबद्दल जयंत पाटील यांना विचारले असता ते म्हणाले की, नवाब मलिक यांनी स्वत:च्या कन्येला भाजपकडून निवडणूक लढवण्याची परवानगी दिली आहे. याचा अर्थ भाजपने नवाब मलिकांना तिकीट देण्याऐवजी त्यांच्या मुलीला दिले आहे. नवाब मलिक यांच्यावर ज्यांनी आरोप केले, त्याच भाजपने त्यांना सोबत घेण्याची तयारी केलेली दिसते, असे जयंत पाटील म्हणाले.

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, २७ :
शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी पक्षाची तिसरी यादी आज जाहीर करण्यात आली. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन यादीची घोषणा केली. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने यापूर्वी ४५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती. त्यानंतर २२ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली.

तिसऱ्या यादीत बीड जिल्ह्यातील माजलगाव आणि परळी विधानसभा उमेदवारांचा समावेश आहे. यावेळी पवारांच्या राष्ट्रवादीने मंत्री धनंजय मुंडे यांच्याविरोधात परळीतून राजेसाहेब देशमुख यांना उतरवले आहे. तर माजलगावमध्ये अजित पवार यांच्या आमदार प्रकाश सोळंके यांना मोहन जगताप टक्कर देणार आहेत. तर अभिनेत्री स्वरा भास्कर यांच्या पतीला तिकीट दिले आहे. स्वरा भास्करच्या पतीला अणुशक्तीनगर मधून उमेदवारी पक्षाने फहाद अहमद यांना अणुशक्तीनगर मधून उमेदवारी दिली. फहाद अहमद हे समाजवादी पक्षाचा पदाधिकारी होते. तसेच ते अभिनेत्री स्वरा भास्करचे पती आहेत. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाने त्यांना आपल्या चिन्हावरून उमेदवारी दिली आहे. आता अणुशक्तीनगरमध्ये राष्ट्रवादी विरूद्ध राष्ट्रवादी शरद पवार गट असा होणार आहे. या ठिकाणी नवाब मलिक यांची मुलगी सना मलिक विरूद्ध फहाद अहमद अशी लढत होईल.

१५०० रुपये दिले म्हणजे महिलांना काहीही बोलण्याचा परवाना काढला का ?
जयश्री थोरात यांच्यावर गुन्हा दाखल केल्याप्रकरणी जयंत पाटील म्हणाले, एकीकडे लाडकी बहीण म्हणायले आणि दुसरीकडे त्या बहिणीला शिव्या घालायचा, अशातला तो प्रकार आहे. जिच्याबाबत अपशबद वापरले, परत तिच्यावरच केस करता. यावरुन तुम्ही लाडक्या बहिणीला नेस्तनाबूत करण्याचे ठरवले आहे.

परांडामध्ये ठाकरें पाठोपाठ शरद पवार गटाचा उमेदवार

महाविकास आघाडीत बिघाडी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, २७ :
विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपासाठी चर्चेचे गुऱ्हाळ लावूनही महाविकास आघडीत जागांचा घोळ कायम आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने शनिवारी उमेदवारांची दुसरी यादी घोषित केली. ठाकरे गटाने धाराशिव जिल्ह्यातील परांडा विधानसभा मतदारसंघातून राहुल ज्ञानेश्वर पाटील यांना उमेदवारी दिली असताना शरद पवार गटाने आज येथून राहुल मोटे यांच्या उमेदवारीची घोषणा केली. त्यामुळे ठाकरे आणि शरद पवार गटातील बेबनाव समोर आला आहे.
आघाडीतील जागावाटपाच्या घोळाकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे लक्ष वेधले असता, याबाबत शिवसेना ठाकरे गटाशी चर्चा सुरू आहे. शिवसेनेच्या स्थानिक कार्यकर्त्यांची वेगळी मते आहेत. त्यामुळे परांडातील उमेदवारीबाबत योग्य निर्णय घेतला जाईल असे त्यांनी सांगितले. परांडामधून शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार तानाजी सावंत निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे धाराशिव जिल्ह्यातील ही लढत लक्षवेधी ठरली आहे. दरम्यान, शरद पवार गटाने आपल्या दुसऱ्या यादीत अजित पवार गटातून निलंबनाची कारवाई झालेले विधान परिषद सदस्य सतीश चव्हाण यांना छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील गंगापूरमधून, विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर यांना बीडमधून, फलटणमधून दीपक चव्हाण, उल्हासनगर येथून माजी आमदार पप्पू कलानी यांचे चिरंजीव ओम कलानी, अहमदनगर शहरमधून अभिषेक कळमकर, सिन्नर येथून उदय सांगळे यांना उमेदवारी दिली आहे.

भुजबळ यांच्या विरोधात माणिकराव शिंदे
राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार छगन भुजबळ निवडणूक लढवत असलेल्या नाशिक जिल्ह्यातील येवला मतदारसंघातून पवार गटाने माणिकराव शिंदे यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे येवल्यात भुजबळ विरुद्ध शिंदे अशी लढत रंगणार आहे

५० विमानांना बॉम्बची धमकी

इंडिगोची १८, विस्ताराची १७ व अकासाच्या १५ फ्लाइटस
१४ दिवसांत ३५० हून अधिक धमक्या

बॉम्बच्या धमकीप्रकरणी आतापर्यंत दोघांना अटक
फ्लाइटमध्ये बॉम्बची खोटी धमकी देणाऱ्या २५ वर्षीय तरुणाला २६ ऑक्टोबर रोजी दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २५ वर्षीय शुभम उपाध्यायने २५ ऑक्टोबर रोजी विमानतळावरील फ्लाइटमध्ये बॉम्बच्या दोन खोट्या धमक्या दिल्या होत्या. चौकशीत त्याने प्रसिद्ध होण्यासाठी हे कृत्य केल्याचे सांगितले.

■ महासागर प्रतिनिधी
नवी दिल्ली, २७ :
रविवारी तीन इंडियन एअरलाइन्सच्या ५० फ्लाइटना बॉम्बची धमकी मिळाली आहे. यामध्ये इंडिगोच्या १८, विस्ताराच्या १७ आणि अकासाच्या १५ फ्लाइटचा समावेश आहे.
अशाप्रकारे, १४ दिवसांत ३५० हून अधिक देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमानांना बॉम्बच्या धमक्या मिळाल्या आहेत. मात्र, तपासात या सर्व धमक्या खोट्या असल्याचे निष्पन्न झाले.
दुसरीकडे केंद्र सरकारने या धमक्यांबाबत कठोर भूमिका स्वीकारली आहे. आयटी मंत्रालयाने २६ ऑक्टोबर रोजी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक सल्ला जारी केला होता की त्यांनी अशी खोटी माहिती त्वरित काढून टाकली नाही तर त्यांना आयटी कायद्यांतर्गत दिलेली प्रतिकारशक्ती रद्द केली जाईल. अशी माहिती तातडीने काढून टाकावी लागेल आणि ही माहिती संबंधित अधिकाऱ्यांनाही द्यावी लागेल, असे मंत्रालयाने म्हटले आहे.
अलीकडच्या काळात विमानांना धोका निर्माण झाल्यामुळे विमानसेवेवर वाईट परिणाम झाला आहे. विमान वाहतूक मंत्रालयाचे ६०० कोटी रुपयांहून अधिक नुकसान झाले आहे. केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री के राममोहन नायडू यांनी रविवारी सांगितले की, बॉम्बच्या खोट्या धमक्या देणाऱ्या लोकांना उड्डाण करण्यापासून रोखण्यासाठी केंद्र सरकार पावले उचलण्याचा विचार करत आहे. त्यासाठी कायद्यात सुधारणा करण्याचाही सरकार विचार करत आहे. कायद्यात बदल केले जातील. अशा कृत्यांमध्ये सहभागी असलेल्यांना कठोर शिक्षा आणि दंड ठोठावला जाईल. अशा लोकांनाही नो फ्लाइंग लिस्टमध्ये टाकले जाईल. येत्या काही दिवसांत आम्ही याची घोषणा करू. यापूर्वी मुंबई पोलिसांनी छत्तीसगडमधील राजनांदगाव येथून १७ वर्षीय अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले होते. पैशांवरून त्याचा मित्राशी वाद सुरू होता. त्याने मित्राच्या नावाने खाते तयार केले.

मुंबई वांद्रे रेल्वे स्थानकात चेंगराचेंगरी

नऊ प्रवासी जखमी ■ दोन गंभीर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, २७ :
मुंबईमधील वांद्रे रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर गर्दीमुळे चेंगराचेंगरी होऊन नऊ प्रवासी जखमी झाले आहेत. वांद्रे रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर पहाटे ५ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. रेल्वेत चढण्यासाठी प्रवाशांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. रेल्वेत चढत असतानाच झालेल्या गर्दीमुळे चेंगराचेंगरी झाली आणि यामध्ये काही प्रवाशी प्लॅटफॉर्मवर पडले. दरम्यान, या घटनेचा घटनाक्रम पोलिसानी सांगितला आहे. मुंबई लोहमार्ग पोलीस ठाण्याचे उपायुक्त मनोज पाटील हे एबीपी माझाशी बोलत होते. मनोज पाटील म्हणाले, अंत्योदय एक्स्प्रेस ही साप्ताहिक रेल्वे आहे. वांद्रे ते गोरखपूर या दरम्यान प्रत्येक रविवारी ही गाडी चालवली जाते. नेहमी या ट्रेनला गर्दी असते. या ट्रेनला २२ कोच लावले जातात. सर्व जनरल कोच आहेत. म्हणजेच

कोणतंही बुकींग व रिझर्व्हेशन नसतं. त्यामुळे या ट्रेनला गर्दी असते.
जखमींवर उपचार सुरू
या घटनेत नऊ प्रवासी जखमी झाले असून गंभीर जखमी कोणीही नाही. इंद्रजित साहनी यांच्या उजव्या मांडीला मार लागला होता. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. उर्वरितांवर उपचार सुरू आहेत. दोघांना प्राथमिक उपचार देऊन सोडण्यात आलं आहे.
प्रवाशांनी हुल्लडबाजी केली
एक्स्प्रेस उशिरा येणार असल्यास प्रवाशांच्या रांगा लावल्या जातात. त्यांना रांगेत बसवलं जातं. यावेळीही पोलिसांनी प्रवाशांची रांग लावली होती. परंतु एक्स्प्रेस फलाटावर येताच लोकांनी हुल्लडबाजी केली त्यामुळे सदर घटना घडली, असंही स्पष्टीकरण त्यांनी दिलं.

राज्यात महायुतीचेच सरकार येणार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, २७ :
आगामी विधानसभा निवडणुकीची तारीख आता काही दिवसांवर आली आहे. या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्षांनी आता जोरदार तयारी करण्यास सुरुवात केली आहे. उमेदवारांची नावे देखील जाहीर करणे सुरू असून ही प्रक्रिया देखील आता अंतिम टप्प्यात आली आहे. यंदा सरकार कोणाचे येणार यावर बोलताना महायुतीचे सरकारच येईल असा दावा केला आहे. देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, हरियाणाबाबत सगळे पोलपंडीत सांगत होते भाजपाचा दारुण पराभव होणार. पण भाजपाला प्रचंड बहुमत मिळाली. त्यामुळे सकाळी टीव्हीसमोर बोलणारे दुपारी काय बोलू या संभ्रमात पडले होते, असे म्हणत त्यांनी संजय राऊत यांच्यावर नाव न घेता टोला लगावला आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला काही प्रमाणात यश मिळवता आले. फेक नरेटिव्हच्या भरवशावर त्यांनी यश मिळवले, असे ते म्हणाले.
लोकसभेच्या निवडणुकीत व्होट

परतीच्या पावसातही पर्यायी पर्यावरणपूरक कंदील

मायक्रोन धागा आणि साडीच्या कपड्यांच्या कंदीलांना सर्वाधिक मागणी

ठाणे, दि. २७ : प्रतिनिधी

यंदा परतीच्या पावसामुळे दिवाळीच्या तयारीवर परिणाम झाला असला तरी, पर्यावरणपूरक कंदिलांची लोकप्रियता कायम आहे. कागदी कंदिलांचा पर्याय म्हणून सध्या बाजारात मायक्रोन धाग्यापासून तसेच साडीच्या कपड्याने बनवलेले कंदील विक्रीसाठी उपलब्ध आहेत. या कंदिलांना पावसाचा धोका कमी असतो आणि ते टिकाऊ असल्यामुळे ग्राहकांचा भरपूर प्रतिसाद मिळत आहे. पर्यावरणपूरक कंदिलांप्रमाणेच हे कंदीलही रंगीबेरंगी आणि आकर्षक दिसतात, त्यामुळे सजावटीसाठी उत्तम पर्याय ठरत असल्याची माहिती ठाण्यातील कंदिल विक्रेत्यांनी दिली.

दिवाळीला अवघा आठवडा शिल्लक राहिला आहे. असे असले तरी परतीचा पाऊस अद्यापही थांबलेला नाही. त्यामुळे यंदा दिवाळीची खरेदी तसेच सजावट कशी करायची असा प्रश्न प्रत्येकाच्याच मनात निर्माण झाला आहे. दिवाळीनिमित्त ठाणे, मुंबईसह उपनगरातील बाजारपेठा सजल्याचे दिसून येत आहे. परंतू, सध्या अधून-मधून बरसत असलेल्या पावसामुळे वस्तू विक्रेत्यांच्या मनातही वस्तू खराब होण्याची भिती निर्माण झाली आहे. त्यात, गेले काही वर्षांपासून नागरिकांचा कल हा कागदापासून तयार करण्यात आलेल्या पर्यावरणपुरक कंदील खरेदीकडे आहे. परंतू, यंदाच्या

वर्षी पावसामुळे हा कंदिल भिजला तर, तो खराब होईल या भितीपोटी नक्की कोणता कंदील यंदाच्या वर्षी खरेदी करायचा असा प्रश्न नागरिकांसमोर उभा राहिला आहे.

कागदी कंदिलांना पर्याय म्हणून बाजारात मायक्रोन धागा आणि साडीच्या कपड्यापासून तयार करण्यात आलेले कंदील विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. मायक्रोन धाग्याचा कंदील हा पूर्णपणे विणलेला आहे. त्यामुळे या कंदिलाची विक्री ८०० रुपयांपासून ते तीन हजार रुपयांपर्यंत होत आहे. तर, साडीच्या कपडा आणि दिवाळी शुभेच्छा चे छपाई केलेल्या चित्राचा वापर करुन पारंपारिक असे विविध रंगाचे कंदिलाची विक्री ४०० रुपयांपासून ते ८०० रुपयांपर्यंत केली जात आहे. हे कंदिल आकर्षित दिसत असल्यामुळे ग्राहकांकडून या कंदिलांना सर्वाधिक पसंती असल्याची माहिती विक्रेत्यांनी दिली. त्यासह, दरवर्षी प्रमाणे यंदाही बाजारात झुट, पैठणी, खण, बांबू पासून तयार करण्यात आलेले कंदील देखील विक्रीसाठी उपलब्ध आहेत. हे कंदील ४०० रुपयांपासून ते ७०० रुपयांपर्यंत विक्री केले जात आहेत.

आचारसहितेमुळे मोठ्या कंदिलाच्या मागणीत घट

दरवर्षी दिवाळीच्या कालावधीत विविध सार्वजनिक मंडळ तसेच गृहसंकुलांसह राजकीय पक्षांकडूनही मोठ्या कंदीलाला सर्वाधिक मागणी असते. परंतू, यंदा विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेल्या आचारसहितेमुळे राजकीय पक्षांकडून मोठ्या कंदीलाची यावर्षी आगाऊ नोंद झाली नसल्याची माहिती ठाण्याचील घंटाळी मंदिर परिसरातील कंदील विक्रेते स्वप्नील जाधव यांनी दिली. त्यामुळे केवळ सार्वजनिक मंडळ तसेच गृहसंकुलांकडूनच मोठ्या कंदीलाला मागणी असल्याचे स्वप्नील यांनी सांगितले.

ठाणे जिल्ह्यात बंडोबांना थंड करण्याचे महायुतीपुढे आव्हान

ठाणे, दि. २७ : प्रतिनिधी

ठाणे जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांची यादी महायुतीकडून जाहीर होताच, महायुतीमध्ये बंडाचे वारे वाहू लागले आहे. तर, महाविकास आघाडी आणि मनसेत मात्र तूर्तास तरी बंडखोरी होताना दिसून आलेली नाही. ठाणे शहर, कोपरी-पाचपखाडी, कल्याण पूर्व, कल्याण पश्चिम, मुरबाड आणि ऐरोली मतदारसंघामध्ये महायुतीकडून उमेदवारी मिळू शकली नसल्यामुळे नाराज झालेल्या इच्छुकांनी अपक्ष निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केली आहे. यामुळे ठाणे जिल्ह्यात बंडोबांना थंड करण्याचे मोठे आव्हान महायुतीपुढे असल्याचे चित्र आहे.

ठाणे जिल्ह्यात ऐरोली, बेलापूर, कोपरी-पाचपखाडी,ओवळा-माजीवडा, ठाणे शहर, मीरा-भाईंदर, भिवंडी ग्रामीण, भिवंडी पूर्व, भिवंडी पश्चिम, कल्याण ग्रामीण, डोंबिवली, कल्याण पूर्व, कल्याण पश्चिम, उल्हासनगर, अंबरनाथ, मुरबाड आणि शहापूर असे १८ विधानसभा मतदारसंघ येतात. यंदाच्या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना रंगणार असल्याचे चित्र असून काही ठिकाणी मनसेने उमेदवार उभे केल्याने तिरंगी लढत होण्याची चिन्हे आहेत. तीन दिवसांपूर्वी भाजपने पहिली यादी जाहीर करत ठाणे शहरमधून संजय केळकर, डोंबिवलिमधून रविंद्र चव्हाण, एरोलीमधून गणेश नाईक, भिवंडी पश्चिमेतून महेश चौगुले, मुरबाडमधून किसन कथोरे या विद्यमान आमदारांना उमेदवारी दिली. तर, कल्याण पूर्वेमध्ये आमदार गणपत गायकवाड यांच्या पत्नी सुलभा गायकवाड यांना उमेदवारी दिली. उल्हासनगरमध्ये भाजपने अद्याप उमेदवार जाहीर केलेला नाही. मात्र, ही यादी जाहीर होताच या मतदार संघामध्ये निवडणूक लढण्यासाठी इच्छुक असलेल्या शिंदे सेनेच्या काही पदाधिकारी नाराज झाले असून त्यांनी आता उमेदवारी अर्ज घेत अपक्ष निवडणूक लढण्याची तयारी सुरू केली आहे.

ठाणे शहरांमध्ये भाजप उमेदवार संजय केळकर यांच्याविरोधात शिंदे सेनेचे माजी नगरसेवक संजय भोईर, माजी महापौर मीनाक्षी शिंदे यांच्यासह भाजपचे माजी नगरसेवक मिलिंद पाटणकर यांनी अपक्ष निवडणूक

लढण्याची तयारी सुरू केली आहे. कल्याण पूर्वमध्ये सुलभा गायकवाड यांच्याविरोधात शिंदेंच्या सेनेचे पदाधिकारी महेश गायकवाड अपक्ष निवडणूक लढण्याची तयारी सुरू केली आहे. मुरबाडमध्ये किसन कथोरे यांच्याविरोधात निवडणूक लढण्यासाठी शिंदेच्या सेनेतील सुभाष पवार यांनी पक्षाला रामराम ठोकत राष्ट्रवादी (शरद पवार गटात) प्रवेश करून उमेदवारी घेतली आहे. याच मतदारसंघात शिंदेच्या सेनेचे वामन म्हात्रे हेसुद्धा अपक्ष निवडणूक लढण्याची तयारी करत आहेत. एरोलीमध्ये भाजपचे गणेश नाईक यांच्याविरोधात शिंदेच्या सेनेचे पदाधिकारी विजय चौगुले हे अपक्ष निवडणूक लढण्याच्या तयारीत आहेत.

शिंदेच्या शिवसेनेने जाहीर केलेल्या पहिल्या यादीतील ४५ उमेदवारांमध्ये ठाणे जिल्ह्यातही कोपरी- पाचपखाडी, ओवळा-माजीवडा वगळता एकही उमेदवार जाहीर केलेला नाही. कोपरी-पाचपखाडीमधून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना तर, ओवळा-माजीवडामधून प्रताप सरनाईक यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. ठाणे शहरात शिंदेच्या सेनेतील इच्छुकांनी बंडखोरी करण्याची तयारी सुरू केल्यामुळे भाजपचे माजी नगरसेवक भरत चव्हाण यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याविरोधात निवडणूक लढण्याचा इशारा दिला आहे. या बंडखोरांमुळे महायुतीच्या नेत्यांची डोकेदुखी वाढली असून या बंडोबांना थंड करण्याचे मोठे आव्हान महायुतीपुढे आहे.

कल्याण पश्चिम मतदारसंघातून विद्यमान आमदार विश्वनाथ भोईर यांना अद्याप उमेदवारी जाहीर केलेली नाही. महायुतीच्या जागा वाटपात ही जागा शिंदेच्या सेनेला मिळणार असून या मतदारसंघातून शिंदेच्या सेनेचे शहरप्रमुख रवी पाटील हे इच्छुक आहेत. त्यांना उमेदवारी मिळाली नाहीतर ते बंडखोरी करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार हेसुद्धा बंडखोरी करण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे इथे उमेदवारी जाहीर होताच, बंडखोरी होण्याची चिन्हे आहेत.

नवी मुंबई: भीषण अपघातात तीन ठार

नवी मुंबई, दि. २७. : प्रतिनिधी

आज पहाटे वाशी खाडी पुलावर झालेल्या भीषण अपघात दोन पुरुष आणि एका महिलेचा मृत्यू झाला आहे. मुंबई मार्गिकेवर सदर अपघात झाला असून अपघातात मृत्यू झालेल्याची नावे अद्याप समोर आलेली नाहीत.

पनवेल कडून मुंबईच्या दिशेने एक एर्टीगा गाडी जात होती. पहाटे साडे चारच्या सुमारास गाडी चालकाचे वेगावरील नियंत्रण सुटले आणि गाडीने समोरील एका चालत्या डंपरला जोरदार धडक दिली. अपघात एवढा भीषण झाला की गाडीतील एक पुरुष आणि एका महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे. अपघातग्रस्त गाडी बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली आहे. पुढील कारवाई वाशी पोलीस करीत आहेत. अशी माहिती वाहतूक पोलीस निरीक्षक दिलीप गुजर यांनी दिली.

दिव्यांग व्यक्ती, विद्यार्थी व पालक बनविलेल्या दिवाळी वस्तूंच्या प्रदर्शनाला उत्तम प्रतिसाद

नवी मुंबई, दि. २७ : प्रतिनिधी

नवी मुंबई महानगरपालिकेचे ईटीसी दिव्यांग शिक्षण, प्रशिक्षण व सेवा सुविधा केंद्र हे एकाच छताखाली सर्व प्रकारच्या दिव्यांगांना सामावून घेणारे देशातील अग्रगण्य केंद्र म्हणून नावाजले जाते आहे. केंद्रामार्फत दिव्यांग सक्षमीकरणासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येत असतात.

असाच एक अभिनव उपक्रम दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर राबविण्यात आलेला असून या अंतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांनी ईटीसी केंद्रात तसेच पालकांच्या मदतीने घरी बनविलेल्या दिवाळी सणामध्ये उपयोगी असणा-या वस्तूंचे प्रदर्शन महापालिका मुख्यालयात आणि ईटीसी केंद्रात आयोजित करण्यात आले होते.

यामध्ये महापालिका अधिकारी, कर्मचारी तसेच मुख्यालयाला व केंद्राला कामानिमित्त भेट देणा-या नागरिकांनी मोठया संख्येने या

प्रदर्शनाला भेट देत दिव्यांगांनी बनविलेल्या आकर्षक वस्तूंची प्रशंसा केली तसेच या वस्तूंची खरेदीही केली.

या प्रदर्शनाच्या ठिकाणी 20 नोव्हेंबर रोजी होत असलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृती करणारे विविध संदेश असलेले फलक प्रदर्शित करण्यात आले होते.

महानगरपालिकेच्या ईटीसी केंद्रामध्ये 15 ते 18 वयोगटातील दिव्यांग विद्यार्थ्यांनी पूर्व व्यावसायिक प्रशिक्षण दिले जात आहे. हे प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या कौशल्याला वाव मिळावा व त्यांना स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने प्रेरणा मिळावी या करिता प्रशिक्षण व रोजगार ही कार्यप्रणाली प्रभावीपणे राबविली जात आहे.

या अंतर्गत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिव्यांग विद्यार्थ्यांनी केंद्रात तसेच घरी पालकांच्या मदतीने बनविलेल्या दिवाळीत उपयोगी वस्तूंचे प्रदर्शन महापालिका मुख्यालयात आणि ईटीसी केंद्रात उपआयुक्त श्रीम. संघरत्ना खिल्लारे यांच्या पुढाकारातून भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाला लाभलेल्या उत्तम प्रतिसादामुळे दिव्यांग विद्यार्थी व व्यक्ती यांच्या आत्मविश्वासात भर पडली असून त्यांना वस्तू विक्रीतून रोजगारही उपलब्ध झालेला आहे.

पुणे जिल्ह्यातील 38 मतदान केंद्रे दुर्गम भागात, 'मोबाइल नेटवर्क'ही मिळेना

पुणे, दि. २७ : प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीसाठी ८ हजार ४१७ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आलेली आहेत. त्यापैकी ३८ मतदान केंद्रे दुर्गम ठिकाणी असून, त्या ठिकाणी संप्रेषण सुविधा सक्रिय नाही. त्यामुळे जिल्ह्यात दूरसंचार सेवा देणाऱ्या कंपन्यांनी दुर्गम भागातील मतदान केंद्रांवर संप्रेषण सुविधा उपलब्ध करण्याची सूचना उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा दळणवळण आराखड्याच्या समन्वय अधिकारी शमा पवार यांनी केली. दूरसंचार सेवा देणाऱ्या कंपन्याच्या प्रतिनिधींबरोबर जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत पवार बोलत होत्या. जिल्हा माहिती अधिकारी तथा जनसंपर्क व प्रसिद्धी कक्षाचे समन्वय अधिकारी डॉ. रवींद्र ठाकूर उपस्थित होते. श्रीमती पवार म्हणाल्या, की मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी संप्रेषण सुविधा सक्रिय असणे आवश्यक आहे. दूरसंचार सेवा कंपन्यांनी दुर्गम भागातील ३८ मतदान केंद्रांपैकी किती ठिकाणी 'मोबाइल नेटवर्क' पोहोचते याची पडताळणी करावी. नेटवर्क उपलब्ध होत असल्यास कार्यालयास माहिती द्यावी. त्यानुसार सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांना सूचना देऊन पर्यायी व्यवस्था करता येईल. निवडणूक प्रचारासाठी राजकीय पक्ष, उमेदवार तसेच त्रयस्थ व्यक्तींकडून विविध माध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असतो. एकाच वेळी मोठ्या प्रमाणात लघुसंदेश (बल्क एसएमएस) पाठवणे, ध्वनिमुद्रित केलेले श्राव्य संदेश, समाज माध्यमे, इंटरनेट संकेतस्थळावरून प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण, संनियंत्रण समितीकडून प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे.

भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदार संघात महायुतीत बिघाडी

कपिल पाटील समर्थक स्नेहा पाटील यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल

भिवंडी, दि. २७ : प्रतिनिधी

भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघात महायुतीमध्ये बिघाडी झाली असून भाजपा कडून बंडखोरी करीत भाजपा युवती मोर्चाच्या तालुकाध्यक्ष काल्हेर ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच स्नेहा देवेंद्र पाटील यांनी जोरदार शक्ती प्रदर्शन करीत गुरुवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.यावेळी भिवंडी तालुका ग्रामीण मधील भाजपाचे यशवंत सोरे,निलेश गुरव,पदाधिकारी कार्यकर्ते मोठा संख्येने सहभागी झाले होते.भिवंडी ग्रामीणचे दहा वर्ष आमदार पद भूषवलेले शांताराम मोरे यांनी शिवसेनेतील भंडारी नंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत साथ दिली आहे.असे असतानाही महायुती कडून अजूनही त्यांच्या नावाची घोषणा होत नाही.याच दरम्यान भाजपाच्या युवती मोर्चाच्या तालुकाध्यक्ष असलेल्या स्नेहा देवेंद्र पाटील यांनी गुरुवारी जोरदार शक्तिप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज भरला.यावेळी त्यांच्या सोबत तालुक्यातील भाजपाचे जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य सरपंच व भाजपाचे भाजपा व्यापारी आघाडी ठाणे ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष यशवंत सोरे, निलेश गुरव,छत्रपती पाटील यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामुळे भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदार संघात महायुती मध्ये बंडखोरी आता अटळ झाली असून या बंडाळीचा फटका नक्की कोणाला बसतो हे येणारा काळच ठरवणार आहे.अशिक्षित आमदार असल्यामुळे विधानसभेत भिवंडी ग्रामीण भागातील प्रश्न त्यांच्याकडून मांडले गेले नाहीत आणि त्यामुळे या भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील विकास मागील १० वर्षांपासून खुंटला असेल फक्त पाणी आणि रस्ते हे प्रश्नच महत्वाचे नसून या भिवंडी आणि वाडा या भागातील आदिवासी पाड्या वस्त्यांवरील महिलांचे प्रश्न सुद्धा अत्यंत गंभीर आहेत.त्यांना मी नक्कीच वाचा फोडेल आणि त्यामुळे संपूर्ण मतदारसंघातील समर्थक माझ्यासोबत असल्यामुळे विजय माझा नक्कीच होईल,असा विश्वास अपक्ष उमेदवार स्नेहा देवेंद्र पाटील यांनी व्यक्त केला आहे.

बडोदा मुंबई महामार्गाच्या माथेरान डोंगरातील दुसऱ्या बोगद्याचे काम पूर्ण

पनवेल, दि. २७ : प्रतिनिधी

बडोदा मुंबई महामार्गाच्या शेवटच्या पॅकेजमधील माथेरान डोंगर रांगांखालील शिरवली गावालगतचा पहिल्या बोगद्याचे खोदकाम ऑगस्ट महिन्यात आरपार झाल्यानंतर दूसरा बोगद्याचे खोदकाम कधी पुर्ण होईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. १६ ऑक्टोबरला दूस-या बोगद्याचे खोदकाम आरपार झाल्याची माहिती राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या प्रकल्प संचालकांनी 'लोकसत्ता'ला दिली. सध्या या मार्गावर युद्धपातळीवर रस्त्याचे बांधकाम सूरु असून जुलै २०२५ पर्यंत हे काम पुर्ण करण्याच्या जोरदार हालचाली प्राधिकरणाकडून सूरु आहेत.या दुहेरी बोगद्यामुळे आणि प्रशस्त महामार्गामुळे काही मिनिटांत बदलापूर येथील नागरिकांना पनवेल, उरण जेएनपीटी बंदरामध्ये आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पापर्यंत पोहचता येणार आहे.

सिडकोची दक्षिण नवी मुंबई म्हणजेच नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्राला (नैना) थेट दिल्लीशी जोडणारा मुंबई बडोदा या महामार्गामुळे पनवेल नगरीचे अर्थकारण बदलणार आहे. पुढील ९ महिन्यात या रस्त्याचे बांधकाम पुर्ण करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने कंबर कसली आहे. सूमारे सव्वा चार किलोमीटर अंतरावर दुहेरी बोगद्याचे काम ६० टक्के पुर्ण झाले आहे. तसेच हा महामार्गाचे शेवटच्या पॅकेज क्रमांक १७ चे सरासरी ४५ टक्के काम पुर्ण झाले आहे. यासाठी १४०० कोटी रुपये खर्च केला जात आहे. पावसाळा संपल्यावर पुन्हा एकदा कामाने गती पकडली आहे. दुहेरी बोगदा आरपार करण्याचे काम ठरविलेल्या मुदतीपेक्षा अगोदर पुर्ण झाल्याने प्राधिकरणाच्या कामाविषयी समाधान व्यक्त केले जात आहे. पॅकेज १७ हा ९.६ किलोमीटर अंतराचा असून बदलापूरच्या भोज गावापासून ते पनवेलमधील मोरबे गावापर्यंत हा रस्ता बांधला जाणार आहे. यामध्ये ४.३९ किलोमीटरचे दुहेरी भोगदे माथेरान डोंगररांगांखालून खोदले आहेत. १३ मीटर उंच आणि २३ मीटर रुंदीच्या या दुहेरी बोगद्यात ८ वेगवेगळ्या मार्गिका असतील.

विरार अलिबागचे भूसंपादनच रखडलेबडोदा मुंबई महामार्गाचे पॅकेज क्रमांक १७ चे बांधकाम पुढील ९ महिन्यात पुर्ण करण्यासाठी जोरदार प्रयत्न सूरु आहेत. मात्र या पॅकेजनंतर हा महामार्ग विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेला पनवेलच्या मोरबे गावाजवळ जोडला जाणार आहे. विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेसाठी निधीची अडचण निर्माण झाल्याने या महामार्गासाठी भूसंपादनाचा मोबदला एमएसआरडीसी पनवेलच्या शेतक-यांना देऊ शकली नाही. त्यामुळे भूसंपादनच रखडल्याने विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेचे बांधकामाविषयी साशंकता निर्माण झाली आहे. मोरबे ते कोन गावापर्यंत हे काम एमएसआरडीसी करण्याचे नियोजित होते. त्यासाठी निविदा प्रक्रिया पार पडली. एमएसआरडीसीने मोरबे गावातील अनेक शेतक-यांना नूकसान भरपाईची रक्कम दिली. मात्र मोरबे गावानंतर अनेक गावांचे भूसंपादन रखडल्याने या बहुउद्देशीय मार्गिकेच्या कामाचा श्रीगणेशा होऊ शकला नाही. कर्ज मिळाल्यानंतर निधी उपलब्ध झाल्यानंतरच एमएसआरडीसी या मार्गाचे काम हाती घेऊ शकेल.

देहविक्री व्यवसायातून बाहेर पडत साकारले "स्वयंरोजगाराचे प्रकाशपर्व" देहविक्री करणाऱ्या महिलांकडून पणत्यांची विक्री

ठाणे, दि. २७ : प्रतिनिधी

देहविक्रय सारख्या व्यवसायाच्या दलदलीतून बाहेर पडून दिवाळी उत्सवाच्या वेळी मोठ्या संख्येने पणत्यांची विक्री करून स्वयंरोजगाराची प्रकाशमय वाट भिवंडी येथील हनुमान टेकडी परिसरात देहविक्री करणाऱ्या महिलांनी धरली आहे. गेल्या काही वर्षांपासून या महिला दिवाळी उत्सवाच्या काळात काही हजार पणत्यांची विक्री करून उत्तम अर्थार्जन करत आहेत. यंदाही या महिलांनी पाच ते सहा हजार पणत्यांची सजावट करून त्याची विक्री केली आहे. तर या अभिनव उपक्रमात श्रीसाई सेवा या सामाजिक संस्थेचा मोलाचा वाटा आहे. भिवंडी येथील हनुमान टेकडी परिसर रेड लाइट एरिया म्हणुन प्रचलित आहे. या परिसरात देहविक्री करणाऱ्या महिलांचे वास्तव्य आहे. या महिलांना देहविक्री व्यवसायातून बाहेर काढून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी श्रीसाई सेवा संस्था आणि त्यांच्या संस्थापक डॉ. स्वाती सिंग या १५ वर्षांपासून कार्यरत आहे. या महिलांनी स्वत:च्या पायावर उभे राहून आत्मनिर्भर व्हावे याकरिता जिल्हा बालविकास विभागाबरोबरच संस्था विविध उपक्रम राबवित असतात. याच अंतर्गत दिवाळी सणानिमित्त या महिलांना काही वर्षांपुर्वी पणत्या सजावट करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. मागील सात वर्षांपासून या महिला आकर्षक पणती सजावट करतात. यंदाही पणत्या सजावटीचे काम करण्यात आले. या महिलांनी सुमारे पाच ते सहा हजार पणत्यांना आकर्षक रंगांनी रंगवून सुरेख सजावट केली आहे. नवरात्रीनंतर या कामास सुरूवात झाली. या पणत्या विविध आकारात उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. विविध रंगसंगतीने त्यांना सजावण्यात आले. अगदी स्वस्त दरात या पणत्या विक्रीसाठी बाजारपेठांमध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या पणत्या विक्री साठी सरकारी अधिकारी, संस्थेचे सभासद तसेच एका महाविद्यालयाच्या सहभाग होता.

भिवंडीतील हनुमान टेकडी परिसरात, सुमारे दहा ते पंधरा वर्षांपासून देहविक्री करणाऱ्या महिलांच्या पुनर्वसनासाठी सामाजिक बांधिलकी म्हणून ही संस्था कार्यरत आहे. या संस्थेमार्फत महिलांच्या सर्व समस्यांवर काम केले जाते आणि त्यांना पुनर्वसनाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेतले जाते. जिल्हा महिला व बालविकास विभागासोबत मिळून या महिलांच्या कल्याणासाठी विविध उपक्रम राबवले जातात. महिलांना सॅनिटरी पॅड, सर्जिकल कॉटन, आणि डिस्पोजेबल प्लेट्स तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जाते, जेणेकरून त्या स्वावलंबी बनू शकतील. याशिवाय, संस्थेतर्फे त्यांच्या मुलांसाठी 'डे केअर सेंटर' देखील चालवले जाते.

पतीच्या टोमण्यांना वैतागुन महिला पोलीसाची आत्महत्या

पनवेल, दि. २७ : प्रतिनिधी

नवी मुंबई पोलीस दलात कार्यरत असणा-या एका महिला पोलीसाने पतीच्या वेळोवेळीच्या वागणूक आणि टोमण्यांना वैतागुन आत्महत्येचा मार्ग निवडला. मंगळवारी दुपारी ही घटना मैरथॉन नेक्सॉन सोसायटीमधील झेनिथ या इमारतीमध्ये घडली.

मृत महिला पोलीसाचे नाव स्नेहा गोडसे असे आहे. २६ वर्षीय स्नेहा या पती २८ वर्षीय आकाशसोबत मैरथॉन सोसायटीत राहत होत्या. आकश हा आयटी कंपनीत कामाला होता. तेथील एका महिलेसोबत त्याचे अनैतिक संबंध असल्याचे स्नेहाला समजल्यावर स्नेहा आकाशला त्या महिलेसोबत बोलू नको, असे सांगत होती. मात्र आकाशला स्नेहा ही अनेक दिवसांपासून अडचण वाटू लागली होती. स्नेहा यांच्या बहिणीने दिलेल्या तक्रारीनूसार स्नेहाला आकाश हा वारंवार टोमणे मारत होता.

आकाश हा त्या महिलेसोबत बोलणारच, तू मला नको आहेस, तू मेलीस तर उलट बरे होईल. ती महिला सूशिक्षित आणि मोठ्या पगाराची नोकरी असल्याने स्नेहाची गरज नसल्याचे वारंवार सांगत असल्याने स्नेहा व आकाश यांच्यात भांडणे वाढली होती. मंगळवारी दुपारी साडेबारा वाजता स्नेहा ही गळफास घेऊन आत्महत्या केली. वारंवार याबाबत स्नेहा तीच्या नातेवाईकांना आकाशच्या अनैतिक संबंधाबद्दल आणि आकाशकडून होत असलेल्या वागणूकीबद्दल माहिती दिली होती. पोलीसांकडे अनेकदा तक्रार केली होती. परंतू आकाशवर त्याचा काही परिणाम झाला नाही. आकाश त्याचा अनैतिक संबंधाचा हट्ट सोडत नसल्याने मंगळवारी तीने आत्महत्येचा मार्ग निवडला. पोलीसांनी आकाशविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा मार्ग निवडला आहे.

शुभमंगल सावधान ठरले अव्वल

कलासागरच्या एकांकिका बहुभाषी नाट्य महोत्सवाचा समारोप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७

कला सागर या सांस्कृतिक, साहित्यिक, सामाजिक व शैक्षणिक संस्थेतर्फे व विदर्भ हिंदी साहित्य संमेलनच्या सहकार्याने आयोजित सहा दिवसीय एकांकिका बहुभाषी नाट्य महोत्सवाचा समारोप शुक्रवारी पार पडला. या महोत्सवात सादर झालेल्या वत्सल क्रिएशन सा. मंडळ नागपूरच्या शुभमंगल सावधान या नाटकाने प्रथम क्रमांक पटकावला तर कलाकुंज बहुउद्देशीय संस्था नागपूरचे सुसाईड पॉईंटने द्वितीय व अद्वैत बहुउद्देशीय संस्था अमरावतीच्या चित्रांगदा या एकांकिकेने तृतीय क्रमांक पटकावला.

झांशी राणी चौकातील स्व. रामगोपाल माहेश्वरी सभागृह, मोर हिंदी भवन येथे झालेल्या या महोत्सवात नागपूर, वर्धा, अमरावती येथील नाट्यसंस्थांनी मराठी, हिंदी, सिंधी, उर्दू अशी विविध भाषांच्या एकांकिका प्रस्तुत केल्या.

पुरूष अभिनयाची पहिली दोन पारितोषिके मेरी मुनिया साठी प्रवीण पांडे, शुभमंगल सावधानसाठी आकाश दुधनकर यांनी पटकावली तर महिला अभिनयाची पहिली दोन पारितोषिके शुभमंगल सावधान साठी रसिका गोंधळे व चला निघायची वेळ झाली, करिता अस्मिता पाटील यांनी पटकावली. बालकलाकार म्हणून ऋतुजा गोमासे यांनी प्राप्त केली. सर्वश्रेष्ठ प्रकाशयोजना सौरभ कांबळे, सर्वश्रेष्ठ ध्वनी संयोजनासाठी हर्ष नगभिदे यांना गौरविण्यात आले.

रंगभूमी परिनिरीक्षण मंडळाचे सदस्य संजय भाकरे, बिल्डर्स एसोसियेशनचे अध्यक्ष राजे बरई, लक्ष्मी नगर झोन महानगर पालिका हेल्थ ऑफिसर डॉ. सुनील कांबळे आणि सरस्वती पॅथालॉजी लॅब अँड रिसर्च सेंटरचे प्रो.डॉ. विनोद जैसवाल या मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पुरस्कार वितरीत करण्यात आले. यावेळी कलासागरचे संस्थापक व मुख्य संरक्षक पद्म नायर, अध्यक्ष रविशेखर गिल्लुरकर, कार्याध्यक्ष सुशील तिवारी, उपाध्यक्ष प्रा. दीपक कडू, सचिव रमेश बारस्कर यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

अद्वैत बहुउद्देशीय संस्था, अमरावतीच्या चित्रांगदाकरिता अद्वैत तराळ ला पुरस्कार देण्यात आला. सर्वश्रेष्ठ हास्य कलाकाराची पहिली दोन बक्षिसे मनीष चौधरी व रीत बन्सी यांना तर सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकासाठी श्याम आस्करकर व

मतदार जागृतीसाठी स्वयंसहायता गटांनी पुढाकार घ्यावा : डॉ. रंजना लाडे

स्वीप अंतर्गत महिला बचत गटांची बैठक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७

नागपूर शहरातील सहाही विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा व जास्तीत जास्त नागरिकांनी मतदानासाठी बाहेर पडावे याकरिता स्वयंसहायता गट, महिला बचत गटांच्या सदस्यांनी पुढाकार घेत मतदार जनजागृती कार्यक्रमात आपला सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन मनपाच्या उपायुक्त डॉ. रंजना लाडे यांनी केले.

सिस्टिमेटिक व्होटर्स एज्यूकेशन अँड इलेक्ट्रॉल पार्टीसिपेशन अर्थात स्वीप कार्यक्रमांतर्गत नागपूर महानगरपालिकाद्वारे शहरातील विविध स्वयंसहायता गट, महिला बचत गटांच्या प्रतिनिधीची बैठक घेण्यात आली. मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात आयोजित बैठकीत मनपाच्या उपायुक्त डॉ. रंजना लाडे यांनी महिला बचत गटाच्या सदस्यांशी संवाद साधला. यावेळी श्री. विजय त्रिकोलवार श्रीमती नूतन मोरे यांच्यासह महिला बचत गटाच्या सदस्यता प्रामुख्याने उपस्थित होत्या.

मनपाच्या उपायुक्त डॉ. रंजना लाडे यांनी सांगितले की, विधानसभा निवडणुकीत नागपूर शहरातील मतदानाचा टक्का वाढावा याकरिता महिलांची महत्वाची भूमिका असणार आहे. बचत गटाच्या महिलांचा दररोज नागरिकांशी थेट संपर्क असतो त्यामुळे त्यांनी केलेल्या मतदानाच्या आवाहनाला महिला थेट प्रतिसाद देऊ शकतात. तरी मतदानाच्या दिवशी जास्तीत जास्त नागरिकांनी मतदानासाठी बाहेर पडावे याकरिता मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी महिला बचत गटाच्या सदस्यांनी पुढकार घ्यावा व मनपाद्वारे स्वीप अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमात सक्रीय सहभाग नोंदवावा, असे आवाहन डॉ. लाडे यांनी केले.

अवैध धंद्यांवर शहर पोलिसांची धाड

नागपूर : विधान सभा निवडणुकीदरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये म्हणून पोलिसांनी कंबर कसली आहे. पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी गुन्हे शाखेसह सर्व ठाणेदारांना अवैध धंदे आणि गुन्हेगारांवर अंकुश लावण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार, शहर पोलिसांनी वेगवेगळ्या भागात छापेमारी करून अवैध दारू विक्रेता आणि सट्टापट्टी चालविणाऱ्यांवर कारवाई केली आहे. तसेच असामाजिकतत्वांची धरपकडही सुरू झाली आहे.

गुन्हे शाखा युनिट 3 च्या पथकाने पारडीच्या तुळशीनगर भागात राहणाऱ्या स्वप्निल विनायक चुनोडे (25) याच्या अवैध दारू अड्ड्यावर धाड टाकली. त्याच्याकडून देशी दारूच्या 505 बॉटल आणि 40 लीटर मोहाच्या दारूसह एक लाख रुपयांचा माल जप्त केला.

कपिलनगर पोलिसांनी पिवळी नदीच्या भंते आनंद कौशल्याननगरात सविता शिवप्रसाद शिवबंशी (51) वर धाड टाकून 20 बॉटल देशी दारू जप्त केली. इमामवाडा पोलिसांनी रोहणबाग परिसरात ललिता रामा उपरेशकर (54) हिच्यावर धाड टाकून 9 बॉटल जप्त केल्या. नवीन कामठी पोलिसांनी भीमनगर परिसरात राहणाऱ्या विनय दिगांबर मेश्राम (40) कडून 29 बॉटल जप्त केल्या.

हुडकेश्वर पोलिसांनी दिघोरी नाका परिसरात राहणाऱ्या अकील खान शकील खान (30) याला तलवार, तर सिद्धेश्वरीनगर झोपडपट्टीत राहणाऱ्या मोहित उर्फ मच्छी अंतराम धुर्वे (43) याला चाकूसह अटक केली. नंदनवन पोलिसांनी घरसंसार लेआऊट परिसरात संशीम उर्फ सश्या विनायक उके (24) याला चाकूसह पकडले.

धंतोली पोलिसांनी प्रेमनगर परिसरात राहणाऱ्या संजय प्यारे शाहू (52) याला भाल्याच्या पात्यासह फिरताना पकडले. गुन्हे शाखा युनिट 3च्या पथकाने जुनी मंगळवारी परिसरात सट्टापट्टीचा धंदा करणाऱ्या जितू उर्फ जितेंद्र सुधाकर पौनिकर (47) याला खायवडी करताना अटक केली. त्याच्याकडून रोकड आणि मोबाईलसह 12,250 रुपयांचा माल जप्त करण्यात आला.

मध्यवर्ती कारागृहातील वयोवृद्ध पुरुष व महिला कैद्यांसाठी ऑथोर्पेडिक वैद्यकीय तपासणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७

नागपूर हाऊस ऑफ मेरी इमॅक्युलेट, नागपूर तर्फे नागपूर मध्यवर्ती कारागृहातील वयोवृद्ध पुरुष व महिला कैद्यांसाठी ऑथोर्पेडिक (ऑर्थो) वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात कैद्यांची तपासणी करण्यासाठी ऑर्थो मेडिकल ऑफिसर, फिजिओथेरपिस्ट मेडिकल ऑफिसर व इतर नर्सिंग ऑफिसर यांच्यामार्फत विशेषतः कारागृहातील वयोवृद्ध पुरुष कैदी व महिला कैद्यांची तपासणी करून त्यांना आवश्यक औषधे पुरविण्यात आली. या वैद्यकीय तपासणी शिबिरासाठी डॉ.राहुल अग्रवाल, डॉ.सर्वेंद्र सिंग, डॉ.पंकज रघुते, डॉ.रितेश मानकर, डॉ.उत्कर्षा यांच्यासह डॉ.लिसी कुरियन, उन्नती बोबडे, आराधना पॉल, सिस्टर मार्था, सिस्टर रीना, डॉ. आणि नागपूर हाऊस ऑफ मेरी इमॅक्युलेट, सिस्टर वनिता, संस्थेच्या अध्यक्षा प्रामुख्याने उपस्थित होत्या. आजकालच्या जीवनात गुडघेदुखी, पाठदुखी, सांधेदुखी, सांधेदुखी, मणक्याचे जुनाट आजार, पायाला सूज येणे किंवा मुंग्या येणे व इतर हाडांचे विकार अशा अनेक आजारांकडे दुर्लक्ष केले जाते, त्यामुळे त्यांना बाहेरच्या शासकीय रुग्णालयात पाठवणे शक्य होत नाही विशेष ऑथोर्पेडिक तज्ञ एनजीओ द्वारे सांगितले जाते. (ऑर्थो) यांनी वैद्यकीय तपासणी व औषधी शिबिराचे आयोजन केले असून सदर शिबिरात 247 पुरुष कैद्यांची व 75 महिला कैद्यांची तपासणी व उपचार करण्यात आले. वैभव आगा, अधीक्षक नागपूर मध्यवर्ती कारागृह नागपूर बोलत होते. सदर शिबिराच्या यशस्वीतेसाठी या कार्यालयाच्या सामाजिक कार्यकर्त्या मीना लाटकर यांनी मोलाचे सहकार्य केले.

कंपनीचा मालक असल्याचे सांगून ९८ लाखांचा गंडा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७

ठकगाजाने कंपनीचा मालक असल्याची बतावणी करून लेखापालाला विश्वासात घेतले. तत्काळ पैसे द्यायचे असल्याचे सांगून वेगवेगळ्या खात्यांमध्ये 98 लाख रुपये वळते करून घेतले. मोठ्या रकमेचा व्यवहार झाल्याने तपास केला असता फसवणूक झाल्याचे पुढे आले. या प्रकरणी पोलिसांनी राजेश देविदास भापकर (51) रा. दसरा रोड, महालच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. बजाजनगरच्या जेपी चेंबरमध्ये नीतेश गुप्ता यांच्या एजीके रिफॅक्टोरिज लिमिटेड कंपनीचे कार्यालय आहे.

या कार्यालयात फियार्दी राजेश हे गत 26 वर्षांपासून लेखापाल म्हणून कामाला आहे. 24 ऑक्टोबर रोजी अज्ञात आरोपीचा राजेश यांना फोन आला. त्याने कंपनीचा मालक नीतेश गुप्ता असल्याची बतावणी करून चॅटिंग सुरू केली. या दरम्यान आरोपीने राजेश यांना सांगितले की, त्याने एक मोठी डील केली आहे. ती डील फायनल करण्यासाठी तत्काळ पैसे पाठवायचे आहेत. ठकबाजाला मालक समजून राजेश यांनी त्याने सांगितलेल्या खात्यांमध्ये 98 लाख रुपये वळते केले. मोठ्या रकमेचा व्यवहार झाल्याने कंपनीचे वरिष्ठ अधिकारी आणि मालकाने राजेश यांना विचारपूस केली असता फसवणूक झाल्याचे समजले. घटनेची तक्रार बजाजनगर पोलिसात करण्यात आली. पोलिसांनी आयटी ॲक्टसह फसवणुकीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

ॲसिड फेकण्याची धमकी

नागपूर : एका तरुणाने विद्यार्थिनीला दुसऱ्या तरुणासोबत दिसल्यास किंवा बोलल्यास चेहऱ्यावर ॲसिड फेकण्याची धमकी दिली. ही घटना जरीपटका पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली. पोलिसांनी 15 वर्षीय पीडितेच्या तक्रारीवरून आरोपी ध्रुव शाहू (रा. समतानगर) आणि त्याच्या 2 साथीदारांवर गुन्हा नोंदविला आहे. पीडित बालिका दयानंद कॉलेजमध्ये बारावीची विद्यार्थिनी आहे. शुक्रवारी सकाळी ती मत्रिणीसोबत कॉलेजला जात होती. कॉलेजच्या बाहेरच ध्रुव आणि त्याच्या दोन साथीदारांनी पीडितेचा रस्ता अडवत शिविगाळ सुरू केली.

महाराष्ट्रातील वाघिणीचे ओडिशात कृत्रिम स्थलांतर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७

ताडोबा-अंधारी व्याघ प्रकल्पातील दोन वाघिणीचे ओडिशातील सिमिलीपाल व्याघ्रप्रकल्पात स्थलांतर करण्यात येणार आहे. त्यातील एका वाघिणीला जेरबंद करण्यात यश आले असून ओडिशाला रवाना करण्यात आले आहे. तर दुसऱ्या वाघिणीला दिवाळीनंतर जेरबंद करून ओडिशात पाठवण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातून इतर राज्यात वाघाच्या कृत्रिम स्थलांतरणाचा हा कदाचित पहिलाच प्रयोग असण्याची शक्यता आहे.

सिमिलीपालमधील वाघांच्या संख्येला पूरक म्हणून महाराष्ट्रातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातून दोन वाघीण स्थलांतरित करण्याचा निर्णय ओडिशा वनविभागाने घेतला. ओडिशा वनखात्याने सिमिलीपाल व्याघ प्रकल्पातील वाघांची आनुवंशिक विविधता सुधारण्यासाठी इतर व्याघ्र प्रकल्पातून दोन वाघिणी स्थलांतरित करण्याची परवानगी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाकडे मागितली होती. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीची कालमयार्दा सुरुवातीला ३१ ऑक्टोबर होती.

सिमिलिपाल व्याघ्रप्रकल्पाचे क्षेत्र संचालक प्रकाश चंद्र गोगिनेनी व इतर वनाधिकाऱ्यांचा समावेश असलेले पथक दोन वाहनांसह ताडोबात दाखल झाले.

स्थलांतर प्रक्रियेतील इतर बाजू समजून घेण्यासाठी ओडिशा वनखात्याची सहा जणांची चमू नवेगाव-नागझिरा व्याघ्रप्रकल्पात प्रशिक्षणासाठी पाठवण्यात आली. यात पहिल्या फळीतील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचा समावेश होता. ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पातील वाघांमध्ये सिमिलीपालच्या वाघांशी काही आनुवंशिक समानता असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे ताडोबातील वाघ याठिकाणी स्थलांतरित केल्यास सिमिलीपालमधील वाघांच्या संख्येतील आनुवंशिक विविधता सुधारण्यास मदत होऊ शकते. याच दृष्टिकोनातून या प्रकल्पासाठी ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पाची निवड करण्यात आली.

सिमिलीपाल दक्षिण व उत्तर विभागातील वनकर्मचारी तसेच एक जीआयएस तज्ज्ञ यांचा समावेश असलेली चमू रेडिओ कॉलर ट्रॅकिंगसह स्थलांतरणाच्या विविध पैलूंचे प्रशिक्षण घेत आहे. ताडोबातून स्थलांतर करून ओडिशात आणल्या जाणाऱ्या वाघिणीच्या हालचालींचा मागोवा घेण्यासाठी त्यांना रेडिओ कॉलर केले जाईल आणि त्यासाठीच हे प्रशिक्षण त्यांना दिले जात आहे.

महाराष्ट्राच्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील एका वाघिणीचे शनिवारी ओडिशातील सिमिलीपाल व्याघ्र प्रकल्पात स्थलांतर करण्यात आले.

या व्याघ्रप्रकल्पातील नवेगाव परिसरातून टी १५८ या वाघिणीला शनिवारी सकाळी नऊ वाजताच्या सुमारास बेशुद्ध करून जेरबंद करण्यात आले. या वाघिणीचे वय सुमारे तीन वर्षे आहे. तिला रेडिओ कॉलर करण्यात आले.

२ गांजा विक्रेते गुन्हे शाखेच्या जाळ्यात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७

गुन्हे शाखा युनिट 2 च्या पथकाने गोपनिय माहितीच्या आधारे दोन गांजा विक्रेत्यांना अटक केली. झडतीमध्ये त्यांच्याजवळ 1 किलो 911 ग्रॅम गांजा मिळाला. त्यांचे दोन साथीदार फरार आहे. आकाश जयगोपाल खांडेकर (24) आणि शरद रामू भोयर (24) दोन्ही रा. बडेगाव, कुही अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. फरार आरोपी असलम उर्फ भुरू दाऊद खान रा. राणी भोसलेनगर, भांडे प्लॉट आणि रॉनी राजपूत रा. किसिंगा, ओडिशाचा शोध सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही आरोपी गत काही महिन्यांपासून भांडे प्लॉट परिसरात भाड्याने खोली करून रहात होते. शुक्रवारी रात्री गुन्हे शाखेचे पथक गिट्टीखदान ठाण्यांतर्गत गस्तीवर होते. दरम्यान काटोल रोडवर पोलिस परिवहन कार्यालयाजवळ दोन गांजा विक्रेता कोणाला तरी माल विकण्यासाठी येत असल्याची माहिती पथकाला मिळाली.

या माहितीच्या आधारावर पोलिसांनी परिसरात सापळा रचला. आकाश आणि शरद यांना मालासह पकडण्यात आले.

चौकशीत आरोपींनी सांगितले की, माल ओडिशाच्या रॉनी राजपूतने नागपुरात पाठविला होता. अर्धा माल असलम भुरू याने ठेवला तर उर्वरित त्यांना दिला. पोलिसांनी माल जप्त करून दोन्ही आरोपींना पुढील कार्यवाहीसाठी गिट्टीखदान पोलिसांच्या स्वाधिन केले.

फरार रॉनी आणि असलमचा शोध सुरू आहे. चारही आरोपींवर एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

१२ अतिरिक्त विशेष ट्रेन धावणार

नागपूर : रेल्वे दिवाळी व छट पूजा सणानिमित्त नागपूर - पुणे , लोकमान्य टिळक टर्मिनस- संत्रागाची जं. दरम्यान १२ अतिरिक्त उत्सव विशेष ट्रेन धावणार असल्याची माहिती मध्य रेल्वेकडून देण्यात आहे. रेल्वेतील गर्दी लक्षात घेवून हा निर्णय घेण्यात आला आहे. यात प्रामुख्याने गाडी क्र. ०१२०१/०१२०२ नागपूर -पुणे - नागपूर द्वि-साप्ताहिक विशेष एक्सप्रेस तसेच गाडी क्र. ०१२०१ नागपूर - पुणे द्वि-साप्ताहिक उत्सव विशेष नागपूर येथून २८ ऑक्टोबर, ४ व ७ नोव्हेंबर रोजी १९.४० वाजता सुटेल आणि पुणे येथे दुसऱ्या दिवशी ११.२५ पोहचेल. गाडी क्र.०१२०२ पुणे - नागपूर द्वि-साप्ताहिक उत्सव विशेष एक्सप्रेस पुणे येथून २९ ऑक्टोबर, १ व ५, ८ नोव्हेंबर या तारखेला १५.३० वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी ६.३० वाजता पोहचेल. या गाडीला नागपूर, वर्धा, धामणगाव, बडनेरा, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, मनमाड, कोपरगाव, बेलापुर, अहमदनगर, दौंड कॉर्ड लाईन उरुळी असे थांबे देण्यात आले आहे. याशिवाय गाडी क्र ०११०७/०११०८ लोकमान्य टिळक टर्मिनस- संत्रागाची जं.- लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष ट्रेन सोडण्यात येणार आहे. गाडी क्र.०११०७ लोकमान्य टर्मिनस - संत्रागाची जं. साप्ताहिक उत्सव विशेष लोकमान्य टिळक टर्मिनस येथून २९ऑक्टोबर आणि ५ नोव्हेंबर रोजी २०.१५ वाजता सुटेल तर नागपूरला दुसऱ्या दिवशी १०.१५ पोहचेल. गाडी क्र.०११०८ संत्रागाची जं.- लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक उत्सव विशेष जं. येथून ३१ ऑक्टोबर आणि ७ नोव्हेंबर या तारखेला १५.५० वाजता सुटेल.

वसतिगृह प्रवेशातील विशेष कोटा रद्द

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७

समाज कल्याण विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या वसतिगृहांमध्ये १५ टक्के जागा विशेष कोट्याच्या माध्यमातून भरल्या जात होत्या. परंतु, ही पद्धत बेकायदेशीर असून सर्व विद्यार्थ्यांना गुणवत्ता आधारित प्रवेश देण्यात यावे, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ऑगस्टमध्ये दिले होते. या आदेशाच्या तीन महिन्यानंतर अखेर राज्य शासनाने हा विशेष कोटा रद्द करण्यासाठीचे परिपत्रक काढले आहे.

उच्च न्यायालयात वसतिगृहातील प्रवेश प्रक्रियेबाबत जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने १५ टक्क्यांच्या विशेष कोट्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. समाज कल्याण विभागांच्या वसतिगृहांमध्ये प्रवेशाबाबत खास बाब नावाने हा कोटा राखीव होता. यात १० टक्के जागा राज्य शासन आमदार-खासदार किंवा इतर लोकप्रतिनिधींच्या शिफारसीने भरत होत.

उर्वरित ५ टक्के जागा भरण्याचा अधिकार सहायक आयुक्तांकडे होता. या विशेष कोट्यातून जागा भरताना गुणवत्तेचा विचार होत नसल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले होते. अशाप्रकारची तरतूद कायद्याच्या चौकटीत व तर्कसंगत असायला हवी, असे मत व्यक्त करत हा विशेष कोटा रद्द करण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. अखेर समाज कल्याण विभागाने याबाबत २२ ऑक्टोबर रोजी परिपत्रक काढत हा कोटा रद्द करण्यात आल्याचे सांगितले.

राज्यातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी असलेली २८ वसतिगृहे वगळता हा निर्णय इतर सर्व वसतिगृहांना लागू होईल, असेही यात स्पष्ट करण्यात आले आहे. न्यायालयाच्या हस्तक्षेपांनतर शासकीय वसतिगृहात प्रवेशास इच्छुक विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

समाज कल्याण विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या वसतिगृहांमध्ये ऑफलाईन पद्धतीने प्रवेशप्रक्रिया राबवली जात होती. ही प्रक्रिया पारदर्शक आणि निष्पक्ष नसल्याचे मत व्यक्त करत न्यायालयाने प्रक्रिया ऑनलाईन करण्याचे आदेश दिले होते. यानंतर समाज कल्याण आयुक्तांनी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन झाल्याबाबतचे शपथपत्र न्यायालयात दाखल केले होते. वसतिगृहात प्रवेशासाठी खासबा विशेष कोटा अंतर्गत प्रवेश दिला जातो. या कोटाबाबत न्यायालयाने सुनावणीत प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.

खासबा अंतर्गत प्रवेश शिफारशीवर नव्हे तर गुणवत्ता आधारित करण्याची सूचना न्यायालयाने केली होती. सुनावणी दरम्यान प्रत्यक्ष उपस्थित असलेले समाज कल्याण आयुक्त यांनी याबाबत सकारात्मक पाऊल उचलण्याची ग्वाही न्यायालयाला दिली होती. सुनावणी दरम्यान समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त सिद्धार्थ गायकवाड, सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे देखील उपस्थित होत्या.

गेमिंग झोनमध्ये चोरी

नागपूर: चोरांनी एका गेमिंग झोनचे कुलूप तोडून 1.23 लाख रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना कळमना पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी हरप्रित सुखदेव सिंग (30) रा. वैशालीनगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. हरप्रितचे भरतवाडा मार्गावर गुलमोहर चौकात इंटरनेट कॅफे आणि गेमिंग झोन आहे. रात्री 10 वाजताच्या सुमारास तो दुकान बंद करून घरी गेला होता. मध्यरात्रीला चोरांनी शटरचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. टीव्ही, हार्ड डिस्क, मोबाईल आणि गेमिंगच्या साहित्य चोरी करून पसार झाले.

दुसऱ्या दिवशी हरप्रित दुकानात पोहोचले असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली.

Change Of Name

MY OLD NAME WAS **NISHAT BEGUM.** NOW MY NEW NAME IS **NISHAT BANO SYED FAZAL SIBTAIN.**
ADD. : BHALDARPURA NAGPUR 440018.

PUBLIC NOTICE

NOTICE are hereby given that the below mentioned Authorised Person are no longer affiliated as Authorised Person of Kotak Securities Limited.

Authorised Person Name	Trade Name	Exchange Registration Numbers of Authorised Person	Address of Authorised Person
DARSHAN SANTOSH RATHI	DARSHAN SANTOSH RATHI	NSE - AP0291111561 BSE - AP01067301116636	Gharaunda House, No 11 Heda, Colony Camp, Amravati-444601
FARUKH ISMAIL SHEIKH	FARUKH ISMAIL SHEIKH	NSE - AP0291108661	Plot No 57 Ring Road Near Haroon, Kabadi Gousiya Collony Bada, Tajbag Hudkeshwar BK Mhalginagar, Nagpur-440034
PRAVIN SATISH KHURANA	PRAVIN SATISH KHURANA	NSE - AP0291564471	B 801 Godrej Anandam Ashok, Chowk Near Model Mill Compound, Ganeshpeth Mahatma Fule Bazar, Nagpur-440018
RATHI KRISHNAKUMAR MANSUK	RATHI KRISHNAKUMAR MANSUK	NSE - AP0291112561 BSE - AP01067301118500	303 Devisha Apartment, Infront of Shivaji Market, Ravi Nagar Amravati City, Amravati-444605
SHUBHAM INVESTMENT	SHUBHAM INVESTMENT	NSE - AP0291102342 BSE - AP0106730198327	Block 103 First Floor, 667 692 Somwari Bazar Road Automoive Building, Opp Anand Talkies Telipura Sita Buldi, Nagpur-440012

Please note that above mention Authorised Person (AP) are no longer associated with us. Any person henceforth dealing with above mention AP should do so, at their own risk. Kotak Securities Ltd. shall not be liable for any such dealing. In case of any queries for the transactions till date, Investors are requested to inform Kotak Securities Ltd. within 15 days from the date of this notification, failing which it shall be deemed that there exists no queries against the above mentioned AP.

kotak Kotak Securities Limited. Registered Office: 27 BKC, C 27, G Block, Bandra Kurla Complex, Bandra (E), Mumbai 400051. CIN: U99999MH1994PLC134051, Telephone No.: +22 43360000, Fax No.: +22 67132430. Website: www.kotak.com / www.kotaksecurities.com. Correspondence Address: Infinity IT Park, Bldg. No 21, Opp. Film City Road, A K Vaidya Marg, Malad (East), Mumbai 400097. Telephone No: 42856825. SEBI Registration No: INZ000200137(Member of NSE, BSE, MSE, MCX & NCDEX) , AMFI ARN 0164, PMS INP000000258 and Research Analyst INH000000586. NSDL/CDSL : IN-DP-629-2021. Compliance Officer Details: Mr. Hiren Thakkar Call: 022 - 4285 8484, or Email: ks.compliance@kotak.com.

मनसेची कसोटी...

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) प्रमुख राज ठाकरे यांचे चिरंजीव अमित ठाकरे यांची उमेदवारी मुंबईतील माहीम विधानसभा मतदारसंघातून जाहीर झाली आणि यंदाच्या निवडणुकीच्या मैदानात मनसे आपली सर्व प्रतिष्ठा पणाला लावणार असल्याचे राज ठाकरेंनी संकेत दिले. मनसेची स्थापना सन २००६ मध्ये झाली तेव्हा या नव्या पक्षाचे मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक आणि कोकणात मोठे आकर्षण होते. सन २००९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत मनसेचे तेरा आमदार निवडून आले होते. मनसेला मिळालेल्या यशाने शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपा या सर्वच पक्षांना तेव्हा आश्चर्याचा धक्का बसला होता. राज ठाकरे यांच्या नेतृत्वाचे शहरी भागातील मतदारांना आजही आकर्षण आहे. पण २००९ नंतर आजतागायत या पक्षाला विधानसभा निवडणुकीत पुन्हा असे यश मिळाले नाही. राज ठाकरे यांच्या सभांना आजही प्रचंड गर्दी जमते. सत्ता मिळण्याची शक्यता दिसत नसताही त्यांच्या सभांना लोक गर्दी करतात. मराठी वृत्तवाहिन्या त्यांच्या सभांचे थेट प्रक्षेपण करतात, कारण त्यांच्या भाषणांना टीआरपी मोठा असतो. त्यांच्या सभांना होणाऱ्या गर्दीचे मतांमध्ये मात्र रूपांतर होत नाही, हेच मनसेचे मोठे दुःख आहे. सामाजिक प्रश्नांवर सर्वाधिक आंदोलने करणारा पक्ष म्हणून मनसेची ओळख आहे. पण पक्ष संघटना बांधणीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे आणि पक्षाची भूमिका वेळोवेळी बदलत असल्यानेच मतदारांचा विश्वास संपादन करण्यात मनसेला अपयश येत असावे.

ठाकरे परिवारातील आता चौथी पिढी सार्वजनिक जीवनात उतरलेली दिसते. स्वत: शिवसेनाप्रमुखांनी शेकडो सामान्य शिवसैनिकांना नगरसेवक, आमदार, खासदार, महापौर, मंत्री, केंद्रीयमंत्री केले. मनोहर जोशी व नारायण राणे यांना मुख्यमंत्रीपदाच्या सिंहासनावर बसवले. पण स्वत: शिवसेनाप्रमुखांनी कधीही कोणतीही निवडणूक लढवली नाही किंवा सत्तेचे पद स्वीकारले नाही. मनसेप्रमुख राज यांच्याकडे हाच गुण आहे, त्यांनी स्वत: कोणतीही निवडणूक लढवलेली नाही.

शिवसेनाप्रमुखांकडे सर्वपक्षीय नेत्यांची ऊठबस असायची, देशातील दिग्गज नेते मातोश्रीवर त्यांना भेटायला यायचे. राज ठाकरे यांचेही शरद पवारांपासून नरेंद्र मोदी-अमित शहांपर्यंत सर्वांशी व्यक्तिगत संबंध आहेत. पण शिवसेनाप्रमुख किंवा मनसेप्रमुखांनी आपल्या विचारांशी कधी तडजोड केली नाही. जे आवडले त्याचे दोघांनी मुक्तकंठाने कौतुक केले पण जे मान्य नाही, त्यावर दोघांनी कठोर प्रहार केले. बाळासाहेब ठाकरे किंवा राज ठाकरे यांना गृहीत धरून कोणालाही राजकारण करता आलेले नाही. राज ठाकरे हे आमचे मित्र आहेत, असे सांगणारे सर्वच पक्षात अनेक नेते आहेत, पण त्यांना राज यांना गृहीत धरून राजकारण करता आलेले नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विकासाचा अजेंडा आणि दूरदृष्टी याचे राज यांनी अनेकदा कौतुक केले पण त्यांनी घेतलेल्या नोटाबंदी निर्णयावर कडाडून टीकाही केली होती.

महाराष्ट्रनामा

सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@gmail.com

यंदा लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मुंबईत महायुतीच्या प्रचारासाठी मोठी सभा झाली. लोकसभा निवडणुकीत राज ठाकरे यांनी मोदींना विनाअट पाठिंबा दिला होता. पंतप्रधानांच्या सभेला राज हे व्यासपीठावर होतेच पण मोदींच्या अगोदर त्यांना भाषणाची संधी देऊन भाजपाने त्यांचा सन्मानही राखला. मोदींना पाठिंबा देताना त्यांनी जाहीरपणे मुंबई व महाराष्ट्राचे प्रमुख प्रश्न मांडले व निवडून आल्यानंतर मुंबई-महाराष्ट्राकडे लक्ष द्या, अशी अपेक्षा व्यक्त केली. व्यासपीठावर पंतप्रधानांची स्तुती करणारी नेहमीच भाषणे होत असतात. तुमच्या आशीर्वादानेच सारे काही चांगले घडत आहे, असे व्यासपीठावरील अन्य नेते भाषणातून ठसवून सांगत असतात. पण निवडून आल्यानंतर महाराष्ट्राचे प्रश्न सोडवा, असे पंतप्रधानांच्या समोर दुसरा कोणी नेता सांगू शकतो का? मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा अशी मागणी याच सभेत राज ठाकरे यांनी जाहीरपणे पंतप्रधानांकडे केली होती. महिन्याभरापूर्वी केंद्राने निर्णय जाहीर केला तेव्हा वृत्तवाहिन्यांच्या कॅमेऱ्यासमोर घाईघाईने येऊन पंतप्रधानांचे अभिनंदन करणारे वेगळेच दिसले...

राज ठाकरे यांचे आक्रमक नेतृत्व व प्रभावी वक्तृत्व यामुळे राजकारणात त्यांचे आकर्षण तरुण वर्गाला मोठे आहे. मनसेच्या स्थापनेला अठरा वर्षे झाली, पण मनसेला अजून बाळसे धरता आले नाही. संघटनेच्या वाटचालीत यशापेक्षा अपयश जास्त आहे. चढावापेक्षा उतारच संघटनेने जास्त अनुभवले. पण राज ठाकरे कधी निराश झाले असे दिसले नाहीत. मी काही कमविण्यासाठी पक्ष काढलेला नाही, मला माझ्या स्वप्नातील महाराष्ट्र घडवायचा आहे, असे सांगत त्यांनी दि. ९ मार्च २००६ रोजी दादर येथील शिवतीर्थावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापना केली. शिवसेनेत असताना उद्धव ठाकरे यांचा उदय झाला व त्यांचे महत्त्व वाढू लागले तसे राज ठाकरे यांना दूर ठेवण्याचा पद्धतशीर प्रयत्न सुरू झाला. शिवसेनाप्रमुखांच्या हयातीतच हे सर्व घडले. उद्धव ठाकरे हे शिवसेनेचे सन २००३ मध्ये कार्याध्यक्ष झाल्यापासून राज यांना निर्णयप्रक्रियेतून डावलण्यास सुरुवात झाली. २००४ च्या निवडणुकीतही राज यांनी केलेल्या उमेदवारांच्या शिफारसींना जेव्हा डावलले गेले तेव्हापासून त्यांच्यात अस्वस्थता वाढली. शिवसेनेत घुसमट वाढू लागल्यावर, विठ्ठलाला बडव्यांनी घेरले आहे, असे सांगत ते शिवसेनेतून बाहेर पडले. गेल्या तीन दशकांत शिवसेनेतून छगन भुजबळ, गणेश नाईक, नारायण राणेंपासून एकनाथ शिंदेंपर्यंत अनेक दिग्गज नेत्यांनी मातोश्रीचा निरोप घेतला. ते सर्व वेगवेगळ्या पक्षात गेले. सत्तेच्या परिघात त्यांचा राजकीय प्रवास आजही चालूच आहे. पण राज ठाकरे यांनी कोणत्याही दुसऱ्या पक्षात न जाता स्वत:चा स्वतंत्र वेगळा पक्ष स्थापन केला, हे त्यांचे वेगळेपण आहे.

सन २००७ मध्ये मनसेने महापालिका निवडणूक लढवली, यश मिळाले नाही पण मते बऱ्यापैकी घेतली. नंतरचा काळ मनसे विविध आंदोलनामुळे गाजली. रेल्वे भरतीत मराठीला प्राधान्य मिळावे, मराठी चित्रपटांना हक्काचे स्थान मिळावे, शालेय अभ्यासक्रमात मराठी भाषा अनिवार्य असली पाहिजे, मोबाईल व लोकल्स ट्रेनमध्ये मराठीतून सूचना मिळाली पाहिजे, दुकाने व अस्थापनांवर मराठीतून पाट्या लागल्या पाहिजेत, अशा आंदोलनांनी मनेसने मुंबई दणाणून सोडली.

सन २००९ मध्ये मनसेने लोकसभा निवडणूक लढवली. मनसेच्या काही उमेदवारांना एक ते दीड लाख मते मिळाल्यावर अन्य पक्षांनाही त्याची दखल घ्यावी लागली. त्याच वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत मनसेचे तेरा आमदार निवडून आले. ही आजवरची मनसेची सर्वात मोठी कमाई म्हटली पाहिजे. हर्षवर्धन जाधव (कन्नड), उत्तमराव ढिकले व वसंत गीते (नाशिक), मंगेश सागळे (विक्रोळी), प्रकाश भोईर (कल्याण), शिशिर शिंदे (भांडुप), राम कदम (घाटकोपर), प्रवीण दरेकर (मागाठाणे), बाळा नांदगावकर (शिवडी), नितीन सरदेसाई (माहीम), रमेश वांजळे (खडकवासला) अशा आमदारांनी इतिहास घडवला. उत्तमराव ढिकले नि रमेश वांजळे हयात नाहीत, पण मनसेच्या तिकिटावर आमदार झालेले अन्य नेते आज कुठे आहेत, काही वेगळ्या पक्षांत गेले, काही नंतर पुन्हा आमदारही झाले.

सन २०१० मध्ये मनसेला इंजिन हे अधिकृत चिन्ह मिळाले. सन २०१२ मध्ये मुंबई महापालिकेत मनसेचे २८ नगरसेवक निवडून आले. नाशिक महापालिकेत मनसेचे ४० नगरसेवक विजयी झाले. नाशिकला महापौर आणि पुणे महापालिकेत विरोधी पक्षनेता म्हणून मनसेने स्थान मिळवले. पण २०१४ पासून मनसेचा आलेख घसरत गेला. २०१२ मध्ये रझा अकादमीच्या मोर्चाने आजाद मैदानावर धुडगूस घातला, रस्त्यावरील शेकडो वाहनांची आंदोलकांनी मोडतोड केली, महिला पोलिसांचे विनयभंग झाले. त्यानंतर मनसेने अडीच लाखांचा काढलेला विराट निषेध मोर्चा अजून मुंबईकर विसरलेले नाहीत. २०१९ च्या निवडणुकीत राज ठाकरे यांनी लाव रे तो व्हीडिओ म्हणत व लोकांना पडद्यावर दाखवत सभांचा धडाका लावला होता. पण त्याचा अपेक्षित लाभ मनसेला झाला नाही.

मराठी अस्मिता व मराठी माणसांचे हित हा तर मनसेचा पाया आहे. मोदींचे समर्थन जरूर केले पण न पटणाऱ्या मुद्द्यावर भाजपाला विरोधही केला. मशिदींवरील लाऊड स्पिकर्स हटवा अशी मागणी करण्याची हिम्मत राज ठाकरेच दाखवू शकतात. अंगावर भगवी शाल पांघरून हिंदुत्ववादी प्रतिमाही त्यांनी पुढे आणली. मोदी-शहांच्याशी त्यांचे थेट संबंध आहेत. एकनाथ शिंदे व नारायण राणे हे त्यांचे निकटवर्तीय आहेत.

यंदाच्या निवडणुकीत मनसे स्वबळावर उतरली आहे. मनसेच्या अस्तित्वाची ही निवडणूक आहे. राज्यात महायुती विरुद्ध महाआघाडी असा रणसंग्राम चालू असताना एकाच वेळी या दोन्ही शक्तींशी त्यांना लढायचे आहे. शिवसेना व उबाठा सेनेशी सामना करीत अमित ठाकरे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणणे हे मनसेपुढे आव्हान आहे. विधानसभेत चांगले स्थान निर्माण करणे ही मनसेची कसोटी आहे.

भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा !

मागील वर्षी बाघ बकरी चहा कंपनीचे संचालक पराग देसाई यांचा भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला होता. पराग देसाई यांचा असा वेदनादायी अंत खरोखरीच दुर्दैवी होता. पराग देसाई यांच्या मृत्यूनंतर भटक्या कुत्र्यांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला होता. पराग देसाई यांच्यावर भटक्या कुत्र्यांनी हल्ला केल्यावर स्वतःचा बचाव करताना पराग देसाई अडखळून पडल्याने त्यांच्या डोक्याला मार लागला त्यातच त्यांचा दुर्दैवी अंत झाला. पराग देसाई यांचा मृत्यूने संपूर्ण राज्य हळहळले. पराग देसाई हे प्रसिद्ध उद्योगपती होते त्यामुळे त्यांच्या मृत्यूची बातमी झाली न्युज चॅनलवर त्याची ब्रेकिंग न्युज झळकली होती तेंव्हा अशी अपेक्षा होती की भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रशासनातर्फे ठोस पावले उचलण्यात येतील मात्र ही अपेक्षा फोल ठरली कारण भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रशासनातर्फे कोणतेही ठोस पावले उचलण्यात आली नाहीत. उलट भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढतच चालला आहे. भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात मृत्यू झालेले पराग देसाई हे देशातील पहिले व्यक्ती नसून याआधीही अशा अनेक घटना घडल्या आहेत. आपल्या देशात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात दररोज सहा हजारांहून अधिक लोक जखमी होतात अशी सरकारी आकडेवारी आहे. दररोज सहा हजारांहून अधिक लोक जर भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी होत असेल तर ती मोठी गंभीर बाब आहे. केवळ शहरातच नाही देशातील गावागावात भटक्या कुत्र्यांची मोठी दहशत आहे. गाव असो वा शहर, चाळ असो वा सोसायटी, पायवाट असो वा महामार्ग, चौक असो वा नाका सर्वत्र तुम्हाला भटक्या कुत्र्यांच्या झुंडीच्या झुंडी उभ्या असलेल्या दिसतील. हे भटके कुत्रे रस्त्यांवरून जाणाऱ्या लोकांवर अचानक हल्ला करतात. विशेषतः शाळकरी मुले , वृध्द, अपंग व महिलांना भटके कुत्रे टार्गेट करतात. दबा धरून बसलेले भटके कुत्रे अचानक घेराव घालून हल्ला करतात. भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात लोक अक्षरशः रक्तबंबाळ होतात. भटक्या कुत्र्यांच्या चावण्याने रेबीज नावाचा रोग होतो या रोगावर जर वेळीच उपचार केला नाही तर रोगी दगावण्याची देखील शक्यता असते मात्र अनेक सरकारी रुग्णालयात रेबीज वरील लसच उपलब्ध नसते. ग्रामीण भागात तर हे नेहमीचेच चित्र आहे. भटक्या कुत्र्यांची दहशत केवळ रस्त्यांवरून जाणाऱ्या लोकानांच आहे असे नाही तर पाळीव प्राण्यांना देखील आहे. शेळी, मेंढी, कोंबड्या यासारख्या पाळीव प्राण्यांवर देखील भटकी कुत्री हल्ले करतात. भटक्या कुत्र्यांच्या झुंडी अचानक येऊन पाळीव प्राण्यांचा फडशा पाडतात. भटक्या कुत्र्यांचा त्रास वाहन चालकांना देखील होतो विशेषतः दुचाकी स्वारांना भटके कुत्र्यांची मोठी दहशत आहे. रस्त्यांवर दुचाकी दिसली की भटके कुत्रे वाहनांच्या मागे धावतात, वाहनांना आडवे येतात त्यामुळे बऱ्याचदा अपघात होतो आणि त्या अपघातात वाहन चालक जखमी होतात त्यामुळे भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा अशी मागणी सर्व सामान्य नागरिकांकडून होत असते मात्र त्यावर प्रशासन गंभीर नसते. खूपच मागणी झाली किंवा प्रसार माध्यमातून आवाज उठवला तर दिखाव्यासाठी कारवाई केली जाते. भटक्या कुत्र्यांचे निर्बिजिकरण नियमित केले जाते असे प्रशासनामार्फत सांगितले जाते मात्र वस्तुस्थिती वेगळीच आहे. जर भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण नियमित केले जाते तर मग देशातील भटक्या कुत्र्यांची संख्या का वाढत आहे असा प्रश्न आहे. एकट्या मुंबई शहराचे उदाहरण घेऊ. २०१४ साली मुंबईत ९५ हजार भटकी कुत्री होती आज त्यांची संख्या १ लाख ६४ हजार इतकी आहे याचाच अर्थ मागील , नऊ वर्षात मुंबईतील भटक्या कुत्र्यांची संख्या ७२ टक्क्यांनी वाढली. जर भटक्या कुत्र्यांची संख्या अशीच वाढत राहिली आणि त्यांचे नागरिकांवर होणारे हल्ले देखील वाढत राहिले तर भविष्यात मानव विरुद्ध भटकी कुत्री असा संघर्ष निर्माण होऊ शकतो तो होऊ द्यायचा नसेल तर शासन, प्रशासनाने भटक्या कुत्र्यांची संख्या कमी करण्यासाठी ठोस उपाय योजायला हवेत. केवळ निर्बिजीकरण केल्याने भटक्या कुत्र्यांची संख्या कमी होणार नाही हे सिद्ध झाले आहे.

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

प्राणीमित्र संघटनांनीही या प्रश्नाकडे मानवतेच्या दृष्टिकोनातून पाहायला हवे. भटक्या कुत्र्यांना सहानुभूती दाखवताना त्यांच्या हल्ल्यात जखमी होणाऱ्या नागरिकांकडे देखील सहानुभूतीने पाहायला हवे. आपल्या देशात २००१ साली प्राणी कल्याण कायदा लागू झाला या कायद्यानुसार भटक्या कुत्र्यांना संरक्षण मिळाले. भटक्या कुत्र्यांना ते आहेत त्या ठिकणापासून कोणीही हलवू शकत नाही शिवाय त्यांना त्याच ठिकाणी खायला घालणे अनिवार्य करण्यात आले. या कायद्यामुळे भटक्या कुत्र्यांना तर संरक्षण मिळाले पण नागरिकांना भटक्या कुत्र्यांपासून होणारा उपद्रव वाढला. भविष्यात हा उपद्रव आणखी वाढणार आहे . म्हणूनच या कायद्याचा मान राखून नागरिकांना भटक्या कुत्र्यांपासून होणारा उपद्रव कसा रोखता येईल यासाठी कोणता मध्यममार्ग काढता येईल यासाठी सरकारने एक समिती नेमावी. प्राणीमित्र संघटनेच्या सदस्यांसह, तज्ज्ञांचा समावेश या समितीत करावा. या समितीने योग्य मार्ग काढून भटक्या कुत्र्यांना संरक्षण देऊन त्यांच्यापासून नागरिकांना होणारा उपद्रव थांबवावा.

आत्म्याची हाक

संत राजिंदर सिंह जी महाराज

आपल्याला असं वाटतं की, आपण आपल्या विचारांना, वचनांना आणि कृतीला परमात्म्यापासून लपवु शकतो, परंतु आपण असे करू शकत नाही. आपण काय करतो, हे परमात्म्याला ठाऊक नाही असं आपल्याला वाटतं. एखाद्या वेळी जेव्हा आपण कोणावर क्रोधीत होऊ, कोणा च्या भावनांना आपल्या वचनांमुळे ठेच पोहोचली किंवा कोणत्या जीवाला यातना दिल्या, तर आपण लक्षात ठेवावे की प्रभु आपल्याला पाहात आहेत. आपल्याला या बाबींवर विचार केला पाहिजे की अशा कृती नंतर आपल्याला कसे वाटते. आपण शांत बसल्यास अनुभव होईल की हानीकारक कार्य केल्यानंतर आपणास चांगले वाटत नाही. आपल्याला आत्म्याचे कथन आठवण करून देते की आपण चांगले बनावं किंवा चांगले करावे. एकदा त्या अंतरिक आवाजाशी जोडले जाऊन, आत्मिक आवाजाला ऐकू लागलो तर आपण त्याच बाबींची निवड करू ज्या आपल्याला सन्मार्गावर नेतील. अशाप्रकारे आपणास समजेल की आपली अध्यात्मिक यात्रा अधिक गतिशील होईल.

वसुबारस (गोवत्स द्वादशी) चे महत्त्व

आश्विन वद्य द्वादशी या दिवशी वसुबारस तसेच गुरुद्वादशी हे सण साजरे केले जातात. वसुबारस हा दिवस दिवाळीला जोडून येतो, म्हणून त्याचा समावेश दिवाळीत केला जातो; पण वस्तूतः हा सण वेगळा आहे. या सणाविषयी तसेच यानिमित्ताने गोपालनाचे महत्त्व थोडक्यात जाणून घेऊया.

वसुबारस (गोवत्स द्वादशी)

श्री विष्णूच्या आपतत्त्वात्मक लहरी कार्यरत होऊन ब्रह्मांडात येण्याचा दिवस म्हणजे वसुबारस ! या दिवशी विष्णुलोकातील वासवदत्ता नामक कामधेनु या लहरींचे वहन ब्रह्मांडापर्यंत करण्यासाठी अविरत कार्य करते. या दिवशी या कामधेनूचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करून अंगणात तुळशी वृंदावनाशी धेनु म्हणजेच गाय उभी करून तिचे प्रतिकात्मक रूपात पूजन केले जाते.

या दिवशी आपल्या अंगणातील गाईला वासवदत्तेचे स्वरूप प्राप्त होते, म्हणजेच तिचे एकप्रकारे बारसे होऊन तिला देवत्व प्राप्त होते. यासाठीच या दिवसाला वसुबारस असे म्हणतात. बारस म्हणजे एखाद्या गोष्टीत नवीन चैतन्यबीजाची निर्मिती होणे. हेच देवत्व तिच्या ठायी कायमस्वरूपी विष्णूरूप पाहून जिवाने टिकवायचे असते आणि तिच्यातून प्रक्षेपित होणाऱ्या चैतन्यलहरींचा लाभ उठवायचा असतो.

इतिहास : समुद्रमंथनातून पाच कामधेनू उत्पन्न झाल्या, अशी कथा आहे. त्यातल्या नंदा नावाच्या धेनूला उद्देशून हे व्रत आहे.

उद्देश : या व पुढील अनेक जन्मांतील कामना पूर्ण व्हाव्यात आणि पूजा करत असलेल्या गायीच्या शरीरावर जितके केस आहेत, तितकी वर्षे स्वर्गात रहायला मिळावे.

सण साजरा करण्याची पद्धत : या दिवशी सौभाग्यवती स्त्रिया एकभुक्त राहून सकाळी अथवा सायंकाळी सवत्स गायीची पूजा करतात.

वसुबारस या दिवशी बाहेर पडून सवत्स गायीची पूजा करावी का ? पूजा करणे शक्य नसल्यास काय करावे ? :

वसुबारस या दिवशी बाहेर पडून सवत्स गायीची पूजा करण्यास अडचण असेल, तेव्हा घरी एखादी गायीची मूर्ती असल्यास तिची पूजा करावी. घरी मूर्ती नसल्यास गायीचे पाटावर चित्र काढून त्याची पूजा करावी.

गोपालनाचे महत्त्व ! : पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंचमहाभूतांच्या आधाराने सृष्टीची निर्मिती झाली आणि तिचे चलनवलनही चालू आहे. या पंचमहाभूतांची गाय ही माता आहे. काळाच्या ओघात तिचीच अवहेलना झाल्याने आज सर्वतऱ्हेचे प्रदूषण गंभीररित्या वाढले आहे. हे वेळीच रोखायचे असेल, तर गोरक्षण, गोपालन आणि गो उत्पादनांचे संवर्धन याला पर्याय नाही. एकप्रकारे गोमाता पंचमहाभूतांच्या कुपोषणाची अधिकारिणी आहे. वसुबारस या सणाच्या निमित्ताने गोमातेचे महत्त्व लक्षात घेऊन गोरक्षण, गोपालन आणि गो उत्पादनांचे संवर्धन करण्याचा प्रयत्न करूया.

गुरुद्वादशी : आश्विन वद्य द्वादशी या तिथीला शिष्य गुरूंचे पूजन करतात.

संकलन : **श्रीमती विभा चौधरी**

संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ सण, धार्मिक उत्सव आणि व्रते

संपर्क : ७६२०८३१४८७

मला उमगलेले सर ...!

मानवी जीवन प्रवासात उत्साही मनाच्या व्यक्तीला नेहमीच यषप्राप्ती होते. म्हणुन सकारात्मक आषावादी आणि आनंदी विचार हिच यषस्वी होण्याची गुरूकिल्ली आहे. मनुष्याला जीवनात दिलेली जगण्याची संधी काही लोकांसाठी अलगद निसटुन जाते. पण, शिकविलेल्या शिक्षकामुळे जगण्याची उमेद मात्र कायम राहते. शिक्षक ही शिकविणारी व्यक्ती असुन समाजप्रिय आहे. विद्यार्थी हा राज्यहिताचा, देशहितासाठी व देश संरक्षणासाठी सतत उपयोगी पडावा तसेच एक जागृत नागरीक या नात्याने कार्य करावा हि प्रेरणा देऊन घडवित असतो. शिक्षकांनी शिकविलेल्या कार्याचा वारसा नेहमी अखंडपणे पुढे न्यावा, जेणेकरून परिवारहितार्थ, राज्यहितार्थ व देशाचे हित जोपासल्या जाईल. या विषयाला सतत न्याय मिळत राहावा व शिक्षकाने मनावर बिंबवलेली ती गोष्ट/विचार अखंडपणे स्मरणात राहील.

आयुष्याच्या सोनेरी आकाषात उत्तुंग भरारी घेवुन यषस्वीपणे वाटचाल करणारे चिकाटी, अदम्य ईच्छाषक्ती, त्यागीवृत्ती, सातत्य, प्रामाणिकपणा, अफाट किर्ती, इच्छित ध्येय गाठणारे स्पष्टवक्ता, मनात अनेक इच्छा-आकांक्षा बाळगणारे, समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा याकरीता अधोरात्र प्रयत्न करणारे धडपडी व्यक्तीमत्व म्हणजेच सन्माननीय श्री वा. डो. बाकडे सरांचे नाव घेता येईल. दुसायांना निस्वार्थपणे मदतीचा हात देणारे सागरच, कधीही मुख्याध्यापकाची लालसा न बाळगणे व कटाक्षाने टाळणे, कडक षिस्तीचे समर्पक, मोलाचे व व्यवस्थितपणे प्रामाणिक मार्गदर्षन करने, उत्साही असणे, वारंवार सातत्याने सांगणे व केव्हातरी भेटल्यास निष्चितपणे आठवण करून देणे, विद्याथ्र्यांचा सर्वांगीण विकास व्हावा असा सार्थ प्रयत्न ठेवणे, उत्साही मनाला सतत इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळविण्यासाठी प्रयत्न करणे. ध्येय गाठणे व इच्छीत मनोरथ पुर्ण करणे, इत्यादी विविधांगी व्यक्तीमत्वामुळे विद्याथ्र्यांना मुख्य प्रवाहात आणणे हेच कार्य अखेरपर्यंत करीत होते. यामुळे सर्वच विद्याथ्र्यांना भविष्यात फायदा होऊन यषप्राप्ती झाली व त्यांच जीवन सुखकारक झाले.

किंबहुना शिकवितांनी शिक्षकाला नेहमी बुध्दीचा कस लागतो. कोणत्याही गोष्टी विषयी शिक्षक जेव्हा ज्ञान देत असतो, तेव्हा त्याची आंतरिक इच्छा अशी राहते की, आपण शिकविलेले ज्ञान सतत समाजापुढे नेऊन योग्य रितीने व्यक्त व्हावे. शिकविणीला योग्यपणे न्याय देता येईल. समाजासमोर प्रामाणिकपणाने व्यक्त होता येईल. हे आत्मीक भाव सतत निमार्ण होत असते. सन्माननीय श्रीमान वा.डो. बाकडे (१९४७ नंतर चा काळ) सर हे न्यु आयडियल हायस्कुल, उमरेड येथे षिक्षक असतांना त्यांच्या मनात काहीतरी नविन गोष्ट करावी हा एकच विचार/ध्यास सतत मनात धोंधावत असायचा आणि त्यानुसार नविन शाळा काढण्याचा मार्ग भविष्यात चोखाळला गेला. कारण ज्या शाळेत ते षिक्षक होते, त्या शाळेची जबाबदारी दिवसेंदिवस वाढीस जात होती. सरांच्या त्यागीवृत्तीनी सतत शाळेची भरघोष उन्नती व विकास होत होता. या कार्यात श्री ढोक सर व श्री तोवर सर या समवेत इतर सहकारी मंडळीचे सहकार्य सतत लाभत असे. त्यावेळी त्यांना मिळालेले संस्कार आणि सहका-र्यांचेमाप प्रेम व विष्वास या त्रिवेणी संगमाने पुढील वाटचाल पुर्ण केली. सरांच्या षिक्षकी जीवनांत मातीच्या गोळयाला निव्र्याज प्रेमाणे, विष्वासाने, जिव्हाळाच्या आपुलकीने व्यवस्थित आकार देऊन सुसंस्कारित केले. त्याच व्यक्तीने जणू काही कानात लोहारस टाकावा असा शब्द कानी पडावा. परिणामतः सरांचे मन अक्षरषः जायबंदीच करून टाकले. त्यामुळे सरांचे मन त्या शाळेत मुळीच लागत नव्हते. सरांना हेडमास्तरची संधी असुन सुध्दा गल्लीच्छ राजकारणामुळे व अंतर्गत कलहामुळे मिळेनासी झाली. पण षिक्षकी नोकरीच्या शेवटपर्यंत हेडमास्तरच्या खुर्चीपासुन कटाक्षाने ते दूरच राहीले. हा खरा सरांचा स्वाभिमानच म्हणावा लागेल. अर्थातच, सरांनी मित्र-मंडळीषी सविस्तरपणे चर्चा करून नविन शाळा काढण्याचा मनोदय व्यक्त केला व त्यात सरांना काही दिवसातच यष प्राप्त झाले.

सर्व समावेषक त्या काळचे सन्माननीय व्यक्ती जेष्ठ नागरिकांचे यथायोग्य मोलाचे सहकार्य व आर्थिक मदत मिळाली. नविन शाळा काढण्याचे ध्येयाला वेळीच यष मिळुन १९६३ साली जीवन विकास विद्यालयाची स्थापना झाली. सुरूवातीला फारच कमी विद्यार्थी/विद्यार्थीनी होत्या पण कांही वर्षानी या जीवन विकास विद्यालयाला संघर्षाची, श्रमाची तसेच यषाची गोडफळे लागुन उमरेड शहरासाठी आजुबाजुच्या खेडेगावासाठी षिक्षण घेण्याचा सुर्योदयच उगवला. यासमवेत अगदी काही वर्षानी विद्यार्थीनीची संख्या वाढली असता हे लक्षात घेवुन १९६९ साली जीवन विकास वनिता विद्यालयाचा उगम करण्यात आला. याचे श्रेय श्रीमान बाकडे सरांना जाते. जे निर्णय अवघड असतात, बरेचदा तेच निर्णय नविन कार्यासाठी योग्य ठरतात, भीत-भीत जगण्यापेक्षा ठाम निर्णय घ्या व त्यानुसार वागा त्यामुळे स्वतःच्या हाताने शाळा काढण्याचे समाजपयोगी कार्य सरांच्या हाताने घडले. जीवन विकास विद्यालयाचे श्री प्र.रा.तोवर सर, श्री घाटे सर, श्री सी.मो. झाडे सर, श्री वा.डो. बाकडे सर, श्री सपाटे सर, व इतर सहकारी मंडळी खरे आधारस्तंभ/शाळेचे स्थापनावीर (१९६३/१९६९) होते. या सर्वांना कुठलाही विषय तळमळीने षिकवायची त्यांची हातोटी होती. त्यामुळे सहाजिकच हळुहळु दोन्हीही शाळेची खाया अर्थाने प्रगतीच होत गेली. षिक्षक नेहमी हे एक चांगला समाज विद्यार्थी रूपाने घडविण्याचा प्रयत्न करीत असतो. हिच जाणीव नेहमी विद्याथ्र्यांने ठेवली पाहीजे. हा कटाक्ष नेहमी जगतांनी असला पाहीजे. मात्र जीवनाच्या प्रवासात साथ देणारे, षिक्षकांनी सांगितलेले विचार व जिवलग मित्र असला की, रस्ता कसाही असो जीवन प्रवास सुखकारकच होतो हे मात्र खरे.

जीवन विकास विद्यालयाला व वनिता विद्यालयाला आता चांगले दिवस बघावयास मिळाले. हळुहळु शाळेची प्रगती व विकास होत होता. दरवर्षी ॲडमीषन घेण्यासाठी आजुबाजुच्या खेडयातील असंख्य विद्यार्थी/विद्यार्थीनी उमरेडला षिक्षण घेण्यासाठी येत होते. काही दिवसांनी शाळेचे षिक्षक उच्च ट्रेनींग घेण्यासाठी बाहेरगावी जाते झाले. या समवेत शाळेत साने गुरूजी कथामाला, नाटय, बौध्दिक, सांस्कृतिक, मैदानी खेळ तसेच वार्षिक स्नेहसम्मेलन या माध्यमातुन शाळेने अनेक ठिकाणी षिक्षणाचा ठसा उमटविला. शाळेत टेक्रनींगसाठी बाहेर गावावरून षिक्षक येऊ लागले होते. या टेक्रनींगमध्ये श्रीमान वा.डो. बाकडे सर इंग्रजी षिकविणार असा कटाक्ष नेहमी असायचा. त्यांचे सांगणे याबाबतीत असे होते की, इंग्रजी भाषा समजणे कठीणच आहे. पण, नेहमी सरावांनी धाक नाहीसा होणे, स्वतंत्र उदिष्टये व ध्येय असणे आवष्यक आहे. याखेरीज जिद्द, भिती असणे व भाषेचे गांर्भिय यामुळे आपल्याला भाषा अवगत होते. मात्र, नेहमी स्वतः वेळीच अभिव्यक्त होणे, बोलण्याचा सराव व लिहीण्याची सवय यामुळे आपण इंग्रजी भाषा आपलीसी करू शकतो. या अमुल्य विचारामुळे आम्ही ७ भावा बहिणीची पुढे प्रगतीच झाली. परिणामतः आमची वर्तमानात आर्थिक बाजु गरजेनुसार घट्ट होऊन सरांच्या विचारांनी व प्रेमळ मार्गदर्षनानी सुखी आहोत. आपले व्यक्तीमत्व जर स्वच्छ असेल तर आपल्या अस्तित्वाला सुध्दा लोकांचा सलाम असतो. प्रेम व आनंद देणाया व्यक्ती (षिक्षक) आपल्या सहवासात असणे ही निसर्गाची एक देणगी असते आणि अशा व्यक्ती लाभणे हे आपल्याच सुस्वभावाची अनमोल खरी मिळकत असते. या कारणाने मी जास्त प्रभावित होऊन आज वर्तमान काळात मला माझ्या सर्व काळया फळयावर पांढाया खडूची अक्षरे उमवटत हजारोंच्या आयुष्यात रंग भरणाया शिक्षकांचा सार्थ अभिमान आहे. त्यासाठी विद्यार्थी हा शेवटपर्यंत शिक्षकासमोर विद्यार्थी असतो हे सत्य डोळयास

सोलारवर्ल्ड एनर्जी सोल्युशन्स लिमिटेडने सेबीकडे रु. ६०० कोटींपर्यंतच्या आयपीओसाठी डीआरएचपी फाइल केला

मुंबई, २७ ऑक्टोंबर : क्रिसिल नुसार आर्थिक वर्ष २०२४ साठी ईपीसी व्यवसायातून उत्पन्नाच्या दृष्टीने सौरऊर्जा प्रकल्पांसाठी अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम सेवांमध्ये तज्ज्ञ असलेल्या, अग्रगण्य सौरऊर्जा पुरविणाऱ्या कंपन्यांपैकी एक, सोलरवर्ल्ड एनर्जी सोल्युशन्स लि.ने आपला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस बाजार नियामक सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडियाकडे दाखल केला आहे. कंपनीने छ६,००० दशलक्ष छ६०० कोटी पर्यंतच्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरच्या (आयपीओ) माध्यमातून इक्विटी शेअर्स (प्रत्येकी छ५ चे दर्शनी मूल्य) ऑफरद्वारे निधी उभारण्याची योजना आखली आहे. ऑफर मध्ये ५,५०० दशलक्ष ५५० कोटी पर्यंतच्या समभागांच्या ताज्या इश्यूचा समावेश आहे (ताजा इश्यू) आणि ५०० दशलक्ष ५० कोटी पर्यंतच्या विक्री शेअरधारकांद्वारे विक्रीसाठी ऑफर (विक्रीची ऑफर). रेड हेरिंग प्रॉस्पेक्टसद्वारे ऑफर केले जाणारे इक्विटी शेअर्स बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड वर सूचिबद्ध करण्याचा प्रस्ताव आहे. (सूचीचे तपशील) नुवामा वेल्थ मॅनेजमेंट लिमिटेड आणि एसबीआय कॅपिटल मार्केट्स लिमिटेड या इश्यूसाठी बुक रनिंग लीड मॅनेजर आहेत.

यूट्यूबने भारतात न्यू शॉपिंग अफिलिएट कार्यक्रम सुरू केला

मुंबई, २७ ऑक्टोंबर : ऑनलाइन व्हिडिओ स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म यूट्यूबने भारतात एक नवीन खरेदी संलग्न कार्यक्रम सुरू केला आहे. याद्वारे, निर्माते त्यांच्या व्हिडिओ, शॉर्ट्स आणि लाइव्ह स्ट्रीममध्ये अमेझॉन, फ्लिपकार्ट आणि मिंत्रा यासह इतर ई-कॉमर्सबसाइटशी थेट लिंक करू शकतात, ज्याद्वारे त्यांना कमिशन मिळविण्याची संधी मिळते.

पारंपारिक जाहिरात महसूल, यूट्यूब प्रिमियम आणि ब्रँड सहकार्यासह निर्मात्यांना उत्पन्नाचा अतिरिक्त स्रोत प्रदान करणे हे संबद्ध कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. यासह, निर्मात्यांशी सहयोग करून ब्रँड त्यांच्या दर्शकांपर्यंत सहज पोहोचू शकतात. निर्माते यूट्यूब स्टुडिओद्वारे या कार्यक्रमात प्रवेश करू शकतात पात्र निर्माते यूट्यूब स्टुडिओद्वारे खरेदी संलग्न कार्यक्रमात प्रवेश करू शकतात, त्यांना व्हिडिओ, शॉर्ट्स आणि लाइव्ह स्ट्रीमसह सर्व सामग्री फॉरमॅटमध्ये उत्पादने टॅग करण्याची परवानगी देतात. दर्शक टॅग केलेले उत्पादन पाहू शकतात आणि ई-कॉमर्स वेबसाइटवर प्रवेश करू शकतात आणि ते उत्पादन खरेदी करू शकतात.

विनय कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे सेबीकडे आयपीओसाठी डीआरएचपी दाखल

विनय कॉर्पोरेशन लि. ही कंपनी दुचाकी, तिचा की वाहनांच्या, तसेच प्रवासी व व्यावसायिक वाहनांच्या सुट्या भागांचे डिझाइन व उत्पादन करते; तसेच देशात व परदेशांत ही या उत्पादनांचा पुरवठा करते. कंपनीच्या पोर्टफोलिओ मध्ये स्टीयरिंग व्हील स्विचेस, गियर शिफ्टिंग पॅडल्स, लाइट कंट्रोल युनिट्स, ब्रेक पेडल स्विचेस व सेन्सर्स, मल्टी मीडिया प्लग आणि एअर बॅग ऑन/ऑफ स्विचेस (दृश्यमान किंवा झाकलेले स्विच) अशा मेकॅट्रॉनिक उत्पादनांचा; तसेच वायरिंग हार्नेस, फ्यूज बॉक्स, वायर, केबल्स, टर्मिनल आणि कनेक्टर अशा कनेक्टिव्ह उत्पादनांचा समावेश आहे.

विनय कॉर्पोरेशनने आपला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीएचआरपी) सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) या बाजार नियामक संस्थेकडे दाखल केला आहे. या प्राथमिक समभाग विक्रीच्या ऑफर मध्ये प्रत्येकी १० रुपये दर्शनी मूल्य असलेले व एकुणात १५० कोटी रुपयांची किंमत असलेलेफ्रेश इश्यू मधील इक्विटी शेअर्स आणि कंपनीच्या शेअर होल्डर्सकडे असलेले ऑफर फॉर सेलसाठी उपलब्ध असलेले २२,२१३,८५२ इक्विटी शेअर्स यांचा समावेश आहे. रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस द्वारे ऑफर केले जाणारे इक्विटी शेअर्स बीएसई लिमिटेड (बीएसई) आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एनएसई) या स्टॉक एक्सचेंज वर सूचीबद्ध करण्याचा प्रस्ताव आहे. (सूचीचे तपशील) आयसीआयसीआय सिक्युरिटीज लिमिटेड आणि क्सिस कॅपिटल लिमिटेड हे या इश्यूचे बुक रनिंग लीड मॅनेजर(बीआरएलएम) आहेत.

स्त्री-पुरूषसमानता, नावालाच काहो ?

(राष्ट्रीय कौटुंबिक स्त्रीहिंसाचार प्रतिबंधक कायदा दिन विशेष.)

मुंबई, २७ ऑक्टोंबर : माताभगिनी व लेकीबाळींवर होणाऱ्या कौटुंबिक छळास प्रतिबंध करण्यासाठी केंद्र शासनाने कायदा लागू केला. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम-२००५ व नियम-२००६ हे संपूर्ण भारतात दि.२६ ऑक्टोबर २००६ पासून लागू केले आहे. कायद्याची माहिती नसेल तर त्याचा पीडित भगिनी लाभ घेवू शकत नाही. शास्त्र पुराणातही स्त्रीला स्त्रीशक्ती- आदिशक्ती म्हणून गौरविण्यात आले आहे. देवी शारदा, नवदुर्गा, एकवीरा, लक्ष्मी आदी सर्व ही स्त्रीशक्तीची रुपे आहेत. प्रापंचिक लोक नवरात्रोत्सवात नवरुपांची, दिवाळीत लक्ष्मीची पूजा मोठ्या भक्तिभावाने करतात. भाऊबीजेस बहिणींचा सन्मान-सत्कारकरतात. मग मात्र कुटुंबातील स्त्रीची दैना व अवहेलना का केली जाते? घरी महिलांचा मान-मरातबाखू, तेव्हाच आपले देवी व्रत व लक्ष्मी पूजन कार्यसाधक सिद्ध होईल, अन्यथा पालथ्या घागरीवर पाणी... कौटुंबिक हिंसाचार कशास म्हणावे? ते सर्वसामान्यांना कळवावे, याच शुद्ध हेतुने हा अल्पसा प्रयत्न बापू ऊर्फ श्रीकृष्णदास निरंकारीजी यांनी या लेखप्रपंचातून केलेला आहे... संपादक.

सर्वमंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके शरण्य त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते

वास्तविक स्त्री ज्या परिवारासोबत वा साथीदारासोबत एकाच छताखाली रहात असेल आणि तिचा छळ त्या पुरुष वा परिवाराकडून होत असेल तर ती कौटुंबिक हिंसाचार कायद्यान्वये न्याय दंडाधिकाऱ्याकडे संरक्षण मागू शकते. थोडक्यात पीडित महिला व तिच्या मुलांना निवासाच्या अधिकारासह तिच्या सुरक्षितेचा किंवा आर्थिक संरक्षणाचा आदेश न्यायदंडाधिकारी देवू शकतात. छळापासून संरक्षण मग ते शारीरिक, लैंगिक, आर्थिक, तोंडी किंवा भावनिक अत्याचार असोत, महिलांना त्याविरुद्ध न्याय मागता येतो. शारीरिक छळ म्हणजे काय? तर मारहाण, थोबाडीत हाणणे, तडाखा देणे, चावणे, लाथ मारणे, गुद्दे मारणे, ढकलणे, लोटणे, जोराचा धक्का मारणे, इतर कोणत्याही पध्दतीने शारीरिक दुखापत किंवा वेदना देणे. अशा बाबींचा शारीरिक छळात समावेश होतो. भगिनींना यातून मोलाचा हा सल्ला-

पडला पदर खांदा तुझा दिसतो ग! कमरेला कमरपट्टा कसतो ग बाई कसतो!! तुझ्या तरुणपणाला ग धार! मार भिवईंची काळी कट्यार!! घाव वर्मावरी असा बसतो!!!

तोंडी व भावनिक अत्याचार जसे की अपमान करणे, वाईट नावाने बोलावणे, चारित्र्याबद्दल संशय घेणे, मुलगा झाला नाही म्हणून अपमानास्पद वागणूक देणे, हुंडा आणला नाही म्हणून अतोनात शिव्याश्राप देणे. महिलेला वा तिच्या ताब्यात असलेल्या अपत्यास शाळेत, महाविद्यालयात किंवा इतर शैक्षणिक संस्थांमध्ये जाण्यास मज्जाव करणे, नोकरी स्वीकारण्यास व करण्यास मज्जाव करणे, अपत्यासह स्त्रीला घरातून बाहेर जाण्यास अटकाव करणे, नेहमीच्या कामासाठी कोणत्याही व्यक्तीबरोबर भेटण्यास मज्जाव करणे, तिला विवाह करावयाचा नसल्यास विवाह करण्यास बाध्य करणे, तिच्या पसंतीच्या व्यक्तीसोबत लग्न करण्यास मज्जाव करणे, त्याच्या अथवा त्यांच्या पसंतीच्या व्यक्तीबरोबर विवाह करण्यास जबरदस्ती करणे, आत्महत्येची धमकी देणे, इतर कोणतेही भावनात्मक किंवा तोंडी अपशब्द वापरणे या गोष्टींचा समोवश होतो. लैंगिक अत्याचारामध्ये बलात्कार, अश्लिल फोटो काढणे, बिभत्स कृत्य जबरीने करावयास लावणे, समाजात नाचक्की-बदनामी होईल, असे अश्लील चाळे करणे किंवा अनैसर्गिक अश्लिल कृत्य करणे याबाबींचा समावेश होतो. ती लावण्याची खाण, तिचे आकर्षक पण कोमल रुप वाटत असले तरी प्रसंगी ती ज्वाला, दुर्गा, महाकालीचे रौद्र रुप घेऊ शकते किंवा कायद्याने लढून जिंकू शकते-

रूप माझं चंद्राचं पहा लाख मोलाचं। चंद्राची कोर मी तारांगणी।। लुकलुकत्या तार्‍यांत डुलते तोर्यात। शोभते शुक्राची मी चांदणी रे।।

कौटुंबिक हिंसाचार म्हणजे शारीरिक, शाब्दिक, लैंगिक, मानसिक किंवा आर्थिक छळ, हुंडा किंवा मालमत्ता घेण्यासाठी महिलेला अपमानित करणे, तिला शिवीगाळ करणे, विशेषत: अपत्य प्राप्ती न झाल्याच्या सबबीखाली तिला हिणवणे, धमकावणे, त्रास देणे, दुखापत करणे, जखमी करणे किंवा पीडितेचा जीव धोक्यात आणण्यास भाग पाडणे. तसेच तिच्या कोणत्याही नातेवाईकाकडे हुंड्याची मागणी करणे. या सर्व गोष्टींचा दुष्परिणाम पीडित व्यक्ती अथवा तिच्या नातेवाईकांवर होणे तसेच आर्थिक छळ करणे. म्हणजे महिलेचे स्वत:चे उत्पन्न, स्त्रीधन, मालमत्ता, इतर आर्थिक व्यवहार किंवा तिच्या हक्काच्या कोणत्याही मालमत्तेपासून तिला वंचित करणे आणि घराबाहेर काढणे या सर्व बाबींना कौटुंबिक हिंसाचार म्हटले जाते. त्याचप्रमाणे आर्थिक अत्याचारात हुंड्याची मागणी करणे, तिला मुलांच्या पालन-पोषणासाठी पैसे न देणे, तिच्या मुलांना अन्न, वस्त्र, औषधे आदी न पुरविणे, नोकरीला मज्जाव करणे, नोकरीवर जाण्यासाठी आडकाठी निर्माण करणे, नोकरी स्वीकारण्यास संमती न देणे, पगार किंवा रोजी-मजूरीतूनआलेले पैसे काढून घेणे, तिला तिचा पगार, रोजगार वापरण्यास परवानगी न देणे, राहत्या घरातून हाकलून देणे, घराचा कोणताही भाग वापरण्यास किंवा घरात जाण्या-येण्यास अडथळा निर्माण करणे, घरातील नेहमीचे कपडे, वस्तू वापरण्यापासून रोखणे, भाड्याच्या घराचे भाडे न देणे या बाबींचा समावेश होतो. तिला तिच्या हक्कांपासून परावृत्त करता कामा नये, तिचा आदर करणेच योग्य-

यादेवी सर्वेभूतेषू मातृरूपेण संस्थितः नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः

काय आहे कौटुंबिक हिंसाचारास प्रतिबंध घालणारा कायदा? स्त्रीचा जन्मच मुळी अत्याचार सोसण्यासाठी झाला, अशी समाजमनाची धारणा आहे. या धारणेला गरीब, श्रीमंत, जात, धर्म, पंथ, शिक्षित, अशिक्षित, ग्रामीण, शहरी, नोकरदार, बेरोजगार असा कुठलाही अपवाद नाही. स्त्री-पुरुष समानता ही केवळ आपण आधुनिक विचारसरणीचे आहोत, हे दाखविण्यापुरतीच सीमित आहे. वास्तव तर नेमके याच्या उलट आहे. भारतीय संविधानाच्या कलम अनुसार भेदभावापासून मुक्ती, कलम अन्वये स्त्री-पुरुषसमानता आणि कलम प्रमाणे जीवित व स्वातंत्र्याचे संरक्षण करण्याचा हक्क महिलांनाही दिला आहे. तरीही बहुसंख्य भगिनी कौटुंबिक हिंसाचारास बळी पडत आहेत. त्यांची प्रतिष्ठा सांभाळली जात नाही. समाजसुधारक, स्त्रीउद्धारक आणि विचारवंतही आजवर समाजाचे पूर्ण मानसिक परिवर्तन करू शकलेले नाहीत. समाजात सुधारणा करण्यासाठी केवळ प्रबोधने पुरेसे नाहीत. शिक्षा किंवा दंडशक्तीही तितकीच महत्वाची आहे, म्हणून कौटुंबिक हिंसचारास प्रतिबंध करणारा हा कायदा केंद्र सरकारने केला. कारण-

यत्र नार्येस्तु पूजंतै, रमतै तत्र देवतः!!

या कायद्याद्वारे पीडित महिलेला न्याय, संरक्षण मिळू शकते. या कायद्याच्या आधारे पीडित महिला ही तिच्या अथवा तिच्या मुलांविरुद्ध होणारे अत्याचार थांबवू शकते. स्त्रीधन, दागदागिने, कपडे इत्यादींवर ताबा मिळवू शकते. संयुक्त खाते अथवा लॉकर हे हिंसा करणाऱ्या पुरुषाला वापरण्यास प्रतिबंध करू शकते. स्त्री ज्या घरात राहत असते, ते घर सोडावे लागणार नाही. अत्याचारी पुरुषास ती राहात असलेले घर विकण्यास प्रतिबंध होऊ शकतो. वैद्यकीय उपचाराचा खर्च मागू शकतो. भावनिक व शारीरिक हिंसाचाराबद्दल नुकसान भरपाई स्त्रीला मागता येते. त्याचप्रमाणे पीडितेला मोफत कायदेविषयक केंद्राद्वारे सल्ला, सेवा पुरविणाऱ्या संस्था, वैद्यकीय सुविधा, निवासगृह आदींमार्फत आवश्यक त्या सेवा सुविधा प्राप्त करुन घेता येतात. भारतीय दंड संहिता -अ कलमाखाली पोलिसात तक्रार दाखल करता येते. तद्वतच भारतीय दंडसहितेच्या कलम अंतर्गत मिळणाऱ्या पोटगी व्यतिरिक्त अतिरिक्त पोटगी ही स्वत:साठी व स्वत:च्या अपत्यासाठी मागता येते. या कायद्यांतर्गत कौटुंबिक हिंसाचाराने पीडित पत्नी, सासू, बहिण, मुलगी, अविवाहित स्त्री, आई, विधवा इत्यादी म्हणजे लग्न, रक्ताचे नाते, लग्न सदृश्य संबंध-लिव्ह इन रिलेशनशीप, दत्तकविधी अशा कारणाने नाते संबंध असणाऱ्या व कुठल्याही जाती धर्माच्या स्त्रिया तसेच त्यांची अठरा वर्षाखालील मुले दाद मागू शकतात. या कायद्यांतर्गत छळ होत असलेली किंवा झालेली स्त्री संरक्षण अधिकाऱ्याला, सेवा पुरविणाऱ्या संस्थांना, तसेच पोलीस स्टेशन किंवा दंडाधिकाऱ्याकडे तोंडी किंवा लेखी तक्रार करू शकते, हे लक्षात घ्यावे व सजग व्हावे. योगायोगाने याच दिवशी भाऊबीज आली आहे. फक्त सण उत्सवापूरता स्त्रीसन्मान न राखता तो सदोदित अंगवळणी पाडला पाहिजे-

नवलाख दिवे हे निळ्या आभाळी,
वसुंधरा अशी चंद्रा ओवाळी।
नक्षत्रांचा सर येई भूमीवर, पसरी पदर
भेट घ्याया।। चंद्र वसुधेला सखा रे
भेटला, पाठीशी राहु दे छाया रे।
वेड्या बहिणीची रे वेडी माया।।

!! समस्त लेकीबाळी, माता व भगिनींना राष्ट्रीय कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा दिनाच्या सजग हार्दिक शुभेच्छा !!

संकलक व शब्दांकन
बापू ऊर्फ श्रीकृष्णदास निरंकारी
द्वारा म. पू. गुरूदेव हरदेव कृपानिवास.
मु. एकता चौक, रामनगर वॉर्ड नं., गडचिरोली. पो. ता. जि. गडचिरोली
फक्त व्हॉट्सप-९४२३७१४८८३
rishnadas.nirankari@gmail.com

कलाप्रकारांतील कलाकारांचे कौतुक

आंतरराष्ट्रीय कलाकार दिन-इंटरनॅशनल आर्टिस्ट डे दरवर्षी २५ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो, ज्याचा उद्देश जगभरातील कलाकारांच्या सर्जनशीलतेचा आणि त्यांच्या योगदानाचा सन्मान करणे हा आहे. या दिवसाच्या माध्यमातून चित्रकला, शिल्पकला, नृत्य, संगीत, साहित्य आणि इतर कलाप्रकारांतील कलाकारांचे कौतुक करण्यात येते, कारण त्यांच्या कलाकृतींमुळे समाजात सौंदर्य, संस्कृती आणि विचारशक्तीला चालना मिळते. कलाकार त्यांच्या अनोख्या दृष्टिकोनातून समाजातील विविध समस्यांवर प्रकाश टाकतात आणि लोकांना प्रेरित करतात. कला ही व्यक्त होण्याचे शक्तिशाली साधन आहे, जी सांस्कृतिक वारसा जपण्यासोबतच बदल घडवून आणण्यासाठी देखील वापरली जाते. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदनिकोडे गुरूजींचा ज्ञानवर्धक संकलित लेख आपल्या सेवेशी सादर

या दिवशी, कलाविश्वातील विविध उपक्रम राबवले जातात, जसे की कला प्रदर्शनं, कार्यशाळा आणि चर्चासत्रं, ज्यामध्ये नवोदित आणि अनुभवी कलाकारांना त्यांची कला सादर करण्याची संधी मिळते. आंतरराष्ट्रीय कलाकार दिन हा कलाकारांच्या सृजनशीलतेचा उत्सव असून, त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी आणि समाजातील कलात्मकतेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी साजरा केला जातो. कलाकार म्हणजे कला निर्माण करणे, कलेचा सराव करणे किंवा कला प्रदर्शित करणे याशी संबंधित क्रियाकलापात गुंतलेली व्यक्ती होय. सर्वात सामान्य वापर- रोजच्या भाषणात आणि शैक्षणिक प्रवचनात फक्त व्हिज्युअल आर्ट्समधील अभ्यासकाला संदर्भित करतो. सेंट जस्टिनियन, वेल्स, सन २०२१ मध्ये कामावर असलेला चित्रकार तथापि, हा शब्द मनोरंजन व्यवसायात देखील वापरला जातो, विशेषत: व्यावसायिक संदर्भात, संगीतकार आणि इतर कलाकारांसाठी जरी कमी वेळा अभिनेत्यांसाठी योजला जातो. आर्टिस्ट, फ्रेंच हा या संदर्भात इंग्रजीमध्ये वापरला जाणारा एक प्रकार आहे, परंतु, हा वापर दुर्मिळ झाला आहे. लेखकांचे वर्णन करण्यासाठी कलाकार या शब्दाचा वापर वैध आहे, परंतु सामान्य आहे आणि मुख्यतः समीक्षकांच्या पुनरावलोकनांसारख्या संदर्भांपुरता मर्यादित आहे; त्याऐवजी लेखक वापरला जातो आंतरराष्ट्रीय कलाकार दिन २५ ऑक्टोबर रोजी कलाकारांचा आणि त्यांनी केलेल्या सर्व योगदानांचा सन्मान केला जातो. दि. ऑक्टोबर १८८१ रोजी जन्मलेल्या पाब्लो पिकासो या सर्वात प्रसिद्ध कलाकारांपैकी एक म्हणून हा दिवस साजरा केला जातो. कलाकार आपली कला निर्माण करण्यासाठी खूप मेहनत घेतात. ते आपल्या सभोवतालच्या जगाला सौंदर्य जोडतात. बहुतेक कलाकार अनेक वेगवेगळ्या माध्यमांसह काम करतात. इतकेच नाही तर कलाकार या शब्दात चित्रकार, छायाचित्रकार, शिल्पकार, संगीतकार, नर्तक, लेखक, अभिनेते, डिजिटल कलाकार आणि बरेच काही समाविष्ट आहे. जेव्हा एखादी सर्जनशील भेट घेऊन जन्माला येते, तेव्हा ती सर्जनशीलता विविध क्षेत्रांमध्ये वाहते. उदाहरणार्थ, पिकासो एक चित्रकार, शिल्पकार, सिरेमिकिस्ट, कवी आणि नाटककार होता. लिखित कामांच्या खूप आधी कला आली. काळाच्या सुरुवातीपासून कलेने कल्पनांचा संवाद साधला आहे आणि महत्त्वाच्या घटनांच्या नोंदी ठेवल्या आहेत. कला भूतकाळाशी जोडणी देते. कलाकार आपला इतिहास अमिटपणे नोंदवतात. ते सत्यही शोधून काढतात. त्यांच्या कार्याद्वारे ते कथा सांगतात आणि परंपरा पार पाडतात. कलाकारांकडे त्यांच्या सभोवतालच्या लोकांशी जोडण्याचा एक अनोखा मार्ग असतो. वाईट बातम्यांनी भरलेल्या जगात, आशेचा संदेश देणे ही त्यांची सर्वात महत्त्वाची भूमिका आहे.

BYD eMax 7 भारतात लाँच, सुरुवातीची किंमत रु. २६.९० लाख

इलेक्ट्रिक एमपीव्ही फुल चार्जवर ५३० किमी धावेल, इनोव्हा हायक्रॉसशी स्पर्धा

नवी दिल्ली , २७ ऑक्टोंबर: BYD India ने आज भारतीय बाजारपेठेत नवीन इलेक्ट्रिक BYD E6 लाँच केले आहे. ही MVP6 इलेक्ट्रिक ची फेसलिफ्ट आवृत्ती आहे, जी नवीन नाव, अद्ययावत डिझाइन, नवीन वैशिष्ट्ये आणि पूर्वीपेक्षा चांगली श्रेणीसह सादर केली गेली आहे. बीवायडीचा दावा आहे की कार एका पूर्ण चार्जवर ५३० किलोमीटरची रेंज देते. इलेक्ट्रिक एमपीव्ही प्रीमियम आणि सुपीरियर या दोन प्रकारांमध्ये सादर करण्यात आली आहे. त्याची सुरुवातीची किंमत ६-सीटप्रीमियमसाठी २६.९० लाख रुपये आणि ७-सीटसुपीरियर व्हेरियंटसाठी २९.९० लाख रुपये ठेवण्यात आली आहे. या किमती संपूर्ण भारतातील एक्स-शोरूमआहेत. ७ची किंमत BYD E6 पेक्षा २.२५ लाखांनी कमी आहे. ८ वर्षे किंवा १.६ लाख किलोमीटरची बॅटरी वॉरंटी

इलेक्ट्रिक MPV ची बॅटरी ८ वर्षे/१.६ लाख किलोमीटरची वॉरंटी आणि ८ वर्षे/१.५ लाख किलोमीटरची मोटर वॉरंटी आहे. भारतात BYDeMax7 ची रु. ३० लाख किंमत विभागात थेट स्पर्धा करणारी कोणतीही इलेक्ट्रिक कार नाही. तथापि, ती टोयोटा इनोव्हा हायक्रॉस आणि टोयोटा इनोव्हा क्रिस्टाला इलेक्ट्रिक पर्याय म्हणून खरेदी करता येईल.

चार रंग पर्याय BYDeMax7 ने हेडलॅम्प आणि -३-सारखी ग्रिल अपडेट केली आहे. कंपनीने त्याचा बंपरदेखील अपडेट केला आहे आणि त्याच्या हेडलॅम्पमध्ये नवीन अंतर्गत प्रकाश घटक प्रदान केले आहेत. कारचा बॉडी शेप ६ सारखाच आहे, परंतु त्यात नवीन १७-इंचड्युअल-टोन अलॉय व्हील आहेत. स्लीक एलईडी टेल लॅम्प मागील बाजूस दिले आहेत, जे एका पातळ क्रोम स्ट्रिपला जोडलेले आहेत. इलेक्ट्रिक एमपीव्हीमध्ये चार रंगांचे पर्याय उपलब्ध आहेत. यामध्ये क्वार्ट्ज ब्लू, कॉसमॉस ब्लू, क्रिस्टल व्हाइट आणि हार्बर ग्रे यांचा समावेश आहे.

इंटीरियर: ड्युअल-टोनब्लॅक आणि ब्राऊन इंटीरियर थीम

पूर्ण चार्ज झाल्यावर ५३० किमी पर्यंतची रेंज

७ दोन बॅटरी पॅक पर्यायांसह येतो. प्रीमियम व्हेरिएंटमध्ये ५५.४ बॅटरी आहे, जी पूर्ण चार्ज केल्यावर ४२० ची रेंज देते. त्याच वेळी, सुपीरियर व्हेरिएंटमध्ये ७१.८ बॅटरी आहे, जी चार्जिंगवर ५३० ची रेंज देते.

७ चे दोन्ही प्रकार ७ -चार्जरसह येतात. त्याच वेळी, प्रीमियम प्रकारासाठी ८९ पर्यंतचे फास्ट चार्जर आणि सुपीरियरसाठी ११५ पर्यंत समर्थित आहे. ७मध्ये वाहन-टू-लोडचार्जिंग देखील प्रदान केले आहे, जे इतर उपकरणांना उर्जा देऊ शकते.

उपलब्ध असेल

च्या केबिनला ड्युअल-टोनब्लॅक आणि ब्राऊन इंटीरियर थीम आहे. कारचा डॅशबोर्ड ऑल-ब्लॅक कलरमध्ये आहे, ज्याला स्पोर्टी टच देण्यासाठी क्रोम स्ट्रिप देण्यात आली आहे. कार ६ आणि ७ सीटर पर्यायांमध्ये ऑफर केली गेली आहे आणि तिच्या सीटवर तपकिरी लेदरेट अपहोल्स्ट्री आहे.

त्याचे डोअर पॅडदेखील सॉफ्ट-टचलेदररेटने झाकलेले आहेत. स्टीयरिंग व्हीलवर क्रोम इन्सर्ट प्रदान केले आहेत. हे क्रोम घटक एसी व्हेंट्स आणि दरवाजांवर देखील दिसतात. त्याच्या दरवाज्यांवर म्बियंट लाइटिंगही देण्यात आली आहे. त्याची ड्रायव्हर सीट इलेक्ट्रिकली ६ प्रकारे समायोजित केली जाऊ शकते, तर को-ड्रायव्हसीट ४ प्रकारे इलेक्ट्रिकली समायोजित करता येते.

६ एअरबॅग आणि ३६० डिग्री कॅमेरा

१२.८-इंचटचस्क्रीन इन्फोटेनमेंट सिस्टम, वायरलेस चार्जिंग आणि डिजिटल ड्रायव्हर डिस्प्ले उपलब्ध आहे. सुरक्षिततेसाठी, यात सुपीरियर व्हेरियंटमध्ये सहा एअरबॅग, ३६० डिग्री कॅमेरा आणि लेव्हल २ -तंत्रज्ञान आहे. क्रूझ कंट्रोल, ऑटोमॅटिक क्लायमेट कंट्रोल या दोन्ही प्रकारांमध्ये प्रमुख वैशिष्ट्ये प्रदान करण्यात आली आहेत.

शब्दकोडे क्रमांक १९५८



आडवे शब्द :-

१) झुकुझुकु आगिनगाडी गाण्यातील पुढची ओळ
८) दुर्बळ, असमर्थ
११) एक कडवे धान्य
१२) समुद्राचा किनारा
१४) गणेश
१६) सूर्य
१७) वजनदार
१८) अवधान
१९) गोमाता
२०) उंटाच्या पाठीवर उंचवटा
२२) ठाणवई
२५) एक चतुर्थांश
२६) एकरूपता
२८) इंद्रिय, घटक
३०) अभिप्राय
३१) राजाला न आवडणारी राणी
३३) फोडातील द्रव
३४) रात्रीचा अखेरचा प्रहर
३५) चामखीळ
३७) दरवाजा
३९) चीजवस्तू
४१) चहापिण्याचे जोडसाधन
४४) युद्ध
४६) नखे काढण्याचे हत्यार
४७) जखमेवरील जाद झालेले कातडे
४८) तृष्णा
५०) लाकडी तटबंदी
५१) मनाचा ओढा
५२) उत्तर भारतातील एक रामभक्त संत
५५) रंग
५६) सीतापती
५७) भारताचा नागरिक
६०) दुःख, खेद
६१) आश्रय, टेका, प्रमाण
६२) गवंडी
६५) सेवक
६७) पती
६८) राजांचाही राज, सम्राट
७०) अर्धांगवायू
७१) मौज, गम्मत
७३) घाबरणे
७४) कोवळाअंकुर
७५) कपोल

उभे शब्द :-

२) अष्टविनायकातील एक गाव
३) सत्ताविसावे नक्षत्र
४) नगरपाल
५) लता
६) व्याकुळ, घाबरा
७) रास
८) चिवट
९) केसांची बट
१०) रात्रंदिवस
१३) दुलई
१५) दूध, पाणी
२०) माझा
२१) जिव्हा
२३) थोरवी
२४) परमेश्वर
२५) पाप दूर करणे
२६) आठवण
२७) खिडकीची काच
२८) शेळी
२९) परशुरामाची आई, रेणुकादेवी
३०) रात्रभर
३२) भीती
३५) चिंतन
३६) सासर (हिं.)
३८) करंडी
४०) दोन रत्ने
४१) लबाडी, कारस्थान
४२) थंड, गार
४३) जन्म मृत्यू
४५) प्रवासातील टप्पा
४७) धोका
४९) मोठा भाऊ
५१) कान
५२) देहूचे संत
५३) जानकी
५४) विचार मांडण्यासाठी बोलाविलेली बैठक
५५) जमीनजुमला
५६) कृष्णसखी
५८) प्रचंड रास, खरकटे वगैरेचा ढीग
५९) जेव्हा
६१) विश्रांती
६३) आगबोट
६४) पायजमा
६६) मनाला टोचणे
६९) सोन्याचा धागा, कलाबूत
७२) स्थान, जागृत

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

धि	ऊ	ता	ई	वि	ऊ	ता	ई	दा	र	उ	घ	ड		सु
व		री		कू		प	र	वा	न	गी		म	रु	त
ट	र	फ	ल		अ	ट		न		च	व	ड		रा
	त्ना		क्ष	म	त्व		सा	ल	स		सा	म	दा	म
ब	क	रा		हा	ल	चा	ल		क	ल	ह		द	
स	र		ढा	ल		क	प	ट		हा	त	च	ला	खी
क		वा	स		खा	र	ट		मा	न		ल		र
र	म	णी		क	ल	मा		क	ळ	स		न	ग	
	धु		रा	न		नी	र	द		हा	रा		पा	गा
चु	क	त	मा	क	त		ड	र		न	ग	र	पा	ल
च	र		य		ग	णि	त		चा			ब		
का		जा	ण	का	र		ल	च	क	त	मु	र	ड	त
र	द	न		ल		ल	क्ष्मी		य	ट		थी		रु
णे		व	ड	वा	न	ल		पा	त		रा	त	रा	णी
	श	र	म		त	त	प	प		स	खी		गी	

हिंगणा, बुटीबोरीच्या कबड्डी आणि खो-खो संघाने नेपाळमध्ये भारतासाठी जिंकली दोन सुवर्ण पदके

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २७

लायन्स क्लब सेंटेलनियल नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली स्कूल गेम्स एज्युकेशन फेडरेशन ऑफ इंडिया तर्फे आयोजित इंडो-नेपाळ शालेय खेळ चॅम्पियनशिप २०२४ मध्ये, सिध्दीविनायक स्कूल गुमगाव आणि बुटीबोरीच्या खेळाडूंनी एकत्रितपणे उल्लेखनीय कामगिरी केली.कबड्डीच्या पुरुष संघाने नेपाळचा ५०-३५ असा पराभव करून सुवर्णपदक मिळवले.

या संघाचे कर्णधार कुणाल पारधी (बुटीबोरी) होते, ज्यांच्या नेतृत्वाखालील संघाने अत्यंत कठोर परिश्रम घेतले आणि सामन्यात उत्कृष्ट रणनीती वापरली. यामध्ये कृष्णकुमार कुशवाह, विशाल पासवान, वेदांत बडे, सक्षम ढोणे, अंश तीत्रे, साहील भोमले, अजित मेश्राम, नयन सुरसकर (वडगाव) आणि ऋषभ चरडे (वागदरा) यांचा समावेश होता. या सर्वांनी एकत्र येऊन तासभर चाललेल्या खेळात उत्कृष्ट प्रदर्शन केले, ज्यामुळे विजय साधता आला तर खो-खो (महिला) संघानेही दमदार कामगिरी करत नेपाळला १६-१४ असा पराभव दिला. या संघाचे नेतृत्व खुशी बोरकर (गुमगाव) करत होती, आणि तिला मदत करणाऱ्या अन्य खेळाडूंमध्ये तन्वी सुरकर (धानोली), प्राजक्ता झाडे (कोतेवाडा), चेष्टा पवार (वागदरा), रिषा मीश्रा (वागदरा), सुप्रीया गुरनुले (धानोली), कल्याणी भोपरे (जामठा), सिध्दी निमजे (वागदरा), ओम मरसकोल्हे, आणि इषिका सोरते यांचा समावेश होता.

या संघाने सामन्यातील प्रत्येक टप्प्यावर धैर्य आणि चिकाटी दाखवली, ज्यामुळे त्यांनी विजय मिळवला. लायन्स क्लबचे शतकोत्तर अध्यक्ष संजीव झा यांनी या खेळाडूंवर गर्व व्यक्त केला, तर प्रशिक्षक आदित्य शाहू आणि शाळेचे संचालक अर्चना दवतळे व प्रवीण दवतळे यांच्या मार्गदर्शनाने खेळाडूंनी आपल्या क्षमता सिद्ध केल्या. या स्पधेर्तील त्यांच्या यशाने स्थानिक समाजात एक नवा उत्साह निर्माण केला आहे. 27 ऑक्टोबर 2024 रोजी दुगार्माता मंदीर, बँक चौक बुटीबोरी येथे दुपारी 2 वाजता आणि 28 ला सायंकाळी 7 वाजता अहिल्याबाई होळकर सभागृह वागदरा येथे खेळाडूंचा भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात येणार आहे. या समारंभात खेळाडूंना मानपत्रे आणि पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी स्थानिक ग्रामस्थांनी आणि चाहत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सत्कार मूर्तींना भरभरून आशीर्वाद दिले, त्यामुळे खेळाडूंना अधिक प्रेरणा मिळाली. या यशामुळे शालेय क्रीडांना एक नवा वळण मिळाले असून, भविष्यातील खेळाडूंना प्रेरित करण्यासाठी हे यश अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे.

ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरांचा हलगर्जीपणा

■ महासागर प्रतिनिधी
वानाडोंगरी, दि. २७

एमआयडीसी परिसरात भागीरथी पार्क, वानाडोंगरी येथील रहिवासी पवन श्रीकृष्ण मेहुणे (वय२७)यांचा खडका शिवारात शेतीवर पाणी ओलताना सर्पदंश झाला. उपचारासाठी शालिनी ताई मेघे दवाखान्यात भरती करण्यात आले होते. उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

पीएम करण्यासाठी ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर व तालुका आरोग्य अधिकारी यांना यांची माहिती देण्यात आली. परंतु डॉक्टरांनी पीएम करण्यासाठी घेतला अधिकचा वेळ आणि नातेवाईक व नागरीकांनी यांचा जाब विचारायला तेव्हा डॉक्टर बोलले उलट-सुलट यामुळे वातावरण तापले होते. डॉक्टराने पोलिसाना बोलविले यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. नागरिक व नातेवाईकांनी डॉक्टरावर हलगर्जीपणाचा आरोप लावत केली कार्यवाहीची मागणी. खडका शिवारात पाणी ओलण्यासाठी पवन मंगळवारी शेतावर गेला होता.

संपूर्ण शेतात पाणी ओलून झाले होते शेवटी एकच पट्टी राहीले होते. तेवढ्यात पवनला सर्पदंश झाला. यांची माहिती त्यानें आपल्या मित्रांना दिली. मित्र आणि नातेवाईक गाडी ने गेले आणि पवनला ग्रामीण रुग्णालयात घेऊन गेले डॉक्टरानी इंजेक्शन नसल्याने मेडिकल कॉलेज, नागपूर येथे घेऊन जाण्यास सांगितले. रस्त्याने जाण्यासाठी बराच वेळ जाईल म्हणून वानाडोंगरी येथील शालिनी ताई मेघे दवाखान्यात भरती करण्याचे करण्याचे पवनने सांगितले.

त्याच्यावर बुधवारी, गुरूवारी उपचार सुरू होते. शुक्रवारी त्यांचे ऑपरेशन करण्यात आले आणि सायंकाळी सहा वाजता त्याचा मृत्यू झाला. पीएम करण्यासाठी ग्रामीण रुग्णालयात हिंगणा येथे डॉक्टरांनी सांगितले आणि डॉक्टरांनी अकरा वाजे पर्यंत बॉडी तुम्हाला मिळेल असे सांगितले यामुळे अंत्यसंस्कार करण्यासाठी नातेवाईक यांना बारा वाजताची वेळ सांगण्यात आली होती. एक ही वाजता तरी पवनची बॉडीचे पीएम करण्यात आले नाही. यामुळे अंत्यसंस्कार करण्यासाठी येणारे सर्व नातेवाईक ग्रामीण रुग्णालयात जमा झाले.

डॉ. गेडाम प्रशिक्षणासाठी असणाऱ्या डॉक्टराना पवनच्या शरीरावर कसे पोस्ट मॉटम करतात हे शिकवित होते. डॉ.अनिल गेडाम यावेळी दवाखान्यात होते नातेवाईक यांना एवढा वेळ का लागत आहे यांचे डॉक्टरांना विचारलें असता डॉ.गेडाम यांनी जा कुठेही घेऊन जा मी नाही करत तुम्ही काय करायचं ते करा असे बोलल्याने वातावरण तापले शेवटी डॉक्टरांनी हिंगणा पोलिस ठाण्यात कळवून पोलिस प्रोटेक्शन मागून घेतले. दोन वाजता पवनचे पीएम करुन बॉडी नातेवाईकाना देण्यात आली. यावेळी श्री. दिनेश ढेंगरे ,सरपंच खडका (सुकळी गुपचूप) त्याचप्रमाणे हुसेन भाई ,माजी सरपंच, खडका (सुकळी गुपचूप) यांनी डॉक्टरांनी परीस्थितीची काय आहे, एक तरुण मुलगी मरण पावला त्यांच्या नातेवाईकावर काय संकट कोसळेल यांची पर्वा न करता आपली मनमानी व हलगर्जीपणाचा आरोप करीत कारवाईची मागणी करण्यात आली. डॉक्टर गेडाम यांना प्रकरणाची माहिती मागितल्यावर त्यांनी प्रतिक्रिया देण्याचे टाळले.

गांधी, भगतसिंग व डॉ.आंबेडकर निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २७

स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया व डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया च्या वतीने गांधी, भगतसिंग व डॉ.आंबेडकर निबंध स्पर्धा २०२४ चा बक्षीस वितरण सोहळा गंगा भवनम् सभागृह, रामटेक येथे पार पडला. महात्मा गांधी व शहीद भगतसिंग यांच्या जयंतीनिमित्त या स्पधेर्चे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी एस एफ आय चे जिल्हाध्यक्ष संदेश रामटेके होते तर प्रमुख अतिथी म्हणून डी वाय एफ आय चे राज्य उपाध्यक्ष मोहन जाधव, एस. एफ. आय. राज्य कमिटी सदस्य अनुजा सावरकर व कॉ. राजूजी हटवार प्रामुख्याने उपस्थित होते. दरम्यान मान्यवरांनी उपस्थिताना मार्गदर्शन केले. ही स्पर्धा मागच्या तीन वषार्पासून संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात येत असून यंदा दोन गटात स्पर्धा आयोजित केली होती. एकूण ६० स्पर्धकांनी यात सहभाग घेतला. विज्ञान निष्ठेची गरज व त्यापुढील आव्हाने, आर्थिक विकास, पर्यावरण - त्यापुढील आव्हाने व पर्यावरणाचे संरक्षण, जात व्यवस्था - मानवते समोरील आव्हान व निर्मूलनाचे उपाय ही तीन विषय देण्यात आले होते. १२ ते २५ वयोगटातून प्रथम क्रमांक प्रेरणा नितनवरे या विद्यार्थिनीने पटकावला, तर द्वितीय पारितोषिक गौरव सुरेश दमाहे व तृतीय क्रमांक वैष्णवी विलास कारामोरे या विद्यार्थिनीने पटकावले. बारावी विज्ञान शाखेत शिकणारी ईशा बागडे या विद्यार्थिनीने प्रोत्साहन पर बक्षीस मिळवले. २६ ते ४५ या वयोगटातून प्रथम क्रमांक योगिता थोटे या विद्यार्थिनीने पटकावला तर द्वितीय क्रमांक लक्ष्मीताई राजकुमार खोब्रागडे यांनी पटकावला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डी. वाय. एफ. आय. चे जिल्हाध्यक्ष अमित हटवार यांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन रजत लांजेवार यांनी केले तर आभार प्रदर्शन अभिजीत रामटेके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अमित हटवार, संदेश रामटेके, प्रीतम वासनिक, संघर्ष हटवार, अभिजीत रामटेके,सतीश बोरकर, रजत लांजेवार, उमेश तुमडाम, संकेत कारामोरे, आयुष वासनिक, आयुष सहारे यांनी परिश्रम घेतले.

आपला परीवारातर्फे प्रमोद काळबांडे यांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २७

आदीवासीच्या प्रश्नासाठी सतत झटणारे ,कुशल संघटक,सकाळ वृतपत्राचे निवासी संपादक प्रमोद काळबांडे यांचा आपला परीवार , विदर्भ गौरव प्रतीष्ठान व करुणा सागर संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह शंकरनगर ,नागपुर येथे शनिवार २६ ऑक्टोबर रोजी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देऊन करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाडी माजी ग्रा.पं.सदस्य तथा कॉंग्रेस कमिटीचे जिल्हा महासचिव दुर्योधन ढोणे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राचे प्रसिद्ध कवी, ख्यातनाम साहीत्यकार आंबेडकरी विचारवंत ई. मो. नारनवरे, प्रा.डॉ.एन.व्ही. ढोके उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन प्रा. हदय चक्रधर यांनी तर आभार आपला परीवाराचे अध्यक्ष फकीरचंद तायडे यांनी केले. यावेळी तिन्ही संस्थांचे सर्व पदाधिकारी तसेच ओबीसी संघाचे घनश्याम मांगे ,संजय भिलकर,संजय कडु ,शामसिंग ठाकुर, फकीरचंद तायडे, सुखदेव मनोहरे, विनायक इंगळे, साहेबराव ढोणे, रामचंद्र काळबांडे तसेच मित्र परीवार उपस्थीत होते.

५९ पुतळयांची व चौकांची स्वच्छता

नागपूरः नागपूर महानगरपालिकेद्वारे संपूर्ण शहरात राबविण्यात येत असलेल्या स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी अभियानाच्या माध्यमातून सोमवार 28 ऑक्टोबर 2024 रोजी शहरातील पुतळयांची व चौकांची स्वच्छता सकाळी ७ वाजता पासून केली जाणार आहे.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निदेर्शानुसार, अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल व श्री अजय चारठाणकर यांच्या मार्गदर्शनात नागपूर महानगरपालिकेद्वारा स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी अभियान राबविण्यात येत आहे. या माध्यमातून २१ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान शहरात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत सोमवारी (ता:28)दहाही झोनमधील महापुरूष, स्वातंत्र्य सेनानींच्या एकूण ५९ पुतळ्यांची व चौकांची स्वच्छता करण्यात येणार आहे. या सफाई अभियानामध्ये संबंधित झोनमधील नागरिकांनी देखील सहभागी व्हावे, असे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल यांनी केले आहे.

बालपांडे पब्लिक शाळेत दिवाळी उत्सव साजरा

■ महासागर प्रतिनिधी
बेसा, दि. २७

बालपांडे पब्लिक स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये दिवाळीचा रंगतदार वातावरण होता. ज्याने संपूर्ण शाळेत आनंदाचे वातावरण पसरले. 26 ऑक्टोबर 2024 रोजी शाळेच्या आवारात दिवाळी साजरी झाली. पारंपारिक पोशाख परिधान करून विद्यार्थी आणि शिक्षकांनी उत्सवाला सांस्कृतिक विविधतेचे दर्शन घडवले.

दीपप्रज्वलनाने उत्सवाच्या वातावरणाला सुरुवात झाली आणि त्याचे सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित झाले. आमचे प्रमुख पाहुणे फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ.नितीन डुमोरे यांनी विद्यार्थ्यांना प्रदूषणमुक्त दिवाळीबद्दल मार्गदर्शन केले. प्राचार्या प्रिया मॅडम यांचे उत्साही भाषण झाले. अंधारावर प्रकाशाच्या विजयाचे प्रतिक असलेले आकाशदिवे, दिवे विद्यार्थ्यांनी हाताने तयार केले.

बालपांडे पब्लिक स्कूलमधला दिवाळी साजरी यशस्वी ठरली, ज्याने विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये सांस्कृतिक प्रशंसा, सर्जनशीलता आणि एकतेची भावना एकत्र केली. बालपांडे शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापकांनी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे त्यांच्या समर्पित कार्याबद्दल कौतुक केले आणि सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

अज्ञात वाहनाच्या धडकेत राज्य मातेचा मृत्यु

नप सफाई कर्मचाऱ्यांनी राज्य मातेला (गाईला) कचऱ्यात नेऊन फेकले

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २७

कन्हान शहरातील सात नबर नाका चक्रधर पेट्रोल पंप च्या समोर महामार्गा वर अज्ञात वाहनाच्या धकडेत राज्य मातेचा मृत्यु झाल्याची घटना उघडकीस आली आहे.

ही घटना शुक्रवार ला सकाळ च्या सुमारास घडली. महामार्गा वर गाई बसुन असतांना अज्ञात वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन गाईला जोरदार धडक दिल्याने गाईचा घटनास्थळीच मृत्यु झाला. नागरिकांनी घटनेची माहिती नगर परिषद प्रशासना ला दिली असता सफाई कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पोहचुन टॅक्टर च्या साह्याने मृत गाईला जुनी कामठी रोड रानी बगीचा जवळ खाली जागेत सोडुन दिले. सकल हिंदू समाजा च्या युवकांना घटनेची माहिती मिळाली असता शुभम बावनकर, अनुराग महल्ले, कृणाल सिंग तिलवार यांनी नप सफाई कर्मचारी टॅक्टर वाहन चालकाला मृत गाई बाबत विचारफुस केली असता चालकाने जुनी कामठी रोड रानी बगीचा जवळ सोडुन दिल्याचे सांगितले. युवकांनी जुनी कामठ रोड रानी बगिचा जवळ जाऊन पाहणी केली असता मृत गाईचे शव कचऱ्यात पडलेला अवस्थेत दिसुन आले.

राज्य शासनाने गाईला राज्य मातेचा दर्जा दिला असुन नगर परिषद सफाई कर्मचाऱ्यांनी गाईला कचऱ्यात नेऊन फेकल्याने युवकांनी नाराजगी व्यक्त केली. युवकांनी जेसीबी मशीन च्या मदतीने गड्डा करुन फुल पुष्प अर्पण करुन मातीत दफन केले आणि भावपूर्ण श्रद्धांजलि अर्पित केली.

अग्निशमन सेवांमध्ये प्रतिसादाची वेळ कमी करणे गरजेचे : डॉ. अभिजीत चौधरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७

जीवन-मृत्यूसंबंधित घटनांमध्ये अग्निशमन सेवांकडून मिळणा-या प्रतिसादाचा वेळ कमी करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले.

राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय (एनएफएससी), राज नगर, नागपूर येथे शहरीकरण, औद्योगिकीकरण, हवामान बदल, या विषयावरील संवादात्मक सत्रादरम्यान ते अग्निशमन सेवांसमोरील आव्हाने या विषयावर बोलत होते. एनएफएससीचे संचालक नागेश शिंगणे यांची यावेळी उपस्थिती होती.

चौधरी यांनी हवामान बदलामुळे तीव्र झालेल्या शहरी पुरासारख्या वारंवार आणि गंभीर नैसर्गिक आपत्तींमुळे अग्निशमन सेवेवरील वाढलेल्या ताणावर चर्चा केली. यामुळे नागपूर महानगरपालिकेने आपत्कालीन तयारीसाठी संसाधने वाढवली असल्याचे ते म्हणाले. "भविष्यातील आपत्तींचा सामना करण्यासाठी संरचित, सतत प्रशिक्षण आणि नवीन तंत्रज्ञानाशी जुळवून घेणे आवश्यक असल्याचेही ते म्हणाले.

प्रतिसादाची वेळ अनुकूल करण्यासाठी मास्टर प्लॅन तयार करण्यात आला असून 22 अग्निशमन केंद्रे तयार करण्यात येत आहेत. त्यापैकी 11 सध्या कार्यरत आहेत आणि 2 चे बांधकाम सुरू आहेत. दुर्घटना स्थळी वाहन तातडीने वाहन पाठवण्यासाठी जीपीएस ट्रॅकिंगचा वापर करून केंद्रीय कमांड आणि कंट्रोल सेंटरची स्थापना करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. नागेश शिंगणे यांनी नागेश शिंगणे यांनी एनएफएससीची दीर्घकालीन भूमिका, संपूर्ण भारतातील अग्निशमन अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे आणि अग्निशामक अभियांत्रिकीचे प्रगत अभ्यासक्रम सुरू करणे याविषयीची भूमिका मांडली.

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणासोबत एनएफएससीच्या सहकार्यावर त्यांनी भर दिला. नागपूर महानगरपालिकेसोबत राष्ट्रीय मानक स्थापित करू शकेल असे मॉडेल प्रायोगिक तत्त्वावर विकसीत करण्याचे ध्येय असल्याचे ते म्हणाले. त्यानंतर संवादात्मक सत्राने कार्यक्रमाचा समारोप झाला. सूत्रसंचालन अद्वित द्विवेदी आणि शिवांगी सोनवाल यांनी केले तर आभार गगन उपाध्याय यांनी मानले.

सुरेश भोयर आज भरणार अर्ज

■ महासागर प्रतिनिधी, कामठी, दि. २७

सर्व कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांना व नेत्यांना कळविण्यात येते की, सोमवार दिनांक २८ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता जयस्तंभ चौक कामठी येथे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार मा.सुरेश यादवरावजी भोयर हे त्यांचे कार्यकर्ते व समर्थकांसह उपस्थित होते.

कॉंग्रेस नेते माजी मंत्री श्री.सुनील केदार,खासदार श्यामकुमार बर्वे, राष्ट्रीय ग्रामीण कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेंद्र मुळक, शहर कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष रमेश दुबे, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस शकूर नागानी, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस उमेदवारी अर्ज प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सचिव राजाभाऊ तिडके, शहाजहान भाई माळी अध्यक्ष नगर परिषद कामठी, प्रमोद मानवटकर, श्रनिरज यादव यांच्या उपस्थितीत भरण्यात येणार आहे, त्यामुळे आपण सर्व प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे नेते आणि नगर परिषदेचे आजी-माजी पदाधिकारी, माजी अध्यक्ष, उपाध्यक्ष, नगरसेवक, नगरसेविका, सेवादल, महिला कॉंग्रेस, युवक कॉंग्रेस, एन.एस.यु.आय., सर्व पदाधिकारी व विविध आघाडीच्या संघटनांच्या नेत्यांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी उपस्थित राहण्यासाठी कामठी शहर कॉंग्रेस कमेटीच्या वतीने आवाहन करण्यात आले.

तरोडी (बु.) जि.प. शाळेत विद्यार्थ्यांची साहीत्य निर्मिती कार्यशाळा व प्रदर्शनी

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २७

जि.प.उच्च प्राथमिक शाळा तरोडी (बु.) येथे विद्यार्थ्यांकरिता हस्तकला साहीत्य निर्मिती कार्यशाळा व प्रदर्शनी चे आयोजन करण्यात आले. इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांकरीता प्राथमिक व उच्च प्राथमिक अशा दोन गटात ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये शंभराहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत आकाश कंदील, पणती, झुंबर, भिंतीचित्र, आदीच्या अतिशय सुंदर कलाकृतींच्या निर्मितीचा समावेश होता.

प्राथमिक गटात महजबी अंसारी, श्रीजा इंगळे, अनन्या जयस्वाल तर उच्च प्राथमिक गटात शिवानी शर्मा, जान्हवी कांबळे, सुनिता सोनकुसरे यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय पुरस्कार प्रप्त झाला. तर निधी उमरेडकर, मानसी लांजे, नैतिक साठोने, आस्था बोरकर यांना प्रोत्साहितपर बक्षीस देण्यात आले .

कार्यशाळेला प्रभारी शिक्षण विस्तार अधिकारी राजकुमार चोपकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजू सहारे, यांचेसह अनेक पालकांनी कार्यशाळेला भेट दिली.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर२८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

जिद्दी प्रतीक

बंगळूरूच्या प्रतीक खंडेलवालला एका अपघातामुळे अपंगत्व आलं. मात्र यामुळे तो डगमगला नाही. अपंगांच्या अडचणी त्याच्या लक्षात आल्या आणि मग त्याने रॅम्प माय सिटी ही कंपनी सुरू केली. या द्वारे तो अपंगांचं जगणं सुसह्य करण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या जिद्दीची कहाणी...

प्रतीक खंडेलवाल इतरांप्रमाणे सरळ, साधं आयुष्य जगत होता. २०१४ पर्यंत सगळं चांगलं चाललं होतं. आयटी इंजिनिअर असणारा प्रतीक बांधकाम सुरू असणाऱ्या इमारतीवरून पडला. या अपघातात त्याचा कंबरेखालचा भाग लुळा पडला आणि त्याला व्हिलचेअर जवळ करावी लागली. मात्र यामुळे तो निराश झाला नाही. अपघातातून सावरल्यावर त्याने रॅम्प माय सिटी ही कंपनी सुरू केली. अपंग तसंच जेष्ठांना शहरांमध्ये फिरता यावं यासाठी ही कंपनी सर्व सोयी उपलब्ध करून देते. अपघातानंतर प्रतीकने शारीरिक थेरेपी घेतली. या घटनेनंतर काहींनी प्रतीकला दया दाखवली तर काहींनी त्याच्यापासून दूर राहणं पसंत केलं. परिस्थिती स्वीकारल्यानंतर प्रतीकला व्हिलचेअर पुरतं मर्यादित राहायचं नव्हतं. त्याला आयुष्य सीमित ठेवायचं नव्हतं. पाठीच्या कण्याला झालेल्या दुखापतीमुळे प्रतीकला बराच त्रास सहन करावा लागला. पण त्याने या सगळ्या आव्हानांवर मात करायचं ठरवलं.

अचिव्हर

या अपघातातून सावरल्यावर त्याच्या एक गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे त्याला नेहमीसारखं बाहेर जाता येत नव्हतं. आवडत्या रेस्टॉरंटमध्ये किंवा खाण्याच्या स्टॉलवर जाणं त्याच्यासाठी खूपच कठीण बनलं होतं. त्याला अपंगांच्या समस्यांची जाणीव झाली आणि मग त्याने ही कंपनी सुरू केली. २०२० मध्ये रॅम्प माय सिटीची सुरुवात झाली. आत्तापर्यंत त्याच्या कंपनीतर्फे बंगळूरू, गोवा, मुंबई, गुरूग्रामसारख्या ठिकाणी ५३० हून अधिक रॅम्प्स बसवण्यात आले आहेत.

आपल्या देशात अपंगांबाबत बरीच उदासिनता दिसते. मोठी हॉटेल्स, थिएटर्स, बँका यापैकी कुठेही अपंगांसाठी सुविधा नसतात. प्रतीकला ही परिस्थिती बदलायची आहे. त्यासाठी त्याचे प्रयत्न सुरू आहेत. प्रतीकला लोकांमध्ये जागरूकता निर्माण करायची आहे. अपंगांना त्यांचे हक्क मिळवून द्यायचे आहेत. सुविधा नसल्यामुळे अपंगांना घरातच बसून रहावं लागतं. पण प्रतीकला हे सगळं बदलायचं आहे. स्वत:च्या अनुभवातून त्याने रॅम्प माय सिटीची सुरुवात केली आहे. त्याच्या जिद्दीला सलाम केलाच पाहिजे.

बारावीनंतर...

दोस्तांनो, सध्याच्या काळात फक्त बारावी किंवा पदवीधर होऊन चालत नाही. त्याच्यासोबत नवं कौशल्य आत्मसात करावं लागतं. चांगली नोकरी मिळवण्यासाठी किंवा करिअर घडवण्यासाठी काहीतरी वेगळं करावं लागतं. तुम्हीही बारावीनंतर काहीतरी वेगळं करण्याच्या विचारात असाल तर या डिप्लोमा कोर्सचा विचार करता येईल.

करिअर

* बारावीनंतर उत्तम करिअर घडवण्यासाठी तुम्ही हॉटेल मॅनेटमेंटचा विचार करू शकता. हॉटेलिंगच्या क्षेत्रात आज असंख्य संधी आहेत. अनेक संस्थांमधून हॉटेल मॅनेजमेंट शिकवलं जातं. तुम्ही या संस्थांची माहिती काढून डिप्लोमाला प्रवेश घेऊ शकता.
* आज इव्हेंट मॅनेंटमेंटचीही प्रचंड चलती आहे. इव्हेंट मॅनेजमेंटचा कोर्स करून चांगलं भविष्य घडवता येईल. आज अनेक इव्हेंट्स आयोजित केले जातात. या इव्हेंट्सच्या आयोजनाची जबाबदारी तुम्ही घेऊ शकता.
* तुमच्याकडे सौंदर्यदृष्टी असेल तर इंटिरिअर डिझायनिंगचा विचार करता येईल. यासोबतच आज ज्वेलरी डिझायनर्सनाही बरीच मागणी आहे. वेगवेगळ्या प्रकारची ज्वेलरी कॅरी केली जाते. ती ज्वेलरी घडवून तुम्ही उत्तम उत्पन्न मिळवू शकता. यासोबतच डिप्लोमा इन रिटेल मॅनेजमेंट, डिप्लोमा इन ऑर्गनायझेशन मॅनेजमेंट, डिप्लोमा इन हॉस्पिटॅलिटी अँड टूरिझम, मार्केटिंग अँड ॲडव्हरटायजिंग आणि ट्रॅव्हल अँड टूरिझम यांसारख्या विषयांमध्ये तुम्ही डिप्लोमा करू शकता.

थंडीत घ्या केसांची काळजी

दिवाळी तोंडावर आली आहे. दिवाळीसोबतच आगमन होईल ते गुलाबी थंडीचं. थंडी कितीही हवीहवीशी वाटली तरी त्यासोबतच त्वचेच्या आणि केसांच्या समस्याही उद्भवतात. त्वचा कोरडी पडते. केस रुक्ष होतात, केसांत कोंडा होतो. त्यामुळे थंडीत त्वचा आणि केसांची काळजी ही घ्यावीच लागते. केसांमधला ओलावा टिकवून ठेवण्यासाठी तुम्ही काही उपाय करू शकता.

ग्रूमिंग

* खोबरेल तेल हे या काळात वरदान ठरू शकतं. हे तेल नैसर्गिक मॉईश्चरायझरचं काम करतं. फुटलेल्या ओठांपासून कोरड्या केसांपर्यंत कशातही जीव ओतण्याचं काम हे खोबरेल तेल करतं. त्यामुळे खोबरेल तेल थोडं गरम करून केसांना लावा. आठवड्यातून किमान एकदा तरी हा उपाय करा.
* तुम्ही हेअर मास्कही तयार करू शकता. कोरफड, मध तसंच कोणतंही तेल घ्या. यापासून हेअर मास्क तयार करा. आठवड्यातून एकदा लावा.
* तुमच्या फ्रीजमधला मायोनीज सॉस कमाल करू शकतो. या सॉसमध्ये अमिनो ॲसिड्स आणि फॅटी ॲसिड्स असतात. मायोनिज कंडिशनर म्हणून काम करतो. केस ओले करून त्यावर मायोनीज लावा. साधारण १५ मिनिटांनी शँपूने धुवून टाका.
* तांदूळ भिजवलेल्या पाण्याचा वापर करता येईल. शँपूने केस धुतल्यानंतर या तांदुळ भिजवलेल्या पाण्याने केस धुवून टाका. साधारण दोन मिनिटं थांबा आणि पुन्हा स्वच्छ पाण्याने केस धुवा.

फॅशन लग्नसराईतली...

दोस्तांनो, दिवाळीनंतर लग्नांची धामधूम असते.तुमच्याही मित्रमैत्रिणींची, भावंडांची लग्न असतील. लग्नात धमाल तर केलीच पाहिजे. आता तर मेहंदी, संगीत, हळदीसारखे विविध सोहळे असतात. प्रत्येक सोहळ्यासाठी पारंपरिक पोशाख हवाच. स्टाईल आणि पारंपरिकता यांचा मेळ साधत तुम्हीही मस्त फॅशन करू शकता. लग्नसमारंभासाठीच्या या स्टायलिंग टिप्स...

* थोडं हटके आणि स्टायलिश दिसायचं असेल तर कुर्त्यावर लेअरिंग करता येईल. छान नक्षीकाम केलेला क्रीम कुर्ता घ्या. त्यावर लांब बंदगळा कॅरी करा. चुडीदार कुर्ता आणि बंदगळा यात तुम्ही भाव खाऊन जाल.
* साधेपणातही स्टाईल जपता येते. थोडं नक्षीकाम असणारा बेज रंगाचा कुर्ता आणि जोधपुरी पँट कॅरी करा. त्यावर कोल्हापुरी चप्पल घाला. यात तुम्ही नक्कीच उठून दिसाल. हा पेहराव कोणत्याही ऑकेजनची शान ठरेल.

फॅशन पॅशन

* प्रिंटेड कुर्ता कोणत्याही कार्यक्रमात शोभून दिसतो. त्यामुळे छानसा प्रिंटेड कुर्ता विकत घ्या. साखरपुडा असो किंवा रिसेप्शन, या प्रसंगी तुम्ही प्रिंटेड कुर्ता घालू शकता. प्रिंटेड कुर्त्यावर बेज रंगाची पँट घालता येईल.
* लग्न सोहळ्यात शेरवानीला बरीच मागणी असते. बरीच मुलं शेरवानी घालून मिरवतात. या सगळ्यांमध्ये उठून दिसायचं असेल तर तुम्ही वेगळा विचार करा. थंडीत वेलवेटचे कपडे घालता येतील. कुर्त्यावर गदड रंगाचं वेलवेटचं जॅकेट घाला. त्यावर लेदरच्या काळ्या रंगाच्या लोफर्स घालता येतील.
* फार प्रयोग करायचे नसतील तर साधाचा ब्लॅक कुर्ता घाला. धोती पँटवर हा कुर्ता शोभून दिसेल. त्यावर काळ्या सँडल घाला. रिसेप्शनसाठी हा लूक बेस्ट .

रम्य ते समुद्रकिनारे

मित्रांनो, समुद्रकिनाऱ्यावरच्या भटकंतीची मजा काही औरच असते. समुद्रकिनारा म्हटला की आपल्या डोळ्यांसमोर गोवा आणि कोकण येतं. गोवा आणि कोकणातले समुद्रकिनारे रम्य आहेतच, मात्र आपल्या देशातले अन्य समुद्रकिनारेही स्वच्छ आणि सुंदर आहेत. तुम्ही गोवा आणि कोकणात गेला असाल. पण पुन्हा समुद्रकिनाऱ्यांची सैर करण्याची इच्छा असेल तर या ठिकाणांचा विचार करायला काहीच हरकत नाही.

भटकंती

* पुडूचेरीचा ईडन बीच खूप रेखीव आणि सुंदर आहे. इथल्या समुद्राची निळाई डोळ्यात भरून घेण्यासारखीच. द आर्ट अँड क्राफ्ट व्हिलेज आणि द पॅरडाईज बीच या दोन पर्यटन स्थळांच्या मध्ये ईडन बीच आहे. इथे नारळाची झाडं आहेत. या बीचवर फिरताना खूप मजा येईल.
* पुरी हे ठिकाण जगन्नाथाच्या मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. तसंच पुरीमध्ये सुंदर समुद्रकिनाराही आहे. अत्यंत स्वच्छ आणि सुंदर असा हा समुद्रकिनारा तुमच्या मनात घर करून राहील.

गुजरातमध्ये शिवराजपूर बीच आहे. द्वारकेपासून अवघ्या १२ किलोमीटर अंतरावरचं हे ठिकाण अनोखं आहे. इथे तुम्हाला डॉल्फिन्सचं दर्शन घडू शकतं.

दीवमधला घोघला बीचही प्रसिद्ध आहे.

इथली सोनेरी वाळू आणि निळाशार समुद्र पर्यटकांना आकर्षित करतो.

फ्लॉवरचं भरीत

थंडीत फ्लॉवरची आवक मोठ्या प्रमाणावर होते. फ्लॉवरची भाजी आपण नेहमीच खातो. चवीत थोडा बदल हवा असेल तर तुम्ही फ्लॉवरचं भरीत करू शकता. झटपट होणारं हे भरीत तुमच्या जेवणाची लज्जत वाढवेल.

साहित्य : एक फ्लॉवर, अर्धा कप मटार, दोन टोमॅटो, एक कांदा, सात लसूण पाकळ्या, आल्याचा तुकडा, चार हिरव्या मिरच्या, लिंबाचा रस एक चमचा, अर्धा चमचा हळद, एक चमचा तिखट, थोडी राई, जीरं, चमचाभर बडिशेप, गरम मसाला, तेल, मीठ आणि कोथिंबिर.

कृती : फ्लॉवरचे बारीक तुकडे करून घ्या. कांदा आणि टोमॅटोही चिरून घ्या. गॅसवर कढई ठेवा. त्यात थोडं तेल घाला. तेल तापल्यावर राई घाला. राई तडतडली की जीरं घाला. मग कांदा घालून परतून घ्या. आलं-लसूण वाटून घ्या. कांदा सोनेरी झाला की त्यात आलं-लसूण पेस्ट घालून परता. मिरच्यांचे तुकडे घाला. मग हळद, तिखट, गरम मसाला, बडिशेप घाला. परतून घ्या. यानंतर टोमॅटो घाला. टोमॅटो शिजल्यावर त्यात फ्लॉवर आणि मटार घाला. मध्यम आचेवर शिजवून घ्या. फ्लॉवर आणि मटार शिजल्यावर मॅशरने मॅश करून घ्या. लिंबू पिळा. दोन मिनिटं शिजवा. गॅस बंद करून वरून कोथिंबिर घाला. हे भरीत पोळी किंवा पराठ्यासोबत छान लागेल.

झटपट रेसिपी

वयात अंतर आहे...

मी २७ वर्षांची तरुणी असून एका कंपनीत उच्चपदस्थ अधिकारी आहे. माझं एका मुलावर प्रेम आहे. पण तो माझ्याहून पाच वर्षांनी लहान आहे. आम्ही शेजारी असून लहानपणापासून एकमेकांना ओळखतो. आमचे कुटुंबिय हे नातं स्वीकारण्याची शक्यता तशी कमी असली तरी या नात्याचा गांभीर्याने विचार करावा असं मला वाटतं. या मुलाचंही माझ्यावर प्रेम असावं. हा मुलगा २२ वर्षांचा असून त्याचं शिक्षण पूर्ण व्हायचं आहे. त्याला मास्टर्स करायचं आहे. मला हा मुलगा आवडतो. अशा परिस्थितीत मी काय करू?

मॅच मेकिंग

उत्तर : वयात अंतर असूनही आनंदाने संसार करणारी बरीच जोडपी पहायला मिळतात. अशा नात्यांमध्ये दोघांनीही एकमेकांना समजून घ्यायला हवं. दुसरं म्हणजे तुला या मुलाबद्दल फक्त आकर्षण वाटतं का हे खरंच प्रेम आहे, हे आधी ठरवून घे. या मुलाचंही तुझ्यावर प्रेम असल्याचं तू गृहित धरलं आहेस. त्याला तुझ्याबद्दल नेमकं काय वाटतं हे आधी जाणून घे. याबाबत त्याच्याशी बोल. त्यालाही तुझ्याबद्दल प्रेम वाटत असेल तर पुढे जाता येईल. तू आयुष्यात यशस्वी आहेस. पण या मुलाचं शिक्षण सुरू आहे. त्यामुळे त्यालाही करिअर घडवायचं असेल. म्हणूनच त्याच्या मनातलं जाणून घे. गरज पडल्यास समुपदेशकांची मदत घे.

जोश

शेर की जुबानी

* सुकून की बात मत करो
ऐ मेरे दोस्त,
बचपनवाला
इतवार अब नहीं आता।

* हजारो चेहरों में एक तुम्ही पर
मर मिटे हैं वरना,
ना चाहतों की कमी थी,
और ना चाहने वालों की।

* कब तक रह पाओगे आखिर यूँ दूर हमसे,
मिलना पडेगा कभी ना कभी, जरूर हमसे,
नजरें चुराने वाले ये बेरूखी है कैसी.,
कह दो अगर हुआ है कोई कसूर हमसे।

व्हॉट्स न्यू?

सॅमसंगची स्मार्ट रिंग

तंत्रज्ञानात सातत्याने नवनवे बदल होत आहेत. स्मार्टफोन, स्मार्टवॉचनंतर आता स्मार्ट रिंग बाजारात उपलब्ध झाली आहे. सॅमसंगने भारतात 'गॅलेक्सी रिंग' सादर केली असून या रिंगमध्ये आपली आरोग्यविषयक माहिती सेव्ह करता येते. यासोबतच यात अन्य फीचर्सही आहेत. 'गॅलेक्सी रिंग' नऊ आकारांमध्ये उपलब्ध असून तिचं वजन फक्त तीन ग्रॅम एवढं आहे. टायटॅनियम ब्लॅक, टायटॅनियम सिल्व्हर आणि टायटॅनियम सिल्व्हर अशा तीन रंगांमध्ये ती उपलब्ध आहे. ही रिंग एकदा चार्ज केल्यानंतर सात दिवसांचा बॅटरी बॅक अप देते. यात अनेक सेंसर्स आहेत. तसंच ती वॉटरप्रूफही आहे.

बी ॲलर्ट

ऑनलाईन शॉपिंग करताय?

दिवाळीमध्ये ई कॉमर्स साईट्सवर शॉपिंग फेस्टिवल्सची धूम असते. मग आपल्यालही सवलतीत वस्तू खरेदी करण्याचा मोह आवरत नाही. मात्र अशा पद्धतीने ऑनलाईन शॉपिंग करताना फसवणूक होण्याचा धोकाही असतो. बऱ्याच ऑफर्स आणि सवलती असतील तर फसवणूक होऊ शकते. बाय वन गेट वन फ्रीच्या जाळ्यातही तुम्ही अडकू शकता. कूपन तसंच रिवॉर्डच्या नावाखाली तुमची फसवणूक होऊ शकते. बनावट ॲप्स तसंच वेबसाईट्सच्या माध्यमातून तुम्ही फसवले जाऊ शकता. त्यामुळे कोणतीही खरेदी भरवशाच्या साईटवरूनच करा. अनोळखी लिंकवर क्लिक करू नका. कुठेही आपली माहिती नोंदवू नका. अशा पद्धतीने थोडी काळजी घेऊन तुम्ही ऑनलाईन फसवणूक टाळू शकता.

ॲप वर्ल्ड

यू ट्यूबने कमाई करताय?

यू ट्यूबवर अनेकांची चॅनेल्स आहेत. तुम्हीही अनेक चॅनेल्स आवडीने बघत असाल. काही चॅनेल्सचे काही लाख सबस्क्रायबर्स असतात तर काहींचे काही हजार. यू ट्यूब चॅनलमार्फत कमाईही करता येते. तुम्ही ५०० सबस्क्रायबर्सद्वारेही कमाई सुरू करू शकता. सुपर चॅट, थँक्स, स्टीकर्सचा वापर करून तुम्ही कमाई करू शकता. जाहिरातींच्या माध्यमातून पैसे कमावण्यासाठी तुमच्याकडे किमान १००० सबस्क्रायबर्स असायला हवेत. यासोबतच तुम्ही अस्सल कंटेंट दाखवायला हवा. बनावट कंटेंटद्वारे तुम्हाला कमाई करता येणार नाही. त्यामुळे तुमचा कंटेंट अस्सल आहे, याची खात्री करून घ्या.

सोशल मीडिया

जी मेलचा कॉन्फिडेन्शियल मोड

जी मेलचा वापर सर्व जण करतात. जी मेलवरून तुम्ही महत्त्वाची किंवा गोपनीय माहिती पाठवत असाल तर तुम्हाला जी मेलच्या कॉन्फिडेन्शियल फीचरची माहिती असायला हवी. अर्थात हा मोड सगळ्यांसाठी उपलब्ध नाही. एखादी संस्था हा मोड ॲक्टिव्ह करू शकते. ॲडमिनिस्ट्रेटर अकाउंटमध्येच तुम्ही स्टेप्स फॉलो करून हा मोड ॲक्टिव्ह करू शकता. यासाठी ॲडमिन कन्सोलमध्ये मेन्यूवर क्लिक करा. यानंतर जीमेल युजर सेटिंग्जमध्ये जा. स्क्रॉल करून कॉन्फिडेन्शिलय मोडमध्ये जा. हा मोड ऑन करा. आता तुम्ही गोपनीय माहिती सुरक्षीतरित्या पाठवू शकता.

कोराडीत साकारलं मामाचं गाव

"हॅप्पी स्ट्रीट" कार्यक्रमात ५ हजार व्यक्तींचा प्रत्यक्ष सहभाग

■ महासागर प्रतिनिधी
कोराडी, दि. २७

पूर्वीच्या काळी मामाच्या गावाला जाऊन धमाल मस्ती करायची, गावाकडील निसर्गरम्य मातीशी नातं जोडीत, नात्यांची वीण अधिक घट्ट करायची अशी आपली मराठमोळी संस्कृती. मात्र धकाधकीच्या जीवनात मामा देखील शहरात राहायला आल्याने मामाच्या गावचे कुतूहल काहीसे कमी झाले आणि ही जागा टी.व्ही., मोबाईल, फेसबुक, व्हाट्सप सारख्या आभासी दुनियेने व्यापल्याने जीवनाचा खरा-खुरा आनंदच दूर झाला.

मानवी जीवन तांत्रिक झाले, यातून उदयास आलेली शहरी संकल्पना म्हणजे "हॅप्पी स्ट्रीट". मामाच्या गावाला न जाता सुटीच्या दिवशी सकाळच्या प्रहरी मुख्य रस्त्यावरील रहदारी काही वेळापुरता इतरत्र वळवून त्याठिकाणी मनसोक्त खेळ, धमाल मस्ती करायची, हा यामागचा उद्देश.

महानिर्मितीच्या कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या ५० व्या सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिना निमित्ताने कोराडी विद्युत विहार वसाहतीतील कामगार मनोरंजन केंद्रालगतच्या सभोवताली रस्त्यावर "हॅप्पी स्ट्रीट" मामाचं गाव साकारण्यात आले. वीज केंद्राच्या अधिकारी-कर्मचारी व कुटुंबीयांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. विशेषतः सुमारे ५ हजार व्यक्तींनी या कार्यक्रमाचा भरपूर आनंद घेतला.

हिरव्यागार वृक्षांच्या सावलीत, रंगबिरंगी फुगे, झेंडे, तोरणांनी रस्ते आकर्षक सजले होते. तर वयाचे भान विसरून, आपलं-परकं विसरून, प्रत्येकाने बालपणीच्या खेळाचा निखळ आनंद लुटला. नेहमी चारचाकी चालविणारा बैलबंडी चालवित होता तर माता-भगिनी आपल्या मुलांना विसरून टिक्कर बिल्ला, लगोरी, दोरीवरच्या उड्या, तळ्यात-मळ्यात, झुले, पाळणे, मामाचं पत्र हरवलं इत्यादी खेळांचा मनसोक्त आनंद घेत होत्या. चार तास कसे संपले कोणालाच कळाले नाही.

घराकडे परतीची पाउले वळायला तयार नव्हती एवढा जीव "हॅप्पी स्ट्रीट" मामाच्या गावाने लावला. एरवी घरात बोलायला वेळ नसणारी पालक मंडळी "हॅप्पी स्ट्रीट" वर एकमेकांशी खुलून बोलताना दिसली तर मुले-मुली देखील आपले आई-वडील टायर, लोखंडी रिंग चालवित धावत असल्याचे पाहून आश्चर्य चकित झाले. जात, पात, धर्म, वय, पद, गर्व दूर सारून प्रत्येक व्यक्ती स्वतःला व्यक्त करीत निःस्वार्थपणे सहभागी झाल्याचे दिसून येत होते. "हॅप्पी स्ट्रीट" च्या माध्यमातून अख्ख मामाचं गावच कोराडीत साकारण्यात आले होते. हिरव्यागार झाडयांच्या सावलीत मचान, झोपडी निर्माण करुन सभोवताली प्रति शेती पिकवून अस्सल गावाचे वातावरण तयार करण्यात आले.

अखंडित वीज उत्पादनाचे राष्ट्रीय कार्य करणाऱ्या कोराडी वीज केंद्राच्या अधिकारी-कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी मामाचं गांव, "हॅप्पी स्ट्रीट" हा उत्तम पर्याय असल्याचे मुख्य अभियंता विलास मोटघरे म्हणाले. या कौटुंबिक कार्यक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद लाभला त्याचे कारण लहान मुलामुलींसाठी विविध खेळ, बक्षिसे, बुढ्ढी का बाल(शुगर कँन्डी), बंदुकीच्या गोळीने फुगे फोडणे, दोरीचे झुले, छकडा-रेंगी, बैलगाडी-गायवासरू, बॉल गेम्स, सापशिडी, टायर, तोफ, लोखंडी रिंग चालविणे, दोरीवरच्या उड्या, लहान सायकल, स्केटिंग तर तरुणी व महिलांसाठी मेहंदी, टॅटू,बॅडमिंटन,फुटबॉल,लगोरी,दोरी वरच्या उड्या, कंबर रिंग, प्लेट थ्रो, रबर रिंग, पुरुष वगार्साठी फुटबॉल, प्लेटथ्रो, बॅडमिंटन, रेखाचित्र,कंचे, भवरे, सेल्फी पॉईंट इत्यादी उपलब्ध होते. फूड झोनमध्ये इंडियन कॉफी हाउसचे खाद्यपदार्थ,आईस्क्रीम, समोसा, आलूवडा, चहा, ढोकळा, मोमो, मोड कडधान्ये, भेळ, चना मसाला, पाणीपुरी, नारळपाणी, अश्या नानाविध खाद्यपदार्थांची रेलचेल होती.

ज्येष्ठ नागरिकांसाठी योगासन,भजन मंडळी, बुद्धिबळ, कॅरम, वृत्तपत्र,मासिके वाचन व झुम्बा डान्स थरार, झेमबे आफ्रिकन वाद्य तर आदिवासी गोंडी नृत्य ज्यामध्ये गाणे,नृत्य इत्यादी कला अनेकांनी सादर केल्या.

कोराडी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता विलास मोटघरे यांच्या मार्गदर्शनाखाली हॅप्पी स्ट्रीट आयोजन समितीच्या सहकार्याने "हॅप्पी स्ट्रीट" (मामाचं गाव) कार्यक्रम अतिशय यशस्वीरीत्या संपन्न झाला.

कार्यक्रमाला कार्यकारी संचालक पंकज सपाटे, विवेक रोकडे, मुख्य अभियंते सुनील सोनपेठकर, विराज चौधरी, राजेश कराडे, उप मुख्य अभियंते शैलेंद्र कासुलकर, सचिन देगवेकर, भास्कर इंगळे, शैलेंद्र गजरलवार, अधीक्षक अभियंते सचिन भगेवार किरण नानवटकर, परिमल रामटेके, सारिका सोनटक्के, कुणाल घाटे, राजेश डाखोळे, मनोज उमप, देवेंद्र भादीकर, सीमा महल्ले महाव्यवस्थापक(वित्त व लेखा) यशवंत मोहिते मुख्य जनसंपर्क अधिकारी, अतुल बोरकर उप महाव्यवस्थापक, डॉ.अमित ग्वालबंशी, प्रवीण मडावी, कल्याण अधिकारी मयूर मेंढेकर, देवेंद्र राठोड वरिष्ठ व्यवस्थापक(सुरक्षा), महेश घुरिले- सचिव, प्रवीण बुटे-समन्वयक, विभाग प्रमुख, पुरुष-महिला मुले-मुली मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन आर जे प्रीती आणि अजिंक्य यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेत "हॅप्पी स्ट्रीट" आयोजन समितीच्या पदाधिकारी व सदस्यांनी मोलाची भूमिका बजावली तसेच स्थापत्य, विद्युत, अग्निशमन, सुरक्षा तसेच सर्व विभागांचे मोलाचे सहकार्य लाभले.

सायबर चोरट्यांकडून महिलांची ४६ लाखांची फसवणूक

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. २७

शेअर बाजारात गुंतवणूक, तसेच पोलीस कारवाईची भीती घालून सामान्यांची फसवणूक करण्याचे सत्र सुरू आहे. सायबर चोरट्यांनी वेगवेगळ्या घटनेत दोन महिलांची ४६ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी सहकारनगर आणि विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पद्मावती भागातील एका महिलेची शेअर बाजारात गुंतवणूक करण्याच्या आमिषाने सायबर चोरट्यांनी २६ लाख २५ हजार रुपयांची फसवणूक केली. याबाबत एका महिलेने सहकारनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फियार्दीनुसार, सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार महिलेला शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखविले होते. महिलेने चोरट्यांच्या खात्यात वेळोवेळी २६ लाख २५ हजार रुपये जमा केले. पैसे जमा केल्यानंतर चोरट्यांनी महिलेला परतावा मिळाला, असे भासविले. महिलेने परताव्याबाबत विचारण केली. तेव्हा चोरट्यांनी प्रतिसाद दिला नाही. चोरट्यांनी त्यांचे मोबाइल क्रमांक बंद केले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक छगन कापसे तपास करत आहेत.

विमाननगर परिसरातील एका महिलेची सायबर चोरट्यांनी पोलीस कारवाईची भीती दाखवून २० लाख रुपयांची फसवणूक केली. याबाबत महिलेने विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिलेच्या मोबाइल क्रमांकावर सायबर चोरट्यांनी संपर्क साधला. मुंबई विमानतळावरुन दक्षिण कोरियात कुरिअरव्दारे एक पाकिट पाठविण्यात आले आहे. पाकिटात दोन पारपत्र, लॅपटॉप, अमली पदार्थ सापडले असून, याप्रकरणी पोलिसांकडून कारवाई करण्यात येणार असल्याची बतावणी चोरट्यांनी केली. कारवाईची भीती दाखवून चोरट्यांनी महिलेला तातडीने बँक खात्यात पैसे जमा करण्यास सांगितले. महिलेने शहानिशा न करता चोरट्यांच्या खात्यात २० लाख रुपये जमा केले.

अपघातात जखमी वृद्धाचा मृत्यू

नागपूर : रस्ते अपघातात जखमी वृद्धाचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. ही घटना पाचपावली पोलिस ठाण्यांतर्गत घडली. प्रकाश किसनचंद चावला (69) रा. वैशालीनगर, असे मृताचे नाव आहे. गत 3 ऑक्टोबरच्या सायंकाळी 5 वाजताच्या सुमारास प्रकाश दुचाकी वाहनाने काही कामानिमित्त जात होते. राऊत चौकाजवळ एका ई-रिक्शा चालकाने त्यांच्या वाहनाला जबर धडक दिली आणि फरार झाला. जखमी प्रकाश यांना उपचारार्थ मेयो रुग्णालयात भरती करण्यात आले होते. शनिवारी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी प्रकाशचे जावई विनोद चावला यांच्या तक्रारीवरून अज्ञात ई-रिक्शा चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

मद्यपी वाहन चालकाकडून पोलीस शिपायाला धक्काबुक्की

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २७

नाकाबंदीत वाहतूक शाखेच्या पोलीस शिपायला धक्काबुक्की केल्याप्रकरणी मद्यपी वाहन चालकाविरुद्ध येरवडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला. कल्याणीनगर भागात ही घटना घडली.

चिराग राजेंद्र मुंदडा (वय २९, रा. नारायण पेठ) असे गुन्हा दाखल केलेल्या वाहनचालकाचे नाव आहे. याबाबत येरवडा वाहतूक शाखेतील पोलीस शिपाई संदीप खंडागळे यांनी येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शहरात दररोज रात्री नाकाबंदी करण्याचे आदेश करण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहेत. भरधाव वेग, तसेच दारु पिऊन वाहन चालविणाऱ्या वाहन चालकांविरुद्ध कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत.

येरवडा वाहतूक शाखेतील पोलीस शिपाई संदीप खंडागळे आणि सहकाऱ्यांनी येरवड्यातील कल्याणीनगर भागात नाकाबंदी केली होती. कल्याणीनगर परिसरातील बिशप स्कूल परिसरात शुक्रवारी मध्यरात्री नाकाबंदी करुन वाहनचालकांची तपासणी करण्यात येत होते. त्यावेळी वाहनचालक चिराग मुंदडा याची तपासणी करण्यात आली. मुंदडा याने तपासणीस विरोध केला.

खंडागळे यांच्या हातातील मोबाइल संच हिसकावून त्यांना धक्काबुक्की केली. तपासणीत मुंदडाने दारु पिऊन वाहन चालविल्याचे उघडकीस आले. सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक लामखेडे तपास करत आहेत. बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यासाठी दररोज रात्री ११ ते पहाटे तीनपर्यंत शहरातील वेगवेगळ्या भागांत नाकाबंदी करून वाहनचालकांची तपासणी सुरू करण्यात आली आहे. नाकाबंदीसाठी शहर, उपनगरातील २७ ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. या मोहिमेत सहायक पोलीस आयुक्तांसह १२५ पोलीस कर्मचारी सहभागी होणार आहेत. बेशिस्त वाहनाचालकांना शिस्त लावण्यासाठी दररोज रात्री नाकाबंदी करण्यात येत आहे.

बाबा सिद्दिकी हत्या प्रकरण

लॉरेन्स बिष्णोईचा भाऊ अनमोल आरोपींच्या संपर्कात

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २७

माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी अटक करण्यात आलेल्या सुजीत सुशील सिंह याला पंजाबमधून अटक करण्यात आली होती. सिंह कुख्यात लॉरेन्स बिष्णोईचा भाऊ अनमोलच्या संपर्कात असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे याप्रकरणी अनमोल बिष्णोईला आरोपी करण्यात आले आहे. अनमोल बिष्णोईने यापूर्वी अभिनेता सलमान खानच्या घरावर गोळीबार घडवून आणला होता. सिंहच्या सांगण्यावरून याप्रकरणातील अटक आरोपी नितीन सप्रे व राम कनोजिया यांनी बाबा सिद्दिकी यांचे घर व आमदार झिशान सिद्दिकी यांच्या कार्यालयाची पाहणी केली होती.

मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने ३२ वर्षीय सुजीत सिंह याला अटक केली आहे. त्याने परदेशातील गुंडासोबत संपर्क साधला होता. सिंह विविध समाज माध्यमातून अनेक खात्यांवर संवाद साधत होता. तो परदेशातील गुंड अनमोल बिष्णोई असल्याचा संशय आहे. सुजीत सिंह मुंबईतील रहिवासी आहे आणि बाबा सिद्दिकीच्या हत्या प्रकरणात त्याचा शोध सुरू होता. पंजाब पोलीस व मुंबई पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईत सिंहला लुधियानातून पकडण्यात आले होते. सिंह बाबा सिद्दिकीला मारण्याच्या कटात सहभागी होता. तो पूर्वी घाटकोपरच्या छेडा नगर परिसरात राहात होता आणि त्याला लुधियानामध्ये अटक करण्यात आली.

याप्रकरणी आतापर्यंत पाच पिस्तुल जप्त करण्यात आली आहेत. पोलिसांच्या मते, सिंहला बाबा सिद्दिकीची हत्या करण्याच्या कटाची माहिती होती आणि तो अनमोल बिश्नोईच्या संपर्कात होता. त्याने इतर आरोपींना पैसे पुरवले आणि शस्त्रांचा पुरवठा करण्यात सहभागी होता. गुन्हा घडण्याच्या आधी एक महिना सिंहने मुंबई सोडली होती.

सिंह बब्बू म्हणून प्रचलित आहे. तसेच तो या प्रकरणातील आरोपी मोहम्मद झिशान अख्तर याच्याशी संपर्क साधत होता. त्यानंतर तो चार ते पाच महिन्यांपूर्वी सप्रे आणि इतर आरोपींशी संपर्कात आला. सिंह विरोधात यापूर्वी एकही गुन्हा दाखल नाही. पोलीस त्याबाबत पडताळणी करीत आहेत. याप्रकरणी सिंहला ४ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तसेच हरिशकुमार निषाद याला याप्रकरणी २८ ऑक्टोबरपर्यंत तसेच इतर पाच आरोपींनाही याप्रकरणी ४ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान याप्रकरणातील आरोपी धर्मराज कश्यप, गुरमेल सिंह व प्रवीण लोणकर यांना याप्रकरणी न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. याप्रकरणी गुन्हे शाखा तपास करीत असून याप्रकरणी मोक्का कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्याची शक्यता आहे.

भंगारच्या दुकानातून एमडीची विक्री

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २७

गुन्हे शाखा युनिट 4च्या पथकाने हुडकेश्वरच्या आऊटर रिंगरोडवरील एका भंगारच्या दुकानात धाड टाकून 2 आरोपींना एमडीसह अटक केली. या दुकानातून अंमली पदार्थांची विक्री होत असल्याची गोपनिय माहिती पोलिसांना मिळाली होती. शेख इसराईल शेख अजिमुल्ला (52) रा. म्हाळगीनगर आणि शेख इकबाल शेख तय्यब (40) रा. यासिन प्लॉट, मोठा ताजबाग अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. त्यांना माल विकणारा नौशाद रुस्तम रा. तोहितनगर, मोठा ताजबागचा शोध पोलिस घेत आहेत.

शनिवारी रात्री 1 ते 2.30 वाजताच्या दरम्यान युनिट 4चे पथक गुन्हेगारांच्या शोधात गस्त घालत होते. या दरम्यान हुडकेश्वर आऊटर रिंग रोडवरील पेट्रोल पंपजवळ असलेल्या भंगारच्या दुकानातून एमडीची विक्री होत असल्याची माहिती मिळाली.

पोलिसांनी दुकानात धाड टाकली असता वरील आरोपी मिळाले. दोघांनाही ताब्यात घेऊन झडती घेण्यात आली, मात्र काहीही मिळाले नाही. पोलिसांनी इकबालच्या वाहनाची डिक्की तपासली असता एका प्लॅस्टिकच्या पिशवित 12.50 ग्रॅम एमडी मिळाली. आरोपींकडून मालासह 3 मोबाईल फोन, वजन काटा आणि दुचाकी वाहन असा एकूण 2.36 लाख रुपयांचा माल जप्त केला. चौकशीत आरोपींनी माल नौशाद रुस्तम याचा असून त्याने कमिशनवर विकण्यासाठी त्यांना दिला असल्याची माहिती दिली.

२ वर्षानंतर मिळाली अपहृत मुलगी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २७

15 वर्षांच्या अल्पवयीन मुलीला कामगार युवकाने फुस लावून पळविले. 2 वर्षानंतर तिला शोधून काढण्यात गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाला यश आले. मात्र तोपर्यंत ती एका मुलाची आई झाली होती. पोलिसांनी अपहृत आणि अपहरणकर्ता दोघांनाही ओडिशाच्या कटक येथून नागपुरात आणले.

मध्य प्रदेशातील एक दाम्पत्य कामाच्या शोधात 15 वर्षांच्या मुलीसह नागपुरात आले. बेलतरोडी परिसरात मोठ्या प्रमाणावर ईमारतीचे बांधकाम सुरू असल्याने त्यांना तेथे काम मिळाले. ते बांधकाम स्थळीच रहात होते. त्याच ठिकाणी आरोपी युवकही काम करीत होता. त्याने पीडितेला प्रेमाच्या जाळ्यात अडकवले. दोघांमधील प्रेम संबंधाबाबत समजताच वडिलांनी मुलीला फटकारत त्याच्यापासून दूर राहण्यास सांगितले. तेव्हापासून त्यांची बोलचाल बंद झाली. मात्र, दररोज ते एकमेकांना पहात होते. एक दिवस संधी मिळताच युवकाने पीडितेला फूस लावून पळविले. मुलगी दिसत नसल्याने कुटुंबीयांनी तिचा सर्वत्र शोध घेतला. अखेर बेलतरोडी पोलिस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार केली. तसेच आरोपी मुलावर संशय व्यक्त केला. पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. पथकाने पाचपावली पोलिस ठाण्यांतर्गत राहणाऱ्या आरोपीच्या भावाची चौकशी केली. तसेच मध्यप्रदेशात जावून आरोपीच्या वडिलांची तपासणी केली. त्यांच्या मोबाईलमध्ये आरोपीचा फोन नंबर मिळाला. त्यावरून तो ओडिशाच्या कटक येथे असल्याचे समजले. पोलिसांनी कटक गाठून दोघांनाही ताब्यात घेतले. त्यांनी लग्न केले होते आणि त्यांना एक दीड वषार्चा मुलगा सुद्धा होता. पोलिसांनी त्यांना नागपुरात आणून पुढील कार्यवाहीसाठी बेलतरोडी पोलिसांच्या स्वाधिन केले आहे. ही कामगिरी पोलिस निरीक्षक ललिता तोडासे, उपनिरीक्षक मधुकर काठोके, राजेंद्र अटकाळे, गजेंद्रसिंग ठाकूर, श्याम अंगुथलेवार, अश्विनी खोडपेवार, वैशाली किन्हीकर यांनी केली.

अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्याला अटक

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७

अरबी भाषा शिकवण्यासाठी घरी आल्यानंतर मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला पवई पोलिसांनी अटक केली. पीडित मुलगी आता १७ वर्षांची असून तिने शाळेतील समुपदेशना दरम्यान १० वर्षांपूर्वी आरोपीने केलेल्या अत्याचारांची माहिती दिली. त्यानुसार, शाळेने दिलेल्या तक्रार अर्जाच्या आधारे गुन्हा दाखल करून पोलिसांनी ही कारवाई केली.

पवईतील एका नामांकित शाळेने २४ ऑक्टोबर रोजी पवई पोलिसांना एक तक्रार अर्ज दिला. शाळेमध्ये १२ इयत्तेत शिकत असलेल्या १७ वर्षांच्या मुलीवर १० वर्षांपूर्वी आरोपीने केलेल्या अत्याचाराची माहिती त्यात दिली होती. पवई पोलिसांनी याप्रकरणाची गांभीयार्ने दखल घेत तातडीने गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली.

पीडित अल्पवयीन मुलगी सात ते आठ वर्षांची असताना आरोपी तिला अरबी भाषा शिकवण्यासाठी त्यांच्या घरी येत होता. हा आरोपी शिकवणीदरम्यान तिला भाषेचा एक टास्क द्यायचा.

मुलीने टास्क पूर्ण न केल्यास आरोपी तिच्याशी अश्लील चाळे करीत होता. आरोपी शिक्षक असल्याने भीतीपोटी तिने याबाबत वाच्यता केली नाही. मात्र, शाळेतील समुपदेशाना दरम्यान तिने याबाबत माहिती दिली.

देहव्यापारासाठी हॉटेलमध्ये आणल्या दार्जिलिंगच्या तरुणी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७

ग्रामीण भागातील हॉटेलमध्ये देहव्यापार करण्यासाठी दार्जिलिंग शहरातील तरुणींना नागपुरातील दलाल आणत आहेत. त्यांचे आर्थिक शोषण करुन त्यांच्याकडून देहव्यापार करवून घेत आहेत. रामटेक परीसरातील हिवरा रोडवरील नेचर पॉईंट हॉटेलमध्ये पोलिसांनी छापा घातला. या छाप्यात दार्जिलिंगच्या तरुणीला देहव्यापार करताना ताब्यात घेतले. पोलिसांनी हॉटेलच्या व्यवस्थापकासह सहा आरोपींवर गुन्हा दाखल केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रामटेकमधील हिवरा रोडवर असलेल्या नेचर पॉईंट हॉटेल असून या हॉटेलमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून देहव्यापार सुरु आहे. त्यामुळे या हॉटेलमध्ये अनेक आंबटशौकीन ग्राहकांची गर्दी वाढली होती. त्यामुळे अनेकांना संशय आला. दिवसेंदिवस गर्दी वाढत चालल्यामुळे हॉटेलचा व्यवस्थापक शुभम ठाकूर (रामटेक) याने दार्जिलिंगमधील काही तरुणींना देहव्यापार करण्यासाठी आपल्या हॉटेलवर आणले. त्यामध्ये २१ वर्षीय तरुणी पदवीचे शिक्षण घेत होती. शिक्षणासाठी पैसा गोळा करण्यासाठी ती देहव्यापार करीत होती. आरोपी नरेंद्र चौधरी (बालाघाट), शुभम हारोडे (चिंचभवन, पारशिवनी), प्रेमचंद डडुरे (पारशिवनी), लोकेश रेवतकर (बोरबन) आणि आनंद सरवरे (चिचभवन) यांनी संगनमत करुन हॉटेलमध्ये तरुणींना बोलावून देहव्यापार करवून घेणे सुरु केले. हॉटेलमध्ये आलेल्या आंबटशौकीन ग्राहकांना तरुणींना पुरवत होते. लोकेश रेवतकर हा ग्राहकांसोबत तरुणींना पाठविण्यापूर्वी स्वतःची प्रेयसी असल्याची ओळख करुन देत होता.

हॉटेलमध्ये देहव्यापार सुरु असल्याची माहिती पारशिवनीच्या सहायक पोलीस निरीक्षक धनश्री कुटेमाटे यांच्या नेतृत्वातील पथकाने हॉटेल नेचर पॉईंटवर बनावट ग्राहक पाठवला. त्याने तरुणीची मागणी केली. शुभम ठाकूर याने बनावट ग्राहकाकडून पैसे घेतले आणि दार्जिलिंगमधून आलेल्या तरुणीला त्याच्या रुममध्ये पाठवले. यादरम्याने, त्याने पोलिसांना इशारा केला. पोलिसांनी लगेच छापा घातला. त्या तरुणीला देहव्यापार करताना ताब्यात घेतले. तर हॉटेलचा व्यवस्थापकासह सहा जणांवर रामटेक पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल केले.

शहरालगत आणि ग्रामीण पोलिसांच्या हद्दीत असलेल्या अनेक ढाब्यावर, हॉटेलवर आणि लॉजवर बिनधास्त देहव्यापार सुरु आहे. दिल्ली, मुंबई, कोलकाता, काश्मीर, पंजाब येथील तरुणींना देहव्यापारासाठी नागपुरात आणले जात आहे. अनेक आंबटशौकिनांची गर्दी शहरालगत असलेल्या हॉटेलमध्ये वाढत आहेत.

सरकारी जाहिरातींसाठी सार्वजनिक निधीची उधळपट्टी

दुरुपयोग रोखण्यासाठी समिती स्थापन करा : उच्च न्यायालयाचे आदेश

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २७

वृत्तपत्रात अथवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांत प्रसिद्ध होणाऱ्या सरकारी जाहिरातींसाठी सार्वजनिक निधीचा गैरवापर केला जात असल्याच्या जनहित याचिकेची उच्च न्यायालयाने दखल घेतली. तसेच, हा गैरवापर टाळण्यासाठी तीन सदस्यीय समिती स्थापन करण्याचे आदेश राज्य सरकारला दिले.

समितीची पुनर्रचना करून ती पुन्हा सक्रिय करण्याचेही आदेश न्यायमूर्ती महेश सोनक आणि न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या खंडपीठाने राज्याच्या मुख्य सचिवांना दिले. यापूर्वी, २०१५ मध्ये त्रिसदस्यीय समितीच्या स्थापनेचे आदेश देण्यात आले होते. त्याचा एप्रिल २०१६ मध्येही पुनरुच्चार करण्यात आला होता. त्यामुळे, राज्य सरकारने लवकरात लवकर या त्रिसदस्यीय समितीची स्थापना करावी, असे खंडपीठाने आदेशात प्रामुख्याने नमूद केले आहे. वृत्तपत्रात अथवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांत प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन होत असल्याचा दावा करणारी याचिका एडिटर्स फोरमने दाखल केली होती. त्याचप्रमाणे, माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय (डीजीआयपीआर), इतर सरकारी संस्था आणि स्थानिक प्राधिकरणांमार्फत होणाऱ्या अनियमिततेबाबत चौकशी करण्यासाठी आयोग स्थापन करण्याची मागणीही केली होती. त्यावरील सुनावणीच्या वेळी न्यायालयाने उपरोक्त आदेश दिले. सत्ताधारी पक्ष आपला जाहीरनामा सरकारी प्राधिकरणांमार्फत वृत्तपत्रात अथवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये जाहिराती प्रसिद्ध करून करत असतात. तसेच, त्यासाठी सार्वजनिक निधीचा गैरवापर करत असल्याकडे सर्वोच्च न्यायालयाने यापूवीर्ही लक्ष वेधले होते. त्यामुळे, सरकारकडून या गैरप्रकाराद्वारे भारतीय संविधानाच्या समानतेचा अधिकार आणि वैयक्तिक स्वातत्र्यांचे उल्लंघन केले जात असल्याचे न्यायालयाने नमूद केले. त्यानंतर, राज्य सरकारने या समस्येवर लक्ष ठेवण्यासाठी एक समिती स्थापन केली होती. मात्र, करोनामुळे ही समिती कार्यान्वित झाली नाही, असे ताशेरेही न्यायालयाने आदेशात ओढले.